
वस्तीची गाडी
लेखक- प्रा.श्रीराम काळे
ई कथा संग्रह

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# वस्तीची गाडी

## लघुकथा संग्रह

प्रा.श्रीराम विनायक काळे

वस्तीची गाडी (कथासंग्रह)

**लेखक: प्रा.श्रीराम विनायक काळे**

एम्.ए.एम्.एड्.एम्.फिल्.

मोबाइल 8766764641

ई मेल shriramkale.sk@gmail.com

**मुखपृष्ठ- swayam art & graphics**

**टंकलेखन-** सौ. शर्वरी काटदरे, कर्वे नगर, पुणे 9404167338

**ISBN 978-81-908189-5-7**

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

TThis declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक:
ई साहित्य प्रतिष्ठान
ईलेवन्थ फ़्लोअर,
ईटर्निटी,
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे
www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)
प्रकाशन : २९ डिसेंबर २०२४

©esahity Pratishthan®2024

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## लेखक परिचय :

प्रा . श्रीराम विनायक काळे.

एम्. ए.एम्.एड्. एम्.फील्.



※ बी.एड्. कॉलेज देवगड येथे २८ वर्षे प्राध्यापक पदावर सेवा.

※ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक उत्तेजनार्थ अनुदानातून प्रचार प्रकाशन कोल्हापूर तर्फे ‘रुजवातीच्या गोष्टी’ हा कथासंग्रह प्रकाशित.

※ अणुरेणू,देवदुर्ग, आरती, वैनतेय, किरात, प्रसाद, माहेर, अपूर्व, वसुधा, प्रतिबिंब, जत्रा,साहित्य सहयोग या दिपावली विशेषांकामध्ये सुमारे ८० लघुकथा प्रसिद्ध.

※ पुढारी नवांकुर कथास्पर्धा , प्रतिबिंब पुणे आयोजित राज्यस्तर कथास्पर्धा, तरुणभारत अक्षरयात्रा कथास्पर्धा, बॅ.नाथ पै कथास्पर्धा

सावंतवाडी, को.म.सा.प देवरुख आयोजित कथास्पर्धा, i pustak HUB आयोजित कथास्पर्धा, साहित्य सहयोग कोल्हापुर आयोजित कथास्पर्धा अशा विविध कथास्पर्धांमध्ये पुरस्कार प्राप्त.

※ कालराज प्रकाशन देवगड तर्फे 'पाखरांची भाषा' हा कथासंग्रह प्रसिद्ध.

※ विघ्नेश पुस्तक भांडार, कणकवली तर्फे 'बॅडकमांड' हा कथासंग्रह प्रसिद्ध.

※ ई साहित्य प्रतिष्ठान, ठाणे तर्फे 'रुजवातीच्या गोष्टी ' 'पाखरांची भाषा' 'बॅडकमांड' 'तेरी चुनरिया दिल ले गयी ' असे चार ई कथासंग्रह प्रसिद्ध

※ "मातृभारती ऑन लाइन साहित्य प्रसिद्धी आणि वाचन" वेब पोर्टलवर ६० कथा प्रसिद्ध झाल्या असून सुमारे 45.3 K वाचक आहेत.


तेरी चुनरिया दिल ले गयी
प्रा. श्रीराम काळे
ई साहित्य प्रकाशन


पाखरांची भाषा
प्रा. श्रीराम काळे


रूजवातीच्या गोष्टी
प्रा. श्रीराम काळे


बॅडकमांड
प्रा. श्रीराम काळे

# लेखकाचे मनोगत

## (ई आवृत्तीच्या निमित्ताने...)

ई बुक स्वरुपात प्रसिद्ध होणारा हा माझा पाचवा कथा संग्रह. या संग्रहात एकूण आठ कथा समाविष्ट केलेल्या आहेत. माझ्या उमेदीचा काळ हा आजच्या जीवनशैली पेक्षा पूर्णत: वेगळा होता. मी राजापुर तालुक्यातल्या ज्या दुर्गम भाग़ात आठ वर्ष कार्यरत होतो तो भाग तर त्यावेळी एकोणिसाव्या शतकाच्या आरंभ काळातील जीवन जगत होता. वस्तीची गाडी, शिनुमा शिनुमा या कथांमधिल वर्णन आज कदाचित अतिशयोक्त वाटेल. पण ते वास्तव आहे.

उर्वरित कथांमधिल सर्कस संबंधातील लेख वाचकाना नक्की आवडतील. दुर्दैवाने दि ग्रेट रॉयल सर्कसवर आधारित माझे लेखन काळाच्या उदरात लुप्त झाले .त्यातला काही अंश तीन लेखांमध्ये शब्दबद्ध केलेला आहे.सर्कसच्या अद्भूतरम्य विश्वाची झलक या लेखांमधून अनुभवता येईल. खरंतर माझा लेखनारंभ “दि ग्रेट रॉयल सर्कस” वरील पुस्तक लेखनाने झाला. लेखनाचा वसा माझे बंधू शरद काळे- ज्याला आम्ही 'भाऊ' म्हणू ; त्यांच्याकडून मला लाभला.

माझे बंधू कोल्हापूरला महाविद्यालयीन शिक्षण घेताना मराठी लघुकथा हा प्रकार सर्वार्थाने समृद्ध करणारे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते लेखक वि.स. खांडेकर यांच्याकडे लेखनिक म्हणून रहायला होते. त्यांच्या परिसस्पर्शाने माझ्या बंधूना लेखनाची प्रेरणा मिळाली. वाचनाची गोडी आम्हा सर्व भावंडाना भाऊने लावली.

मातृभारती ऑन लाईन पोर्टलवर माझ्या सर्व पूर्व प्रसिद्ध कथा-लेख प्रकाशित झालेले असून सुमारे सत्तेचाळिस हजार वाचकांनी डाऊनलोड केलेले आहेत. माझा वस्तीची गाडी हा लेख फेसबुकवर प्रचंड लोकप्रिय झाला. ई साहित्य प्रकाशन वर माझे पूर्व प्रकाशित कथासंग्रह आणि नवीन गठित केलेले कथासंग्रह प्रकाशित करून या बदललेल्या समाज माध्यमात माझे अंशरुपे अस्तित्व रहावे आणि रसिक साहित्य प्रेमींची अल्पांशाने सेवा घडावी या साठी हा प्रपंच.

राजापूर तालुक्यातल्या दुर्गम आडखेड्यातले जीवन प्रत्यक्ष पाहिलेल्या डॉ. अंकुश सारंग यांची प्रस्तावना या संग्रहाला लाभावी हा दुग्धशर्करा योग आहे! डॉ. अंकुश सारंग हे माझे वर्गबंधू. १९६७ते ७० या काळात रोज जाते येते दहा किलो मीटर अंतर तुडवून ते अकरावी - मॅट्रिक झाले.त्यानंतर डी.एड्. प्राथमिक शिक्षक म्हणून सेवा सांभाळीत

मोठ्या जिद्दीने डॉक्टरेट पर्यंतचा पल्ला गाठला. मग महाविद्यालात इतिहासाचे प्राध्यापक व पुढे विभाग प्रमूख म्हणून सेवा केली. कोकणातले ओढघस्तीची जीवन आम्ही जगलो. त्या आठवणी आजही मनात ताज्या आहेत!.

प्रा.श्रीराम काळे.

एम्.ए. एम्.एड्. एम्.फिल्

# प्रस्तावना



इ.स,१९२०नंतर खऱ्या अर्थाने लघुकथा मराठीत आली. दिवाकर कृष्ण हे नव्या मराठी कथेचे प्रवर्तक. त्यानी कथेला कलाप्रकार म्हणून स्वतंत्र अस्तित्व असू शकते याची जाणीव निर्माण करून दिली. इ.स. १९४५-६० या काळात मराठी लघुकथेची उत्क्रांती झाली. गाडगीळ, माडगुळकर, खांडेकर या नवकथाकारानी मराठी कथा समृद्ध व कलासंपन्न केली. त्या कालखंडातल्या कथांमधून मानवी अस्तित्वाच्या वेदनांचे प्रत्यंतर येते.

ग्रामीण कथेतला माणूस जगण्यासाठी संघर्ष करतोय. समाजाल्या तळागाळातल्या माणसांचे चित्रण आणि त्यातून प्रामुख्याने संवेदशीलतेचे दर्शन मराठी ग्रामीण कथेत घडते. जीवनाच्या विविधलक्षी कथा ही नानारूपे घेवून व नाना स्वरूपाचे उन्मेष धारण

करून आज आविष्कृत होत आहे. अनेकविध जाणिवांचा तळ गाठून त्यातून अतिसूक्ष्म व पारदर्शक असे जीवन दर्शन घडवीत आहे .एकीकडे कथेचा विकास होत आहे तर दुसरीकडे विविध अंगानी तिचा विस्तारही चालू आहे.

प्रा. श्रीराम काळे यांच्या 'वस्तीची गाडी' या कथा संग्रहातील कथा सत्यघटनांवर आधारीत, हलक्या- फुलक्या , रोचक आणि मनोरंजक असून त्यामधून अनेक प्रश्नांची उत्तरे आपल्याला सापडतात. कथाकार म्हणून त्यांची रचनाशैली वैविध्यपूर्ण अशीच आहे. या कथासंग्रहात वाचकांचं मन गुंतवून टाकणाऱ्या विविधप्रकारच्या कथा आहेत. त्या ताज्या आणि टवटवीत आहेत. सर्व कथा वाचनीय आहेत. समाजजीवनातल्या निरनिराळया थरातल्या व्यक्तींचे प्रामाणिक चित्रण त्यात आहे. या कथासंग्रहात आठ कथा आहेत. आपल्या कथांमधून त्यानी तत्कालीन समाज मानसाचा वेध घेतलेला आहे.

सर्कस विश्वातली मुशाफिरी या कथेत सर्कसमध्ये काम करणारी माणसे कसरत कलेत तरबेज प्रामाणिक आणि समर्पण भावाने काम करणारी होती. त्यांचे सुरेख वर्णन लेखकाने या कथेत

केलेले आहे. तसेच सर्कसमधील विसंगतीचे अचूक व मार्मिक दर्शन वाचकाना घडविलेआहे. इ.स. १९७८ मध्ये एस्.टी. ने प्रवास करण्यासाठी राजापुरहून कुंभवडे व नाणार या दोन गावांसाठी एकच वस्तीची गाडी असायची. ती सायंकाळी ४ते ५वाजता राजापूरहून निघून सायंकाळी सहा- साडेसहा वाजता कुंभवडे करून पुढे नाणारला जावून तेथे वस्तीला थांबायची. दुसरे दिवशी सकाळी ७ ला सुटून परत कुंभवडे करून राजापुरला जायची. ड्रायव्हर कंडक्टर आपल्या जेवणाचा डबा सोबत न्यायचे. रात्री जेवण करून गाडीतच झोपायचे. क्वचित प्रसंगी त्यानी डबा नेलेला नसला तर स्थानिक लोक त्याना जेवण व सकाळचा चहा द्यायचे. वस्तीची गाडी ही एकुलती एक गाडी असल्याने येता जाता अनेक वेळा गाडी गाठायला लोकाना अक्षरश: तारेवरची कसरत करावी लागायची. पण ड्रायव्हर-कंडक्टर बेमुर्वतखोरपणे पॅसेंजरला टाकून जाणत नसत.एवढी आपुलकी त्याकाळी समाजात होती असे चित्रण लेखकाने रेखाटले आहे.

सर्कसवाले नारायणाराव वालावलकर या कथेत सर्कसमधील अनेक चढ उताराचे वर्णन केलेले आहे, बदलत्या काळानुसार मनोरंजनाची माध्यमं बदलली नी सर्कसकडे प्रेक्षकांचा

ओढा कमी झाला. तरी अजूनही नारायणरावांची सर्कस अस्तित्व राखून आहे. इ.स. १९७०-८०चं दशक म्हणजे ऑर्केस्ट्राची चलती असलेला काळ . याच काळात सी. रामचंद्रांचा 'भुलाये न बने' ऑर्केस्ट्रा खूप प्रसिद्ध होता. तो लोकप्रियही झालेला होता. काळाच्या उदरात ऑर्केस्ट्रा हा प्रकारच लुप्त झाला.

तीन कच्ची बच्ची पोरं काशीच्या गळ्यात टाकून लखू धनावडा मेला. दोन कलमं आणि जेमतेम पाच मण भात नी दीड दोन मण नाचणे पिकतील एवढी तुटपुंजी जमीन..... पण काशी डगमगली नाही. नवरा मेल्यावर तिने कोंबड्या पाळल्या. गावात गावडीणी कडे कोंबड्यांचा चांगला वाण होता. पण गावडीण त्यातली पिली कोण मागायला आला तर त्याला धुडबुडावून लावी. डोकेबाज काशीने त्या वाणाची अंडी न्हेवून ती गावठी कोंबडीच्या रोवणीत उबवून त्या वाणाची कोंबडी पैदास केली. काशीच्या या हिकमतीचे चटकदार वर्णन " बियाण्याचा कोंबडा" या कथेत आहे.

दि ग्रेट रॉयल सर्कसमधल्या प्रोफेसर अर्जुन मामा वालावलकर यांचे चिपांझी वर कसे निरलस प्रेम होते याचे वर्णन "दोस्ती चिपांझीशी" कथेत आहे. कथासंग्रहातील "नाणारचा टॉवर " कथाही

मनोरंजक आहे. नाणारमध्ये सूक्ष तरंग रिले टॉवर उभरताना घडलेल्या गमती जमती रोचक आहेत**. "लाल छत्री चहा"या लेखात आमच्या बालपणी लोकांच्या पसंतीला उतरलेल्या चहा पावडर च्या आठवणी वर्णिल्या आहेत. ही चहा पत्ती आजही आपला दर्जा राखून आहे हे मलाही नव्यानेच कळले. त्या चहाची चव अजूनही मला आठवते**.

"वस्तीची गाडी " हा कथासंग्रह अत्यंत समृद्ध आहे. या संग्रहातीक कथांमध्ये मानवी आणि तत्कालीन समाज जीवनाचे वेधक दर्शन वाचकाला घडेल त्याच बरोबर कोकणी जीवनशैलीचेही दर्शन वाचकाना घडेल असा विश्वास मला वाटतो. सदर पुस्तकाचे सुंदर आणि कथाना साजेसे मुखपृष्ठ प्रा. श्रीराम काळे यानी स्वत: तयार केले आहे. त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करून त्यांना हार्दिक शुभेच्छा देतो.

- प्रा. डॉ. अंकुश तुकाराम सारंग

# अर्पण पत्रिका



**वालावल , ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग चे सुपुत्र जगविख्यात “ दि ग्रेट रॉयल सर्कस”चे मालक कै. प्रो. नारायणराव वालावलकर यांच्या स्मृतीस सविनय अर्पण**

# अनुक्रमणिका

०१. सर्कस विश्वातली मुशाफिरी
०२. वस्तीची गाडी
०३. शिणुमा शिणुमा
०४. सर्कसवाले नारायणराव
०५. भुलाये न बने
०६. बियाण्याचा कोंबडा
०७. दोस्ती चिपांझीशी
०८. नाणारचा टॉवर
०९.लाल छत्री चहा

# १.सर्कस विश्वातली मुशाफिरी

सर्कस ही माझ्या माझ्या मर्मबंधातली ठेव. व्यवसाय पेशा निवडण्याची स्वायत्तता आणि संधी दैवाने मला दिली असती तर मी सर्कसमध्ये ट्रपीझ ॲक्टॅर होणे पसंत केले असते. १९७१ ते १९७५ दरम्याने रत्नागिरीला कॉलेज शिक्षण सुरु असताना रत्नागिरीला ग्रेट एशियन सर्कस दौऱ्यावर आलेली. मी त्यावेळी काकांकडे आगाशे वाड्यात बिनभाड्याच्या छोटेखानी खोलीत रहायचो . घुडे वठारात काँग्रेस भुवनच्या पिछाडीला सर्कसचा तंबू ठोकायाचे काम सुरु झाल्याचे वृत्त कळल्यापासून मी आणि माझा चुलतभाऊमुकुंदा, त्याचा मित्र गजा घुडे, आमच्याच वाड्यात नाटेकर भटजींकडे राहणारा आमचा सवंगडी (राजापुर भू चा) बाळा पाध्ये अशी आमची फाटावळ सकाळ संध्याकाळ मोकळ्या वेळी सर्कस तंबूकडे चकरा मारून तासन् तास तिथे चाललेले काम मोठ्या

एकाग्रतेने डोळ्यात साठवायचो. आमच्या या फेऱ्या बघून काकू गमतीने म्हणायची, “असे रिकामटेकडेपणी बघित राहता त्यापेक्षा काहीतरी जोडमोड करायची, सामान दे-घे करायची मदत केलीत तर सर्कसवाले फुकट सर्कस बघायचे पास देतात का प्रयत्न तरी करून बघा .... ” कदाचित तसा चान्स मिळाला असता तर पासांची अपेक्षाही न करता आम्ही मदत कार्य केले असते म्हणा. आठ दहा दिवसातच तम्बू उभा राहिला आणि पहिला शो जाहीर झाला. काकाना नाटक सिनेमा चे वावडे... पण सर्कस सुरु झाल्यावर चार सहा दिवसानी एका शनिवारी घरातल्या सर्वांसाठी सर्कसची तिकिटे काढूनआणली आणि आयुष्यात पहिली सर्कस मी बघितली.

काकूची बहिण विमल मावशी रत्नागिरीला मुरलीधराच्या देवळाजवळ रहायची .तिचे मिस्टर साठे काका भलतेच सर्कस वेडे. ते सर्कस बघून आले आणि एवढे खूश झाले की , सर्कसमधल्या कलाकाराना एका रविवारी चहा फराळाला यायचे पत्रद्वारे निमंत्रण त्यानी पाठविले, पत्र पोचले नी दुसऱ्या दिवशी सर्कसचे व्यवस्थापक त्याच्या बिऱ्हाडी भेटायला आल्रे. निवडक ५0/६0

सर्कस कलाकारांचा ताफा यायचा बेत ठरला. मंदिराच्या प्रशस्त परिसरात तात्पुरते छत ताणून मंगल कार्यालयातुन भाड्याने खुर्च्या आणुन चोख व्यवस्था करण्यात आली. फराळासाठी बटाटे पोहे, भजी , स्वीट डिश बेसन लाडु नी कैरीचे पन्हे असा फक्कड मेन्यू ठरला. सर्कसवाले यायच्यावेळी फराळ वगैरे द्यायला मदतीसाठी मी - मुकुंदा गेलेलो शिवाय साठे काकांचे काही मित्र सपत्निक हजर झालेले. ठरल्या वेळी सर्कस कलाकारांचा ताफा आला. अत्तर देऊन गुलाब पाणी शिंपडून आगत स्वागत झाले. सगळ्यानी आपापला परिचय करून दिला. सर्वांनी तारीफ करकरून फराळाचा आस्वाद घेतला. साठे काकांच्या अनोख्या प्रतिसादाने सर्व कलाकाराना अगदी गहिवरून आलं. निघण्यापूर्वी व्यवस्थापकानी ५0 फ्री पासेस काका नको नको म्हणत होते तरीही बळेच घ्यायला लावले. कुटुम्बियआणि मदतीला आलेल्या माणसांची मोजदाद करून नेमके २२पास ठेऊन उरलेले पासेस साठे काकानी परत केले. मला नी मुकुंदाला व्ही.आय.पी. बॉक्समध्ये बसून पुन्हा अगदी जवळून सर्कस बघायचा चान्स मिळाला.

१९८६ मध्ये मी देवगड बी.एड. कॉलेजमध्ये प्राध्यापक पदावर असताना लायब्ररीत रत्नगिरी टाईम्स मध्ये 'दि ग्रेट रॉयल सर्कस' चिपळूण ला आल्याची बातमी वाचली . मी त्या सर्कसबद्दल खूप ऐकून होतो . जाहिरात दाखवित माझे सहाध्यायी डॉ. गणेश पांग्रडकर सरना म्हणालो, "ही सर्कस असेतो जमले तर मी चिपळुणला मुद्दाम खेप करून सर्कस बघणार ! खूप मोठा परदेश दौरा करून आलेली आहे ही सर्कस." त्यावर डॉ. पांग्रडकर म्हणाले, "दिवस ठरवा, आपण दोघानीही जाऊया. तुम्ही एस्टी चा तिकिट खर्च करा,मी तुमची राहण्या जेवण्यासह व्हि.आय.पी. बॉक्समध्ये बसून शो बघायची सोय करतो. सर्कस मालक प्रताप वालावलकर हा माझ्या मिसेसचा चुलत भाऊ लागतो. सर्कस मधले स्टाफ आर्टिस्ट अनंतकाका, अर्जुन मामा हे पण आमच्या सासऱ्यांकडून पाव्हणे नी मामा पेंडुरकर हे मिसेसचे सख्खे मामा." आम्ही पहाटेच निघून दुपारी दीड पावणेदोनच्या सुमारास चिपळूण स्टँडवर उतरून बाहेर पडुन रिक्षा शोधीत असतानाच सर्कसची गाडी बाजाराच्या दिशेने येताना दिसली. सरानी हात दाखवताच गाडी थांबली. गाडीत मामा पेंडुरकर होते. तम्बूत गेल्या गेल्या जेवण झाले.

केवळ सर्कस वेडापायी मी चिपळूणला गेलो याचे सगळ्याना कोण अप्रूप वाटले. अर्जुन मामा म्हणाले, “आज ३ शो आसत, तुमका येदी हऊस असा तर आज तीनव शो व्ही.आय.पी. शीटवर बसान बगा. चाय तुमका थंयच पाठौन देवया. तीनव शोत एक पन ॲटम रिपिट होवचो नाय. नवचो शो सम्पलो काय पट्कन येवन जेवन जाया . नी लास्ट चो शो झालो की लॉजवर जावन झोपा. आमका तुमच्या सारके हौशी प्रेक्षक मिळाले ह्या भाग्यच म्हणाचा .”

मी खरोखरच त्या दिवशी सलग तिन्ही शो सलग बघितले. मामा आम्हाला व्ही.आय.पी बॉक्स मध्ये बसवून गेले. अधून मधून काका, अर्जुनमामा, मामा पेंडुरकर येऊन चहा, नाष्टा ,थंडा अशी सरबराई करून जायचे. सर्कसमधले विक्रेते फिरतच असायचे. त्याना जवळ बोलावुन हे “आमचे पाव्हणे आसत , काय मागतीत ता देवा नी बील घेव नुको. ” अशी ताकिद द्यायचे. डॉ. पांग्रडकर अधे मधे आत जाऊन यायचे पण मी मात्र नेट देऊन तीन्ही शो पूर्ण पाहिले. मी सोबत लेटर पॅड न्हेलेल, त्यावर समोर चाललेल्या आयटम्स च्या नोंदी केल्या.

मामा,काका भेटायला येत तेंव्हा कुतुहलाने माझ्या टिप्पणांवर नजर करीत . मी मला न कळलेल्या काही गोष्टी , सादर करणारांची नावे वगैरे विचारून घेई. ९ वाजता जेवायला बसलो असता मामा काका यानी पांग्रडकर सराना बोलून दाखवले की, काळे सरांसारखे हौशी सर्कसप्रेमी लोक क्वचितच भेटतात, ते काय काय नोंदी करताहेत, बहुतेक काही तरी वेगळा बेत आहे सरांचा. सर म्हणाले, “त्यांची भाषा शैली चांगली आहे. तुमचा नशिब आसात तर येकादो लेख बिख मिळता काय बगया.”

१२ चा शो सुटल्यावर आम्ही लॉजवर झोपायला गेलो. सर पडल्या पडल्या घोरायला लागले . मी मात्र 5 वाजे पर्यंत जागून रॉयल सर्कसच्या वैशिष्ट्यांचा आढावा घेणारा एक सुंदर लेख तयार केला. मी तयारी निशीच गेलो होतो. हातोहात लेख पाकिटात भरून सकाळी चिपळूण स्टँड वर पोस्त बॉक्स मध्ये रत्नागिरी टाईम्स च्या नावे टाकुन दिला.४ दिवसानी काही काटछाट न होता पूर्ण पान भर छापूनही आला. पेपरवाल्यानी सर्कसमधून घेऊन चार फोटो ही टाकले होते. आठवडा भराने सर्कस मालक प्रताप रावांचे सर्कसच्या लेटरहेडवर टंक लिखीत पत्र आले. लेख

सर्वानाच फार फार आवडला. सर्कस नवीन मुक्कामी जाते तेव्हा जहिरातीसाठी म्हणून तो नेहेमी वापरण्याजोगा संग्राह्य वाटला त्याना. त्याच बरोबर जमेल तेव्हा सर्कस जिथे कुठे मुक्कामी असेल तिथे यायच आमंत्रणही दिलेले होते.

दोन तीन महिन्यानी अनंत काका, मामा पेंडुरकर, प्रतापराव पांग्रडकर सराना कुठे तरी लग्न समारंभात भेटले. तेंव्हा सरांमार्फत मला ऑफर दिली. सर्कसचे दिवंगत मालक प्रतापरावांचे वडिल कै.नारायणराव यांची अतीव इच्छा होती कि, रॉयल सर्कस कारकिर्दीवर एखादे पुस्तक प्रसिद्ध करावे. त्यानी दोघातिघा नामवंत लेखकाना तशी ऑफरही दिली होती . अडव्हान्सही दिला होता पण त्यांच्या हयातीत ती इच्छा पुरी झाली नाही. हे काम मी करू शकेन असा तिघानाही विश्वास वाटला म्हणून मला विचारुन पहायची त्यानी गळच घातली. मला फार फार आनंद झाला. आपल्या कोकणातल्या या सर्कस वर आधारित लेखन करायला मी होकार दिला. सरानी यथावकाश माझा ‘हो कार’ प्रतापरावाना कळविला. त्या नंतर सुमारे चार महिन्यानी सर्कस गोव्यात दौऱ्या वर असताना प्रतापरावानी सर्कसमधिल ३ हत्ती वालावल येथे

लक्ष्मी नारायणाच्या मंदिरापर्यंत आणायचा बेत ठरविला. एकदा तरी कुडाळला सर्कस न्हेऊन खेळ करायची कै. नारायणरावांची इच्छा होती, पण सर्कसचा बारदाना एव्हढा मोठा कि, ही गोष्ट अशक्यच होती. म्हणून दौरा नाही तर निदान हत्ती तरी लक्ष्मी नारायणाच्या मंदिरापर्यंत नेऊ असे आप्पानी ठरविले. त्या निमित्ताने सगळे वालावलकर कुटुंबीय लक्ष्मी नारायणाच्या मंदिराजवळच्या घरात जमायचे होते.

या सोहोळ्यात पुस्तक लेखनाचा संकल्प नक्की करायचेही योजण्यात आले. या कार्यक्रमाला येणाऱ्यां मध्ये नारायण रावांच्या समग्र सर्कस कारकिर्दीचे साक्षिदार एस.जी. वालावलकर नावाचे वयोवृध्द गृहस्थ पुस्तक लेखनासंदर्भात माझ्याशी चर्चा करू इच्छित असल्याने मला आग्रहपूर्वक निमंत्रण देण्यासाठी सर्कस मालक प्रतापराव वालावलकर रविवार साधून पडेलला आले. अधूनमधून निरवड्याला प्लॉटवर त्यांची खेप व्हायची.त्यांचे एक कुरतडकर नावाचे स्नेही यांचा मोंड तिठ्यावर प्लॉट होता.त्याना सोबत घेऊन पडेलपर्यंत यायचा घाट घातला. तरळ्याला पेट्रोल पंपावर मालक पोकळेंकडे त्यानी माझी

चौकशी केली त्यावेळी आमच्या गावातलाच माझा शाळा सोबती दिलिप ठाकुरदेसाई पेट्रोल भरायला पंपावर गेलेला होता. तो पोकळेंच्या परिचयाचा... योग्य लिंक जुळली नी भर दुपारी दीडच्या सुमाराला आप्पा वालावलकर अगदी अनपेक्षितपणे आमच्या घरी आले. माझं जेवण नुक्तच उरकलेलं. कुर्मा पुरी नी श्रीखंड असा फक्कड बेत होता. मी विचारता क्षणीच कसलेही आढेवेढे न घेता आप्पा जेवायला बसले.खरतर तरळ्याला जेवण करून मग निघायचा त्यांचा बेत होता पण दिलिपची घरापर्यंत सोबत अनायासे मिळल्यामुळे तो बेत त्यानी रद्द केला. वालावलच्या कार्यक्रमाचा हेतू सांगुन ते मार्गस्थ झाले. त्यानंतरही ५/६ वेळा आप्पांच्या पडेलला खेपा झाल्या.

एस्. जी. वालावलकरांशी झालेल्या भेटीत सुमारे दोन तीन तास नारायणरावांच्या कारकिर्दीचा, त्यांच्या सर्कस जीवनाचा पट माझ्या अंत: चक्षुसमोर उलगडत गेला. ते कथन करीत असता मी झर झर नोंदी करीत गेलो. एस. जी.नी सर्कसच्या यशातले पाच मुख्य शिलेदार अनंत काका, दिगम्बर नी अर्जुन वलावलकर, मनोहर पेंडुरकर नी पाचवे सुरेश म्हापणकर

यांची मुलाखात घेवून पुस्तकात त्यांचा उचित उल्लेख करा अशी सुचना केली. तसेच कही अंत्यस्थ कटु बाबीसुद्धा त्यावर भाष्य किंवा शेरेबाजी न करता जशी तुम्हाला उमजेल तशी पण जरूर नमूद करा .असा सल्ला देताना महाभारतात सुद्धा अशा कटु बाबी गैर कृत्ये वाचायला मिळतात असा दाखला देऊन प्रतापराव वालावलकराना माझ्या लेखनात काही बदल न करता ते छाप अशी सक्त ताकिद दिली होती.

त्यानंतर सर्कस पुणे दौऱ्यावर असताना मी आठवडाभर सवड काढून मुक्काम ठोकला. माझी खूप इच्छा असूनही काका मामा प्रभ्रृतीनी मला माझ्या सुरक्षेच्या काळजी पोटी तसेच तंबुमध्ये आंघोळ - टॉयलेट सुविधा गचाळ असते म्हणून कधिही सर्कस तम्बूत वसतीला राहू दिले नाही. माझ्यासाठी नजिकच्या एखाद्या दर्जेदार लॉजवर खोली बुक करून दिली जायची त्याचे भाडे अर्थात सर्कस व्यवस्थापना कडून परस्पर दिले जायचे. मी सकाळी उठून चहा स्नान आवरीपर्यंत सर्कसची गाडी न्यायला आलेली असायची . लॉज मॅनेजरना सर्कसकडून तशा सुचना दिलेल्या असत आणि उजाडल्यावर

सर्कसमधून फोन करून विचारणा व्हायची. पुणे मुक्कामी अनंत काका, मनोहर मामा पेंडूरकर ,अर्जुन मामा एकेकाशी मुक्त गप्पा व्हायच्या अन मी त्यावर आधारीत टिपणे करून ठेवायचो. मनोहर मामा, अनंत काका मला काय महिती द्यायची त्या बद्दलचे मुद्दे टिपून ठेवत नी चर्चेच्या वेळी त्या नियोजनाप्रमाणे बोलत. सकाळी साडेसात ते दहा पर्यंत कसरतपटू , प्राणी यांचा रिंगणात सराव चाले . त्यावेळी त्या त्या ट्रुपचे व्यवस्थापक , ट्रेनर वेताची लवचीक छडी घेऊन असायचे नी अर्टिस्ट चुकला तर सप्पकन त्याचा प्रसाद संबंधिताला मिळायचा. लहान,-मोठा, स्त्री-पुरुष असा भेदभाव शिक्षा देणारा करत नसे . काही वेळा ते बघणंही नको वाटायच.

सरावाच्या वेळी आर्टिस्टला शिक्षा झाल्यावर माझा कसनुसा चेहरा बघून काका म्हणायचे , “तुमची म्हण असा ना ..... छडी वाजे छम छम..... शो करताना चूक झाली तर बघणारे आमची गय करनार नाय..... शो फ्लॉप जातले... एकदा नाव खराब झाला काय झाला... आमचा नी तेंचाव प्वॉट अवलंबून हा ..... ” प्राण्याना मात्र शिक्षा फक्त

खोडसाळपणा केला तरच अगदी क्वचीत करीत. त्याना आंजारून गोंजारून सराव दिला जाई, अर्थात काळीज चिरीत जाणाऱ्या चाबकाच्या फाड् फाड् आवाजांचा धाक असायचा. प्रतापराव एका दोन दिवसानी टेण्टवर फेरी करीत तेंव्हा अगदी जुजबी चौकशी करायचे.

अनंत काका,मामा पेंडुरकर,अर्जुन वालावलकर या त्रयीच्या बरोबरीने सर्कस डोलारा सांभाळणारा चौथा किंगपोल सुरेश म्हापणकर! छोटेखानी सर्कसचा डोलारा दोन मुख्य खांबांवर उभा असतो, त्याना किंगपोल म्हणतात. नारायणरावांच्या “ दि ग्रेट रॉयल” सारख्या भव्य सर्कस तंबूना चार किंग पोल असतात. अनंत काका, अर्जुन वालावलकर ही माणसं अल्पशिक्षित. मामा पेंडुरकर सुविद्य असले तरी जुजबी शिक्षण झालेले. ही माणसं कसरतकलेत तरबेज, प्रामाणिक आणि समर्पण भावाने काम करणारी होती. तरी प्रशासन, व्यवस्थापन,किचकट अकौटिंग यात तरबेज नव्हती आणि त्यांच्यावर असलेली जबाबदारी सांभाळून या गोष्टींकडे काटेकोर लक्ष देण्यासाठी त्याना फुसरतही नव्हती. काका - मामा - अर्जुनमामा ट्रॅपीझ,

मृत्युगोलात सायकल चालविणे, रिंग मास्टर म्हणुन काम करणे , नवीन उमेदवाराना कसरतींच प्रशिक्षण देणे व अडल्यावेळी क्लाऊनिंगसुध्दा करायचे. सर्कस परदेश दौऱ्यावर असताना सर्कसचा जनसम्पर्क, अकौंटस आणि प्रशासकीय विभाग सांभाळण्यासाठी नारायणरावांनी आपल्या नाते संबंधातल्या सुरेश म्हापणकर या उच्च विद्या विभूषित तरुणाला सर्कसमधे घेतला.

मी सर्कसवाल्यांच्या संपर्कात येण्यापूर्वी सुरेश म्हापणकर सर्कसमधिल जॉब सोडुन बाहेर पडले. खूप इच्छा असूनही माझी त्यांची प्रत्यक्ष गाठभेट झाली नाही. त्यांच्या कार्याची आणि कार्यशैलीची थोडिशी माहिती काका, मामा पेंडुरकर व अर्जुनरावानी सांगितली, ती मी स्वतंत्र लेखात नमूद करून पुस्तकात समाविष्ट केली. मात्र सुरेशजींचे कार्यविश्व आणि अनुभव हा रॉयल सर्कसच्या कारकिर्दितला एक वेगळाच पैलू होता. तसेच एवढ्या प्रदीर्घ कारकिर्दीचा आढावा घेताना अन्य तिघांच्या कथनातून सुटलेल्या कही दुव्यांची उकल, तपशिलात अचुकता आणायला किंवा योग्य बदल करता आला असता. माझे लेखन सुरु असल्या मुदतीत सर्कस रत्नगिरी दौऱ्यावर आणि नंतर

कुडाळ लाही खेळ करून गेली. त्या दरम्याने तर माझ्या सर्कस मुक्कामी असंख्य खेपा झाल्या आणि माहिती संकलन जवळ जवळ पूर्ण होत आले. रत्नगिरी मुक्कामी माझ्या काकाना शिकारखाना पहायला नेले होते.तसेच कांकाचे कुटुम्बीय. माझ्या दोन्ही बहिणींचे कुटुंबीय आणि माझे मित्र याना मी कॉलर ताठ करून व्हिआयपी पास वाटले. पुढे सर्कस कुडाळ दौऱ्यावर आलेली. तेंव्हा मी माझ्या कुटुंबीयांसह सर्कसच्या गाडीतून जाऊन सर्कस बघून सर्कस तंबूत भोजनाचाही आस्वाद घेतला. शरू, आदिश या माझ्या मुलानी ढिगभर स्टीकरआणुन भिंती, आरसे ,कपाटं मढवून काढली.

१९८६ मध्ये सुरु झालेला हा सिलसिला१९९४ मध्ये संपत आला. मी पुस्तकाची२५0 पृष्टांची हस्तलिखित फाईल, सुमारे सव्वाशे फोटोची फाईल सजवली. पुस्तकातला शेवटचा लेख पूर्ण करून पहाटे मी लिहित होतो त्याच जागी आडवा होऊन निद्राधिन झालो. एक विलक्षण स्वप्न पडले. कोणीतरी मला हलवून हलवून जागे करीत होते. कष्टाने च डोळे उघडले. तर साक्षात नारायणराव वालावलाकर समोर उभे! मी चरण स्पर्शकरून त्याना

बसायला सांगितले. ते लेखनाच्या टेबलवरच बसले. नी बोलु लागले. “ मी मुद्दाम तुम्हाला भेटायला आलो. तुमच्याकडे पुस्तक लेखन सुपूर्द केल्याच एस. जी. बोलले मला. मी फिरतीवर होतो म्हणून भेटायला विलम्ब झाला. आलो तर तुम्ही झोपलेले. तुमच्या लिखाणावर मी धावती नजर टाकली. तुम्ही खरच माझं स्वप्न साकार केलेत. पण.... ” नी बोलण थांबवून नारायणराव ढसढसा रडू लागले. मी दिङमूढ होऊन पहातच राहिलो. मिनीट भरात नारायणराव कोटाच्या खिशातला रुमाल काढून डोळे टिपीत म्हणाले, “एवढ्याचसाठी वाईट वाटल की, तुमचे कष्ट वाया जाणार बहुतेक..... तुमच्या या कामाची कदर आप्पा करीलसं वाटत नाही. हे पुस्तक त्याच्याकडून छापून होणं अशक्य. तो अत्यंत गलथान नी बेमुर्वतखोर आहे. तुम्ही इतक्या खेपा घातल्यात ते तुम्हाला एक पैसा तरी दिला का त्याने? मी, अनंत, मन्या त्याला सांगून सांगून हरलो. मला तुमच्या कष्टाची कदर आहे. हा चेक घ्या.... योग्य मेहनतान्याचा आकडा तुम्ही टाका . तुमचे कष्ट मी फुकट घेणारा नाही.” नी खिशातुन कोरा चेक काढुन त्यानी तो सही करून माझ्या हातात दिला. मी सद्गदित होऊन म्हणालो, “आप्पानी

मला या पूर्वी चार पाच वेळा रक्कम देऊ केली. पण मी आर्थिक कमाईसाठी हे काम केलेलं नाही. तुम्ही कोकणातले आहात याचा मला अभिमान आहे. सर्कस हा माझ्या जिव्हाळ्याचा विषय त्या प्रेमापोटी मी हे काम केल... हा चेक मी कधिच वटवणार नाही ” नारायणराव विस्फारित नेत्रानी माझ्याकडे पहात असता मी जागा झालो. पहाटेचे पाच वाजले होते.

स्वप्न दृष्टांतानंतर मला या विषयात स्वारस्यच उरल नाही. लेखन प्रत तयार आहे, तुम्ही निरवड्याला याल तेव्हा कळवा म्हणजे फाईल देईन अशा आशयाच पत्र मी आप्पाना लिहिलं. महिना भराने आप्पांच पत्र आल. ते बेळगावहून निरवड्याला यायचे होते. पत्रात त्यानी कळवलेल्या दिवशी (नोवेंबर १९९६ मध्ये ) दुपारी मी बाईक वरून निरवड्याला त्यांच्या प्लॉटवर गेलो. आप्पा दुपारी एक- दीड वाजे पर्यंत यायचे होते. मी वाट पहात मुक्कामाला थांबलो. प्लॉटवर देखरेखीला जोडप असायचं नी त्याना आप्पांनी पूर्व कल्पना दिलेली असल्याने त्यानी बंगला उघडून दिला नी मी हॉल मध्ये वाट पहात थांबलो. आप्पा ४ वाजता आले, सोबत त्यांचा मित्र उदयन होता. चहा

झाला नी मी फाईल काढली. पूर्वी लिहिलेले लेख त्यानी वाचलेले होते. नव्याने टाकलेले दोन तीन लेख त्यानी नजरे खाली घातले. फोटोंची फाईल पाहिली.फोटोंची संख्या जास्त होती पण सर्वच फोटो महत्वाचे असल्याने पृष्ट संख्या वाढली तरी सगळेच फोटो पुस्तकात समाविष्ट करायचे ठरले. त्यावेळी पुस्तकाची हस्तलिखित प्रत असलेली फाईल, फोटोंची फाईल नी सर्कसच्या दप्तरी असलेल्या रेकॉर्ड मधून मला संदर्भासाठी दिलेली जुनी वृत्तपत्रांची कात्रणं, हॅण्डबीलं. कच्ची टिपणं असलेली संदर्भाची फाईल अशा तिन्ही फाईल्स मी अप्पांकडे दिल्या. अप्पा सद्गदित होऊन बोलले,“तुम्ही हे खूप महान कार्य केलात. मी या पूर्वी आग्रह केला तरीही तुम्ही आजवर एक रुपया पण घेतला नाही. आता काम पूर्ण झालं, मानधनाचा आकडा तुम्ही सांगितलात तर मला आनंद होईल. मी तुमच्या कष्टांच मोल करू शकत नाही, तुम्ही आकडा सांगाल तेवढी रक्कम मी देतो.” मी या पूर्वी वेळो वेळी सांगत असे तेच उत्तर पुन्हा सांगून रक्कम घ्यायला नकार दिला. उदयननेही खूप आग्रह केला पण मी बधलो नाही. शेवटी

उदयन बोलला की पुस्तकाचं प्रकाशन होईल तेंव्हा सर्कसतर्फे तुम्हाला काहीतरी भेट देऊ ती मात्र तुम्हाला घ्यावीच लागेल.

त्यानंतर आप्पा एकदा देवगडला डॉ.पांग्रडकर सरांकडे आलेले असताना भेट झाली. तेंव्हा दोन चार महिन्यात पुस्तकाची रफ प्रिंट झाली की कळवतो बोलले. पण अप्रिल २00१ पर्यंत काहीच प्रगती झाली नव्हती , अन मी ही पुस्तकहा विषय डोक्यातून काढूनच टाकला होता. अप्रिल २00१ मध्ये मी आणि डॉ. पांग्रडकर बी.एड. चे पेपर तपासण्यासाठी कालिन्याला जात असता सकाळी गाडीतून उतरल्या उतरल्यावर आधी सौ. पांग्रडकर वहिनींच्या बंधूंकडे बांद्र्याला गेलो. आंघोळ वगैरे उरकून नाष्टा करताना गप्पांच्या ओघात पुस्तकाचा विषय निघाला. त्यावेळी दादा वालावलकरानीच पुस्तकाचं पुढे काय झालं म्हणून विचारलं . सर म्हणाले की, “काय सांगणार....काळे सरानी एक रुपयो न घेता लेखन करून दिला पन गेली ५/६ वर्सा आप्पाकडे फायली पडान आसत... आपा नायव् म्हनत नाय नी फुडे काय करितव् नाय..... ” हे ऐकल्यावर दादा वालावलकर जाम भडकले. “ हे शोभलं नाही प्रतापला ... तुम्ही पाच पन्नास हजार रुपये घेतले असतेत ना की किंमत

समजली असतीत्याला. मोफत की मुर्गी दाल बराबर.... मला आता भेटू देतच तो .... चांगले कान उपटतो त्याचे. ”

ऑक्टोबर २००२ मध्ये अकस्मात सर्कस मधून पत्र आलं.... पुस्तक छपाईला दिरंगाई झाल्याबद्दल माफी मागून येत्या महिन्याभरात काम सुरु करतो. माझं मॅजेस्टिक प्रकाशनशी बोलणं झालं आहे. मुद्रित प्रत तयार झाली की पाठवतो, असं आप्पानी लिहिलं होतं. बहुतेक दादा वालावलकरानी कान टोचलेले असावेत, असं मला वाटलं. पण दोन महिन्यानी २२ डिसेंबरला महाराष्ट्र टाईम्स मध्ये फ्रंट पेजवर फोटो सह बातमी प्रसिद्ध झाली. ‘दि ग्रेट रॉयल सर्कस चे मालक प्रतापराव वालावलकर यांचा आकस्मिक मृत्यू’.... मी सुन्नच झालो....... मी पुस्तकाची हस्तलिखित प्रत बनवली तेंव्हा १९९३ मध्ये झेरॉक्सची सुविधा दुर्लभ आणि फार खर्चिकही होती. माझ्याकडे मूळ हस्तलिखिताची कार्बनप्रत होती . ती घरात माडीवर कापडी पिशवीत भरून ठेवलेली होती. पण दुर्दैवाने पावसाळ्यात नेमकं त्या पिशवीवरच पाणी गळलं नी सगळे कागद भिजून चोथा झाला. नाही म्हणायला दोन वर्षापूर्वी मला फेसबुक वर सौ. निशी

वालावलकर यांचा मेसेज आला. त्याना मी सर्कसवर लिहिलेल्या पुस्तकाच्या काही प्रती हव्या होत्या. मी त्याच रात्री त्यानी दिलेल्या नंबरवर कॉल केला. अहो आश्चर्यम्.... सर्कसमधले ॲनिमल ट्रेनर अर्जुनमामांच्या त्या स्नुषा. आप्पाच्या सर्कसवर काळे सरानी पुस्तक लिहिल्याचं अर्जुनमामांच्या तोंडून त्यानी ऐकलेलं...... मामांच देहावसान झाल्यावर दोन तीन वर्षांनी मामांच कपाट आवरताना अकस्मात मी मामांवर लिहिलेला "दोस्ती चिपांझीशी" या लेखाची कार्बन कॉपी त्याना मिळाली.

लेखावर माझं नाव होतं. मी देवगड कॉलेजमध्ये प्रोफेसर असल्याच अर्जुनमामा त्याना बोलले होते. पण माझ्याशी संपर्क साधायचा दुवा त्याना मिळाला नव्हता. एके दिवशी अकस्मात फेसबुकवर त्याना माझ ं नाव मिळालं. प्रोफाईल उघडल्यावर त्याना हवा असलेला प्रा. श्रीराम काळे सापडला नी त्यानी मेसेज दिला. मी पुस्तकाची चित्तरकथा सांगितली. सर्कसचे काही संदर्भ स्मरणात असतील तर त्याच पुनर्लेखन मी कराव अशी विनंती त्यानी केली. अर्थात ब-याच घटना/ प्रसंग अद्यापही आठवत असले तरी स्थलकालाचे अचूक संदर्भ मिळाल्याशिवाय ते यथातथ्य स्वरूपात

मांडण    अशक्य आहे. तशी माहिती    देवू शकणा-यां पैकी फक्त एकच व्यक्ती हयात आहे. पण ती जराजर्जर अवस्थेतआहे. तो प्रयत्न आता निव्वळ अशक्य.



(सर्कस केनिया दौऱ्यावर असताना )

चिपांझी ट्रेनर अर्जुनमामांवरचा मूळ लेख त्यांच्या संग्रही होता. ते निवर्तल्यावर त्यांची सूनबाई सौ. निशी वालावरकर याना माझ्या त्या हस्तलिखित लेखाची कार्बन कॉपी मिळाली. त्यावरचे माझे नाव वाचून त्यानी फेसबुकवर माझा शोढ घेवून माझ्याशी संपर्क करून त्या लेखाची स्कॅन केलेली प्रत मला पाठवली. म्हणून तेवढा एक मूळ लेख मात्र मला मिळाला. त्याचं फेर लेखन करून काही फोटो मिळवून तो यथाकाल किरातमधून प्रसिद्ध करीन. “आम्ही सर्कसवाले ” हे माझं पुस्तक लेखन ही एक निरर्थक उचापत ठरली. पण लेखनाच्या निमित्ताने केलेली मुशाफिरी मात्र माझ्या अंत:करणात कायमच घर करून राहिली .

# २.वसतीची गाडी

जून ७८ ते मे ८६ या कालावधित मी राजापुर तालुक्यात कुंभवडे हायस्कूल मध्ये शिक्षक म्हणून आणि नाणार हायस्कूल मध्ये हेडमास्तर म्हणून नोकरी केली. त्या काळात राजापुर तालुक्यातल्या बऱ्याच गावांमध्ये दिवसातून फक्त एक एस्टी असायची. संध्याकाळी ४ ते ५ वाजता बस राजापुरातून सुटायची. ती सायंकाळी सहा- साडेसहा पर्यंत गावात पोचायची. ती रात्री त्या गावी वस्तीला राहून दुसरे दिवशी सकाळी ७वाजता त्या गावाहून राजापुरला निघायची. ड्रायव्हर कंडक्टर आपला जेवणाचा डबा सोबत न्यायचे. रात्री जेवण करून गाडीतच झोपायचे. संध्याकाळी गाडी वरच्या डेपोतून सुटली की बाजारात नदी पात्रात जावून पुन्हा वळून यायची. या दरम्याने ड्रायव्हर कंडक्टर आपल्या बिऱ्हाडा लगतच्या स्टॉपवर गाडी थांबवून आपला जेवणाचा डबा घ्यायचे. काही वेळा त्यांचे कोणी कुटुंबीय जेवणाचा डबा द्यायला येत असत तर

काही वेळा ड्रायव्हर कंडक्टर गाडी थांबवून स्वत: जावून डबा घेवून येत असत. गाडी ज्या गावी मुक्कामी थांबायची त्या स्टॉप जवळच्या एखाद्या घरातून पाण्याची कळशी नी तांब्या ड्रायव्हर कंडक्टर ना देण्याचा प्रघात असे.

क्वचित एखाद्या घरातून परिचयाच्या ड्रायव्हर कंडक्टर ना रात्री लोणचं, भाजी आमटी दिली जायची. क्वचित एखादा घर मालक त्याना सकाळी आवर्जून चहा द्यायचा. नाणारला गाडी मुक्कामी थांबे तिथे पेडणेकरांच्या घरातून रोज रात्री ड्रायव्हर कंडक्टरना जेवण वाढले जाई नी सकाळी चहा टोस्ट / बटर नेमाने दिला जाई. ही बाब इतकी सर्वश्रुत होती की, नाणारला येणारे ड्रायव्हर कंडक्टर जेवणाचा डबा आणित नसत. नवीन ड्रायव्हर कंडक्टर्सना ड्युटी लागली तर कंट्रोल रूम मधले कर्मचारी त्याना या गोष्टीची कल्पना देत. जेवणात हुकमी मच्छी- अंड्याची कढी/ मटण यापैकी एखादा प्रकार नक्की असायचा. त्यामुळे ब्राह्मण ड्रायव्हर कंडक्टर असेल तर तो मात्र आपला जेवणाचा डबा स्वत: घेवून जात असे. सणाच्या काळात जादा मुंबई गाड्या सोडल्या जात तेंव्हा

ड्रायव्हर कंडक्टर किंवा बस वेळेवर उपलब्ध झाली नाही तर पाच वाजता सुटणारी एस्टी रात्री आठ नऊ इतक्या उशिराने सोडली जाई पण कधिही वस्तीच्या एस्टीची फेरी रद्द होत नसे.

त्यावेळी कुंभवडे नाणार दोन गावांसाठी मिळून एकच गाडी असायची. ती गाडी कुंभवडे तिठ्यावरच्या टॉवर जवळून सात मैल दूर कुंभवडे आग्रेवाडीपर्यंत जावून तिथून माघारी वळून आल्यावर कुंभवडे तिठ्यापासून सुमारे साडेचार पाच मैल अंतरावर मयेकर मांगर जवळ पोचल्यावर तिथून सात ते आठ मैल लांब नाणार ईंगळवाडीत तात्या पेडणेकरांच्या घरासमोर वसतीला थांबत असे. दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा आलेल्या मार्गाने ईंगळ वाडीतून कुंभवडे आग्रेवाडी पर्यंत वरवा मारून मग राजापुरला रवाना होत असे. तेंव्हा नाणारात हॉटेल नव्हते. पण कुंभवड्याला मांडावर म्हणजे मराठी शाळेसमोर गोविंदबुवा तांब्याचे आणि हरचलीतल्या भंडाऱ्याचे अशी दोन हॉटेलं होती. नाणारातून गाडी मांडावर आली की ड्रायव्हर कंडक्टर हमखास गाडी थांबवून चहा घ्यायला उतरत

असत. संध्याकाळीही राजापुरातून आल्यावरही ड्रायव्हर कंडक्टर कुंभवडे मांडावर थांबून चहा प्यायला जायचे.

गाडी कुंभवडे आग्रेवाडी स्टॉपवरून माघारी वळायची. त्या ठिकाणी नाणारातील देसाई वाडी, मधली वाडी, वरची वाडी नी भट वाडी इथली मंडळी उतरत असत. ही नाणारची मंडळी आगरेवाडी-लोंढे वाडी मार्गे सुमारे अर्ध्या तासाची चाल मारून नाना पोलिस पाटील यांच्या घराजवळ व्हाळ पार करून गाडी येण्याआधी अर्धातास आपले घर गाठीत. तसेच सकाळी राजापुरला जाताना नाणारच्या चार वाड्यांमधली माणसे नाणारातून गाडी सुटली की नाना पोलिस पाटलांच्या घराखाली उतरणावर व्हाळा पलिकडे जावून आग्रे वाडीत जावून गाडी पकडीत असत. नाणारच्या पाळेकर वाडी, धनगर वाडी, मोंडे वाडी इथली मंडळी आपल्या स्टॉपवर गाडीत न बसता अर्धातास चाल मारून कुंभवडे तिठ्यावर टॉवर जवळ स्टॉप वर गाडी पकडीत.

गाडीत नाणार कुंभवड्यातले कोणीतरी नाना, दादा, भाऊ अशी खोत मंडळी किंवा अन्या कोणी पैसेवाली असामी हटकून असायची. यापैकी कुणी ना कुणी ड्रायव्हर कंडक्टरना आग्रह करून

चहाला नेलेले असे . त्यामुळे चहाचे पैसे तेच देत . खाडपट्ट्यातल्या गावानी असणारी तालेवार, पैसेवाली, तालुक्यातल्या राजकीय वर्तुळात उठबस असणारी मंडळी, राजापुरला नेवून मासे विकणारे मुस्लीम पुरुष किंवा मासेवाल्या, गावातले किराणा दुकानदार यांचा ड्रायव्हर कंडक्टरशी लागाबांधा असे त्यांच्यासाठी येता जाता गरजेनुसार गाडी जादावेळ थांबवून धरली जायची. क्वचित कोणी तालेवार असामी यायची असे अशा वेळी त्यांचा गडी आगावू स्टॉपवर येवून अमुक तमुक दादा- भाऊ येतहत असे सांगून संबंधित गृहस्थ येईपर्यंत गाडी थांबवून धरीत असे. आणि यात काही गैर आहे असे गाडीतल्या पॅसेंजरनाही कधीच वाटत नसे.

एक असेच भाऊ- त्यांची तालुक्यातल्या राजकीय वर्तुळात उठबस होती. ते राजापुरला जाताना वा येताना कधीच वेळेवर येत नसत. त्यांच्या गड्याने कंडक्टरला वर्दी दिल्यावर पंधरा वीस मिनीटानी भाऊंची स्वारी शर्ट खांद्यावर टाकून वाटेने येता येता पान जमवीत आरामात यायचे. त्यांची लेदरची बॅग आणि खचाखच सामान भरलेली कापडी पिशवी घेवून दोन गडी सोबत असायचे. ते आले की १ नंबरच्या आमदार सीटवर कोणीही तालेवार बसलेला असला तरी

कंडक्टर त्याला उठवून भाऊना सीट खाली करून देत असे. हे गृहस्थ राजापूरहून परत येत त्यावेळीही अशीच रखडंती व्हायची. पण ड्रायव्हर कंडक्टरला त्यांचा उपराळा असे. त्यांच्या कडे रेशन दुकानचा मक्ता होता. गाडीवर येणाऱ्या ड्रायव्हर कंडक्टरना महिनो माल साखर, तांदूळ, गहू रेशनच्या दराने दिले जात. मासेवाले

फडफडीत मासळी मोफत देत असत .

मी हायस्कूलला हजर झाल्यावर सुरुवातीच्या महिन्यात आर.डी.सी.सी. बॅन्केत सॅलरी अकौण्ट उघडायला राजापुरला गेलेला होतो. त्यावेळी सकाळी जाताना भाऊ येई पर्यंत पंधरा वीस मिनिटं गाडी थांबून राहिली होती. संध्याकाळी परत येताना गाडी नदी पात्रात थांबली. पोस्टाचा रनर टपालाची बॅग टाकून गेला. पाच मिनीटानी पेपरवाल्या नाना परांजपेंचा गडी पेपर देवून गेला नी " गाडी अर्ध्या तासाने सुटेल " असे सांगून कंडक्टर खाली उतरून गेला. त्यावेळी नाणारात तीन आणि कुंभवड्यात चार असे लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स पेपर कंडक्टर मार्फत पोच केले जात. उन्हाळयात नदीपात्र कोरडे झाल्यावर एस्टी जवाहर चौकात न वळवता खाली नदी पात्रात आणून वळवली जायाची. तिथे कलिंगड वाल्याचे ,

गाडगी मडकी विकणाऱ्या कुंभाराचे दुकान, उसाच्या रसाचे दुकान आणि दोन हॉटेल असायची. कंडक्टर उतरला तेंव्हा गाडीत बसलेल्यापैकी कुणीतरी बोलला, “ हां .....बरोबर आज भाऊ इलेले हत .... आता येवड्यात गाडी सुटॉची नाय...... रम्या चल, बाजारात्सून फिरॉन येवया.” त्याचा अंदाज खरा ठरला दीड दोन तास उलटल्यावर हाश्शऽऽ हुश्श करीत भाऊ आले. सीटवर टेकल्या टेकल्या शर्ट काढून टाकीत नॅपकीन फिरवीत भाऊ वारा घ्यायला लागले.

सकाळी राजापुरहून औषधे किंवा अन्य काही वस्तू आणायची असे, राजापुरच्या पोस्टातून रजिस्टर करायचे असे अशी मंडळी गाडीत कोणी परिचित विश्वासू आहे का ? ते टेहेळीत आणि पैसे पिशवी नी यादीच कागद/ प्रिस्क्रिप्शन संबंधिताकडे देत. ओळखीचे अगदीच कोणी नसले तर दादा- भाऊ असा कोणातरी तालेवार किंवा गावतल्या शाळेवर असलेल्या शिक्षकांपैकी कोणी असला तर आपणहून ते काम पत्करित असे. एक तारखे नंतर पगार आणायला कुणी ना कुणी शिक्षक राजापुरला हुकुमी जात असे . अशावेळी त्याच्याकडे कुणा ना कुणाच्या किमान चार – पाच तरी याद्या असायच्या. सणासुदीच्या काळात तर गाडीत

अशीकाही गर्दी असे की अडीच तीन तासांच्या त्या प्रवासात जीव अगदी मेटाकुटीला येत असे.

आम्ही कामानिमित्त कोल्हापूर, रत्नागिरीला जायचो. कोल्हापुरहून येणारी गाडी चार वाजेतो राजापुरला यायची. रत्नागिरीहून दोन वाजता सुटणारी वेंगुर्ला गाडी साडेचार पाच वाजेतो राजापुरला वरच्या डेपोत यायची तेंव्हा वसतीच्या गाड्या लागलेल्या असायच्या. क्वचित गाडी उशिरा आली तर पॅसेंजर कंट्रोल केबिनवर चौकशी करी. संबधित गाडी डेपोतून रवाना झालेली असली तरी ती बाजारात जावून वळून येई पर्यंत सहज तासभर वेळ मोडे. मग तो प्रवासी वरच्या डेपोतून फर्लांगभर अंतरावरच्या ऑक्ट्रॉय नाक्याजवळ जावून थांबायचा. सगळ्या गाड्या बाजारातून वळून ऑक्ट्रॉय नाक्या जवळ आल्यावर मग तिथून नियोजीत गावी रवाना होत. कुंभवडे नाणार आणि सागवे या एकाच रूट वर जाणाऱ्या असल्याने प्रवाशाना त्यांची नियोजीत गाडी चुकली तरी तिन पैकी एखादी गाडी मिळाली तरी

चाले. कुंभवडे प्रवासी नाणार टॉवर जवळ उतरून दीड तास चाल मारून गाव गाठू शकत असे. तर नाणार, सागवे प्रवासी नाणार मायक्रो वेव्ह रिले टॉवर जवळ उतरून किंवा पुढे मयेकर मांगर स्टॉप वर उतरून दीड पावणेदोन तास चाल मारून नाणार किंवा सागवे गाठू शकत असे.

यापुढचा कहर म्हणजे कुंभवड्यापासून सहा ते सात मैल अंतरावर असलेल्या तारळ गावच्या लोकाना हीच गाडी होती. मात्र त्याना जीवघेणे चढ-उतार पचवून कुंभवडे मांडापर्यंतचे मकाण मारावे लागे. काहीवेळा निघायला उशीर झाला तर गाडी चुकेल की काय ही धास्ती...... थंडीच्या दिवसात उशिराने दिवस उगवतो अशावेळी निघताना अंदाज चुके. बहुसंख्य लोकांकडे घड्याळ नसायचे. जानपद माणसं कोंबडा आरवण्याच्या आडाख्या वरून वेळेचा अंदाज बांधीत तो चुकायचा नी घोळ व्हायचा.तरणे ताठे पोरगे छाती फुटेस्तो धाव मारून मांडा च्या अलिकडे हाकेचे अंतर गाठल्यावर जोराने कुकारे मारीत. कदाचित गाडी सुटायच्या बेतात असेल तर त्यांचे कुकारे ऐकल्यावर लोक येईस्तो गाडी थांबवून धरीत असत. ते

आल्यावर अजून काही बायका माणसे म्हातारे कोतारे येताहेत असे कळल्यावर ड्रायव्हर कंडक्टर खाली उतरून तारळेतले लोक येईपर्यंत गडग्यावर बसून गप्पा मारीत टाईम पास करीत. पण बेमुर्वतखोरपणे पॅसेंजरना टाकून निघून जात नसत. रात्री गाडीला उशिर झाला तर हरचली, तारळ मधले लोक घरच्या माणसाना न्यायला फाणस घेवून अर्ध्या मकाणा पर्यंत येवून वाट बघीत रहात. त्यावेळी सधन लोकांकडे तीन सेलच्या, चार सेलच्या बॅटऱ्या हटकून असायच्या. सड्यावर धुमाळ वाडी, धनगर वाडी, मोंडे वाडी या भागातून येणारी माणसेही उशीर झाला नी लांबून गाडी येताना दिसली की कुकारे मारून. हातातले रुमाल फडकी फडकवीत थांबायचे इशारे करीत. मोकळया फोंड्या सड्यामाळांवर लांबून धाव मारीत येणारी माणसं दिसली की पॅसेंजर कंडक्टरला सांगत असत नी ती लोक येईतो गाडी स्टॉपवर थांबून रहात असे.

जून८१ मध्ये मी नाणार हायस्कूलला हेडमास्तर म्हणून हजर झालो. काही कामानिमित्त राजापुरला जायच असे तेव्हा सकाळी लौकर उठून आंघोळ वगैरे उरकून सकाळी पावणे सात वाजता गाडी गाठायचे म्हणजे मोठीच सर्कस करावी लागे. तरी गाडीचा स्टॉप मी रहात असे

त्या घरापासून दोनेकशे पावलं एवढ्या अल्प अंतरावर होता. गाडी सुटायची निश्चित वेळ ठरलेली नसे. गाडी वसतीला थांबे त्या मुसलमान वाडीतून मासे नेणारे त्यांच्या अडचणीच्या वेळी गाडी थांबवून ठेवून उशीर करीत. काही वेळा एखादा ड्रायव्हर - कंडक्टर वक्तशीर असेल तर गाडी सकाळी साडे सहालाच सुटायची. एखादा हालमें खुशाल ड्रायव्हर - कंडक्टर असेल तर गाडी आठ वाजे पर्यंतही सुटत नसे. मला कधी गाडी गाठायची असेल तेव्हा विश्वनाथ शिपाई सहा वाजण्या आधीच मला उठवायला यायचा. पण एकदा थंडीच्या दिवसात गंमतच झाली. त्या काळात रात्री मोठ्या असतात. सात वाजेपर्यंत काळोख असतो. असंच एका दिवशी राजापुरला जायचं होतं. थंडीचे दिवस असल्यामुळे विश्वनाथ ला यायला उशिर झाला.मी उठलो तेव्हा साडेसात वाजले होते. मी लगबगीने चहाही न घेता स्टोव्हवरच पाणी तापत लावलं. माझी आंघोळ सुरु असताना विश्वताथने चहाचं आधण ठेवलं. मी कसेबसे चार तांब्ये ओतून अंग पुशीत बाहेर आलो. अंडर वेअर बनियन चढवीत असतानाच गाडीचा आवाज आला.

मी आवरून जाई पर्यंत गाडी थांबवून ठेवायची म्हणून विश्वनाथ स्टोव्ह बंद करून स्टॉपवर धावला. त्याने हात दाखवून गाडी उभी केली. सर येताहेत म्हणून कंडक्टरला सांगितल. नशिबाने माझ्या चांगल्या परिचयातलेच कुवेसकर कंडक्टर होते. ते हसत हसत म्हणाले, “तू आदी जा नी दोन कोप चाय ठेव.आज माका चांगली चाय भेटली नाय.मी डायव्हरांक घेवन दोन मिनिटात येतय्.... तू मस्त घनघनीतशी चाय कर , दुदाची साय सगळी माज्या कोपात वत . नायतरी सर दिवसाडी नायच हत..” मी दाराबाहेर पडत असता असता विश्वनाथ आला. “सर, आज कुवेसकर कंडाक्टर हत.ते नी डायव्हर चाय खावक् येतहत” माझा जीव भांड्यात पडला. विश्वनाथने झटपट चहा ठेवला. त्या दिवशी मी चहा न घेताच बाहेर पडलो होतो. पण गिरमाईच्या कृपेने चहा घेवून आरामात निघता आलं.



माझ्या सहा वर्षांच्या नाणार वास्तव्यात तीन चार वेळा गाडी थांबवून धरून गाठावी लागली. गाडीत परिचयाची मंडळी असत ती कंडक्टरना विनंती करून थांबायला लावीत. वसतीच्या गाडीवर येणाऱ्या ड्रायव्हर कंडक्टरनाही या गोष्टी अंगवळणी पडलेल्या होत्या. गोरे कंडक्टर नी देवधर ड्रायव्हर नाणारला येत तेव्हा पुष्कळदा रात्री मला भेटायला येत. डबा आणलेला नसेल तर शाळेसमोर

स्टॉपवर गाडी उभी करून शिपाया कडे आपण आज डबा आणलेला नाही, रात्री जेवायला येणार आहोत असा आगावू निरोप देवून ठेवीत नी रात्री जेवायला येत.

मी आणि आमच्या संस्थेचे उपाध्यक्ष उल्हासभाऊ शाळेच्या कामाला रत्नागिरी ला जायचो तेंव्हा दिसोदिशी परत यायचे असले तर जाताना कंट्रोल रूम मध्ये सप्रे साहेबाना सांगून जाऊ. आमचे उपाध्यक्ष उल्हास भाऊ त्यांचे स्नेही. तीन च्या रत्नागिरी वेंगुर्ला गाडीला यायला उशिर झाला तरी आम्ही येईतो सप्रे साहेब गाडी सोडू देत नसत. एकदा वेंगुर्ला गाडी पाली पोस्ट ऑफ़िस जवळ ब्रेकडाऊन झाली. ड्रायव्हर लांज्याला जावून मेकॅनिक घेऊन आला . त्याने गाडी दुरुस्त केली. या झेंगटात दोन तास मोडले. आम्हाला राजापुरला पोचायला आठ वाजणार म्हणजे वसती राजापूरला नवाळे लॉज वर करावी लागणार नी दुसरे दिवशी मुंबई सागवे गाडीने मयेकर मांगरला उतरून नाणार गाठी पर्यंत दुपारचे अडीच तीन वाजणार हे ठरलेले. पण रात्री पावणे आठला वेंगुर्ला गाडी राजापुर

डेपोत गेली तेव्हा सप्रे साहेब आले. नाणार गाडी नदीपात्रात थांबलेली आहे असे त्यानी उल्हास भाऊना सांगितले.

साडेपाच पर्यंत वेंगुर्ला गाडी आली नाही म्हणून सप्रे साहेबानी लांजा डेपोला फोन करून चौकशी केली. आमची वेंगुर्ला गाडी आठ वाजेतो येणार याचा त्याना अंदाज आला. त्या दिवशी वसतीच्या गाडीवर ड्यूटी लावलेल्या नियोजीत ड्रायव्हरांपैकी एकजण रजेवर गेल्यामुळे पर्यायी ड्रायव्हरची व्यवस्था करावी लागली होती. वसतीला जाणाऱ्या पंचवीस तीस गाड्यांपैकी कोणत्या तरी एका गाडीला उशीर होणारच होता. तो अनायासे आमच्या पथ्यावर पडला. आम्ही रिक्शा करून बाजारात गेलो नी जवाहर चौकात उतरून नदी पात्रात थांबलेल्या नाणार गाडीजवळ जावून गोरे कंडक्टरना आम्ही आल्याची वर्दी दिल्यावर रात्री आठ वाजता नाणार गाडी राजापुरहून सुटली .

ही रोज अपडाऊन करणाऱ्या गाडीची कथा..... तर मुंबई गाडीची अवस्था याहून भीषण असे. एकतर चार पाच गावांसाठी मिळून

एकदिवस आड मुंबई गाडी असे. मुंबईहून आलेली गाडी ज्या कुठच्या शेवटच्या थांब्यावर जाई तिथे गेल्यावर परतीचा बोर्ड लावून मुंबईला रवाना होत असे. मुंबईहून गावात येण्याची अधिकृत वेळ सकाळी आठ तीस असली तरी दुपारी अकरा – बारा तर कधी कधी अडीच तीन वाजे पर्यंत गाडी यायची. लांबच्या वाड्या वस्त्यांवरून येणारी माणसं सोबत जेवणाचे डबे तरी आणित किंवा सामान आणून स्टॉपवर जेवण रांधून खाण्याची तयारी ठेवीत असत.

पॅसेंजर भरून मुंबईला जाताना राजापूर डेपोत गेल्यावर पॅसेंजर सोबत असलेल्या सामानाचे वजन करून लगेज चार्ज ठरवी पर्यंत सहज अडीज ते तीन तास मोडत. वस्तीची गाडी ही माझ्या मर्मबंधातली ठेव आहे. एका गोष्टीचा मला आवर्जून उल्लेख करायचा आहे. सात आठ वर्षाच्या माझ्या कुंभवडे वास्तव्यात माझ्या असंख्य राजापूर खेपा झाल्या असतील. वसतीची गाडी ही एकमेव असल्याने येता जाता अनेक वेळा गाडी गाठायला तारेवरची कसरत करावी लागली पण बेमुर्वतखोरपणे पॅसेंजरला टाकून जाणारा अशी ख्याती असणारा राजापुर डेपोतला एकही ड्रायव्हर किंवा कंडक्टर मला सांगता येणार नाही.

a

# ३. शिणुमा शिणुमा




१९७८ मध्ये बी.एड्. होवून आल्यावर राजापूर तालुक्यात विजयदुर्ग खाडी काठावरच्या कुंभवडे या अति दुर्गम गावात शिक्षक म्हणून माझे करियर सुरू झाले.खाडी पलिकडे मुटाट, मणचे हे गाव सुद्धा संपर्क सुविधेचा अभाव असलेलेच पण इथला समाज बऱ्यापैकी सुधारलेला. खाडीपलिकडे कुंभवडे, नाणार, तारळ, उपळे या गावांमध्ये

दिवसभरात फक्त एकदा, संध्याकाळी राजापुर डेपोतून वसतीची गाडी यायची. ती रात्री मुक्कामी थांबून सकाळी राजापुरला जायची. ह्या गावात अजून सुधारणांचे वारे वाहू लागलेले नव्हते.कुंभवड्यात दोन वर्षे काढल्यानंतर शेजारच्याच नाणार गावात नवीन हायस्कुल सुरु झाले नी मला तिथे मुख्याध्यापक म्हणून संधी मिळाली. मी नाणार हायस्कुलला दाखल झालो. त्या वर्षी दहावी एस्.एस्.सी. च्या नवीन बदललेल्या इंग्रजीच्या पुस्तकात टेलिव्हिजन नावाचा धडा होता. हा धडा शिकवायला सुरुवात केल्यावर माझ्या लक्षात आलं की वर्गातल्या एकाही मुलाने टेलिव्हिजन बघितलेला नव्हता.

आज या गोष्टींवर कोणी विश्वासही ठेवणार नाही. पण त्या वेळी माझ्या वर्गातल्या जवळ जवळ वीस मुलानी रेडिओ, टेपरेकॉर्डरही जवळून पाहिलेला नव्हता. आश्चर्याची बाब म्हणजे त्यावेळी स्टाफवर असलेल्या आम्हा पाच शिक्षकांपैकी कोणाकडेच रेडिओ किंवा टेप रेकॉर्डरही नव्हता. आमचे क्लार्क पेडणेकर हे सधन घरातले त्यांच्या घरी या दोन्ही वस्तू होत्या. मी त्याना सांगून दुसऱ्या दिवशी शाळेतल्या सगळयाच मुलाना दोन तास एकत्र बसवून रेडिओ आणि टेपरेकॉर्डर वाजवून दाखवला. संपूर्ण शालेतली फक्त दोन मुलं जी मुंबई कणकवली

इकडे फिरून आलेली होती त्यानी टी. व्ही आणि सिनेमा बघितलेला होता. त्यावेळी मी ठरवलं की ह्या मुलाना एकदा सिनेमा दाखवायचाच. अर्थात ही बाब प्रत्यक्षात आणणं महाकठिण होतं.

हे कसं काय जमवायचं याचा विचार करताना मला अकस्मात आठवलं.१९७१ते७५दरम्याने मी रत्नागिरीला कॉलेज शिक्षणासाठी असताना आम्ही रहायचो त्या आगाशे वाड्यात भगवान किल्लेकर यांचं रेडिओ दुरुस्तीचं दुकान होतं. ते हरहुन्नरी आणि प्रेमळ होते. मी आर्टस् ला असल्यामुळे दुपारनंतर मोकळीक असे. मग अधून मधून मी किल्लेकरांच्या दुकानात बसून रेडिओ, ट्रांझिस्टर लावून गाणी ऐकत असे. त्यांच्याकडे रेकॉर्ड प्लेयर आणि जुनी हिंदी मराठी गाणी, नाट्य गीते यांच्या गोल रेकॉर्डस्/ तबकड्या होत्या. त्यावेळीही टेप रेकॉर्डर नी कॅसेट वापरात आलेल्या नव्हत्या. गोल चाका भोवती फीत गुंडाळायचे टेप रेकॉर्डर कधीमधी दुरुस्तीला यायचे.

किल्लेकरांकडे एकदा फिल्ड पब्लिसिटी ऑफिस चा ३५ एम्. एम्. फिल्म प्रोजेक्टर दुरुस्तीला आला. त्यावेळी दोन तीन दिवस प्रोजेक्टर त्यांच्या दुकानातच होता. त्यानी आमच्यासाठी खास त्या ऑफ़िसर कडून प्रपंच, शेजारी या दोन पिक्चर ची रीळे मागवून

घेतली. आगाशे वाड्यातल्या ओसरीवर आम्हाला प्रपंच सिनेमा पहायला मिळाले. तसेच काही सुंदर डॉक्युमेंट्री पहाता आल्या. मौजीरामके सपने ही कार्टून डॉक्युमेंट्री  बघितल्यावर कार्टून ही संकल्पना आम्हाला प्रथम कळली. हा संदर्भ लक्षात आला नी मी दोन दिवसानी रत्नागिरी गाठली.

त्यावेळी माझे मेहुणे- विजुताईचे मिस्टर  सी.व्ही. भावे हे लोकल फंड ऑडीट डिपार्टमेंट मध्ये ऑडिटर होते. रत्नागिरीला उतरल्यावर मी आधी त्याना भेटायला गेलो. मी कोणत्या कामाला आलो हे बोलल्यावर ते म्हणाले , ‘‘हात्तीच्या , हे काम आहे होय? मग तुमचं काम झालं समजा.मागच्याच  आठवड्यात फिल्ड पब्लिसिटी ऑफिसचं ऑडिट आम्ही केल. ते ऑफिसर चांगले आहेत. मी त्याना सांगतो. ’’ मग अशोक हॉटेलमध्ये जेवण करून झाल्यावर आम्ही फिल्ड पब्लिसिटी ऑफिसमध्ये गेलो. फिल्ड पब्लिसिटी ऑफिसर श्री. दिलिप चित्रे माझ्या समवयस्क होते. आमच्या शाळेतल्या मुलानी अजून पिक्चर बघितलेला नाही हे ऐकून ते सुद्धा आश्चर्यचकित झाले.

चित्रेना विजयदुर्ग किल्ला पहायचा होता. नाणारहून होडीने तासाभरात  विजयदुर्गला जाता येत असे. मी त्याना दोन  तीन

दिवस सवड काढून यायला सांगितलं. आमच्या शाळे बरोबर मी पुर्वी कुंभवडा हायस्कूलला होतो तिथे आणि नाणार जवळच सागवे हायस्कूल तिथले हेड मास्तर कुलकर्णी माझे मित्रच असल्यामुळे तिथेही एक शो दाखवयचा असा बेत निश्चित झाला. मी भेटलो त्या नंतरच्या आठवड्यातले गुरुवार ते शनिवार हे दिवस नक्की झाले. मी परत आलो तेव्हा कर्मधर्म संयोगाने कुंभवड्याचे हेडमास्तर पुजारी आणि सागव्याचे हेडमास्तर आबा कुलकर्णी दोघेही मला राजापुरला भेटले. त्याना माझा बेत ऐकून खुप आनंद झाला. चित्रे नॉन्व्हेज घेणारे होते त्यांच्या साठी आबांकडे अस्सल कोकणी मच्छी कडीचा बेत शुक्रवार धरून योजला.

ठरल्या प्रमाणे गुरुवारी दुपारी तीन वाजता दिलिप चित्रे जीप घेवून आले. त्यावेळी नाणार ईंगळ वाडीत नव्यानेच इंजिनची होडी सुरू झालेली होती. चहा वगैरे घेवून झाल्यावर हायस्कुलच्या हॉल मध्ये मुलाना दोन डॉक्युमेंटरी दाखवायच्या आणि रात्री संपूर्ण गावाला शेजारी चित्रपट दाखवायचे ठरले. सगळ्या मुलाना एकत्र बसवण्यासाठी कॉमन हॉल मधली पार्टिशन्स काढणं सुरु झाल्यावर पाचवी सहावीतल्या मुलानी “अॅ ..... शिणुमा ... शिणुमा” म्हणून

एकच गिल्ला केला.त्यांच्या सोबत आलेल्या अटेण्डन्टला सगळी जुळणी करून दिल्यावर मी आणि चित्रे इंजिनच्या होडीने विजयदुर्गला निघालो. किल्ला बघून संध्याकाळी काळोख पडायच्या सुमाराला आम्ही परत आलो. रात्री नऊला शो सुरु करायचा होता पण आठ वाजल्या पासुनच लोकं जमायला सुरुवात झाली. गावातल्या सगळ्या वाड्यांमधली झाडून सगळी माणसं आलेली होती.

शाळेसमोरच्या मोकळ्या पटांगणात माणसाना बसवून स्क्रीन च्या बाजुला आणि वरती घोंगड्या लावून आडोसा केल्यावर प्रोजेक्शन स्वच्छ दिसू लागलं. त्यावेळी मुख्य सिनेमा दाखवण्यापुर्वी न्युज रिल्स म्हणजे काही डॉक्युमेंटरी दाखवणं बंधनकारक असे. चित्रपट गृहातही मुख्य खेळ सुरू होण्याअगोदर ही प्रथा पाळली जायची. नर्मदा नदी दर्शनावर आधारित माहिती पट सुरु झाला. त्यात नर्मदा नदीचं भव्य दर्शन झाल्यावर लोकं अक्षरश: मंत्रमुग्ध झाली. त्यानंतर 'शेजारी' सिनेमा दाखवला. रात्री बारा वाजता शो संपला . परत जाताना माणसं चित्रेना “पुना कदि येशा? ” मग दाखवलेली रिळं सुलट गुंडाळून ठेवून अर्ध्या तासानंतर आम्ही झोपायला गेलो. दुसऱ्या दिवशी पाच व्या पिरीएड

नंतर आमच्या शाळेतल्या मुलाना प्रपंच सिनेमा दाखवून नंतर आम्ही सागव्याला जाणार होतो.पाचव्या तासिकेची बेल झाल्यावर चित्रेना बोलावलं. त्याना पहाताच मुनी एकच गिल्ला केला.



नियोजना प्रमाणे सागवे, कुंभवडे दौरा पार पडला. त्यानंतर पुढची दोन तीन वर्षं चित्रे साहेब न चुकता नाणार

दौरा करीत. पेडणेकरांकडची मच्छीकडी आणि इंजिनच्या होडीतून विजयदुर्गपर्यंत फेरफटका मारून येणं त्याना भलतंच आवडायचं. आता मुलही त्याना ओळखयला लागली होती. चित्रेंची जीप शाळेसमोर थांबली नी चित्रे ऑफिसकडे यायला लागले की, मुलं आनंदाने टाळ्या वाजवून सिनेमावाले साहेब इले.....म्हणत त्यांचं स्वागत करीत.

# ४.सर्कसवाले नारायणराव वालावलकर



(स्त्री चित्रपटाच्या सेटवर निर्माते दिग्दर्शक व्ही. शांताराम यांच्या सोबत प्रो. नारायणराव वालावलकर १९६१ )

कै. नारायणराव वालावलकर यांच्या " दि ग्रेट रॉयल सर्कस"च्या कारकिर्दिवर आधारित "आम्ही सर्कसवाले " ह्या पुस्तकाचे लेखन मी केले होते. १९८८ ते ९६ ह्या सात आठ वर्षात मी तत्कालिन सर्कस मालक प्रतापराव उर्फ आप्पा वालावलकर , मॅनेजर

अनंतकाका वालावलकर, मृत्युगोलामध्ये बाईक रायडिंग करणारे मनोहरराव तथा मामा पेंडुरकर , ॲनिमल ट्रेनर अर्जुनराव वालावलकर , सर्कसच्या अकौंट्स सेक्शन मधिल अप्पा भोगवकर या मंडळीशी संपर्क ठेऊन होतो. या काळात मालक प्रतापराव उर्फ आप्पा वालावलकर यांच्या माझ्या घरी सात - आठ खेपा झाल्या असतील. जेंव्हा जेंव्हा मला सवड मिळायची तेंव्हा मी आवर्जून सर्कस जिथे मुक्कमाला असेल तिथे जात असे आणि तीन चार दिवस तरी सर्कसवाल्यां सोबत वास्तव्य करीत असे

मिरज, महाड, मुंबई, पुणे , रत्नागिरी व सर्कस सिंधुदुर्गात असताना कुडाळला या मंडळीकडून गप्पांच्या ओघात संकलित केलेल्या माहितीवर आधारित सुमारे अडिजशे फुलस्केप एवढे लिखाण मी केले होते. अनंतकाका, मामा पेंडुरकर,अर्जुनमामा यानी त्यांच्या संग्रही असलेले सुमारे 60 फोटो , सर्कसच्या दप्तरा मधले 60 ते 70 फोटो, आणि सर्कसचे पहिले भागिदार विश्वनाथराव मादुस्कर यांच्या कारकिर्दितले अत्यंत दुर्मिळ 6 फोटो ज्यात विश्वनाथ मादुस्कर नी सीतारामपंत वालावलकर यांचे फोटो , त्यांची सर्कसगुरु आवडाबाई परूळेकर यांचा भारतमातेच्या वेषातला सिंहाच्या

रथातला फोटो, बंडोपंत देवल वाघांना ट्रेनिंग देत असलेला फोटो, आणि एक मादुस्कर रॉयल सर्कस चे जीर्ण हँडबील होते. मी रॉयल सर्कस ची माहिती गोळा करीत असता कै. नारायणराव वालावलकर यांच्याकडे सर्कस हस्तांतरित होण्यापूर्वी तळेकांटे रत्नागिरीचे प्रो. विश्वनाथराव मादुस्कर आणि सीतारामपंत वालावकर यांच्या संयुक्त मालकी हक्काखाली "मादुस्कर रॉयल सर्कस " या नावाने खेळ करायची अशी माहिती कळली .

पुढे १९४६ मध्ये विश्वनाथरावांच्या मृत्युनंतर त्यांचे मालकी हक्क नारायणरावांकडे आले व सीतारमपंत आणि नारायणराव यांच्या संयुक्त मालकी खाली " दि ग्रेट रॉयल सर्कस " असे नामांतरण नारायणरावानी केले. एकदा एकदा गप्पांच्या अनंतकाका बोलले की, "मादुस्करांचे एक भाचे - मुळ्ये नावाचे गृहस्थ रत्नागिरीला राहतात त्यांच्या संग्रही मादुस्कर रॉयल सर्कसचे काही जुने दुर्मिळ फोटो आहेत. त्यांची दोन पत्रे रॉयल सर्कडे आलेली . आपल्याकडे सर्कसचे असे असे जुने फोटो आहेत , पण मालक प्रताप उर्फ आप्पानी काहीच दखल घेतली नाही , मुळ्ये यांची ती पत्रे सुद्धा गहाळ झाली." मी हा संदर्भ पक्का ध्यानात ठेवून

या मुळ्यांचा शोध घ्यायचा निश्चय केला. मी अकरावी ते बी.ए. पर्यंत रत्नागिरी ला रहिलेला . रत्नागिरी ही फार मोठी नाही. माझे सख्खे काका रत्नागिरीला स्थाईक झालेले . मी त्याना पत्र लिहून रॉयल सर्कस वर आधारित पुस्तक मी लिहित असून त्या संदर्भात मुळ्ये यांचा शोध घेऊन त्यांची भेट घेऊन चौकशी करायला कळविले. माझ्या काकाना सर्कसचा विलक्षण शौक ! त्यानी सर्कस प्रेमापोटी मुळ्ये या सुताच्या आधाराने स्वर्ग गाठायचा उद्योग चार दिवसात केला. वसंतराव मुळ्ये नावाचे गृहस्थ मधल्या आळीत गणपतीच्या देवळजवळ राहतात , त्यांच्या संग्रही खरोखरच काही दुर्मिळ फोटो आहेत व तू समक्ष भेटलास तर पाहता येतील, असे काकांचे पत्र आले. मी लगतचा शनिवार धरून रत्नागिरी गाठली. वसंतराव मुळ्ये हे साधारण पंचेचाळिशीचे अविवाहित गृहस्थ , पांढरा पायजमा नी जुन्या पद्धतीचा पांढरा सद्रा घातलेले अर्धवट पिकल्या केसांचा मधोमध भांग पाडून भुवयांच्या मधोमध शेंदराची टिकली लावणारे मध्यम वर्गीय गृहस्थ मधल्या आळीत जुन्या घरात दोन बेताच्या खोल्यांमध्ये भाड्याने रहायचे. मी त्याना माझ्या कडची फोटोंची नी माझ्या लेखांची फाईल दाखवली .

त्यांच्याशी दिवसभर मनमुराद गप्पा झाल्या. त्यांच्या संग्रही असलेल्या फोटोंवरुन अनिल फोटो स्टुडिओ च्या काळेभाऊंकडुन फोटो काढुन घेऊन त्या प्रती मुळ्याना देऊन मूळ फोटो मला मिळाले. शिवाय काही मोलाचे संदर्भही उमगले .

प्रो.विश्वनाथ मादुस्कराना ते १0/१२ वर्षाचे असताना वेद विद्या/ भिक्षुकी शिकण्यासाठी रत्नागिरीला पाठशाळेत ठेवायचे ठरले. मादुस्कराना पुढे शिकुन व्हर्नाक्युलर फायनल करायची ईच्छा अन त्याही पेक्षा चम्मनगोटा करून भिक्षुकी करायचा तिटकारा , पण वडिलांच्या धाकापुढे त्यांचे काही चालले नाही. नवरात्र झाले अन दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर मामा विश्वनाथाला रत्नांग्रीच्या पाठशाळेत दाखल करुन परत गेला. आठवडाभर उलटला आणि एके दिवशी गुरुजीनी विश्वनाथाला जवळ बोलावुन सांगितले, " ही पाठशाळा आहे, इथे हे हे डोक्यावरचे जंगल नाय चालायचे , वेदविद्या शिखुन ब्राह्मण व्हायचे असेल तर डोक्यावर गायीचे पावला एव्हढा घेरा नी लांब शेण्डी राखायस हवी, आजच्या आज नाक्यावरच्या न्हाव्या कडे जाऊन घेरा राखून गुळगुळीत गोटा करून ये नी उद्यापासून संथा सुरु करायची." मग नवाथ्यांच्या दामुला,"ह्यास

नाक्यावरच्या न्हाव्याकडे न्हेवून गोटा करून घेऊन ये ...” असे सांगुन गुरुजी आपल्या कामाला लागले. विश्वनाथावर जसे आकाशच कोसळले. त्याने मनाशी काही निर्धार केला. मी जरा रामाच्या देवळाजवळ माझी आत्ते ऱ्हात्ये तिच्याकडे जाऊन येताना गोटा करून येतो असे सांगून तो जो बाहेर पडला तो याला त्याला विचारित कोल्हापूरच्या वाटेला लागला. वाटेत भिक्षा मागून मिळेल ते मिळेल तिथे खाऊन विश्वनाथ चालत राहिला.

तेंव्हा मलकापूरला आवडाबाई परुळेकरांची छत्रे सर्कस डेरेदाखल झालेली होती. विष्णुपंतांच्या माघारी सर्कसचा बारदाना खूप कमी होत आलेला असल्यामुळे लहान लहान गावानी सर्कसचे खेळ लावीत असत. विश्वनाथ तंबूत शिरला तेंव्हा सकाळी ९ चा सुमार होता आणि आवडाबाईंसह त्यांच्या ट्रूपचा रिंगणात सराव सराव चाललेला.हा गोरागोमटा मुलगा दिसल्याबरोबर आवडाबाईनी त्याला जवळ बोलावून विचारपूस केली . विश्वनाथाने त्याना आपण पाठशाळेतून का पळून आलो ते सांगितले. त्याला खाऊपिऊ घातल्यावर आवडाबाईनी त्याला घरी तळेकांटे येथे पाठवयाचा बेत केलेला.पण विश्वनथाने

ठाम नकार दिला. “मी घरी गेलो तर वडिल मरेमरेस्तो मारतीलने पुन्हा आपली रवानगी पाठशाळेत करतील, पाठशाळेतले गुरुजी नी विद्यार्थी रोज मला केंडित राहणार..... असले नामुश्किचे जीणे जगण्या पेक्षा मी सरळ जीव देईन, त्या पेक्षा मला तुमच्या तुमच्या सर्कशीत ठेवा , मी पडेल ते काम करीन,मला कसरत शिकवा. काहीही करा पण मला हाकलू नका.... ”

एवढ्या लहान मुलाचा निर्धार पाहून आवडा बाईंचे मन द्रवले. जवळ जवळ पंधरा वर्षे विश्वनाथ छत्रे सर्कसमध्ये होता. आवडाबाईं मूळच्या पाट परुळयाच्या, त्याना विष्णुपंतानी कसरतीची कामे शिकवली. त्या भारतमातेची वेशभूषा करून रथात बसून रिंगणात यायच्या तो रथ दोन सिंह ओढायचे. रथ रिंगण घेऊन थांबला की सर्कस मधिल गणा हत्ती पुष्पहार घालून भारतमातेची पुजा करायचा. त्या सायकलिंग , बॅलन्सिंग, सिंगल ट्रॅपीझ वरचे खेळ आणि इतर कसरतीचे प्रयोग करायच्या. पुढे विष्णुपंतांच्या प्रथम पत्नी निवर्तल्यावर त्यानी आवडाबाईंशी द्वितिय विवाह केला. त्यांच्या ट्रुपमध्ये कुडाळ वेंगुर्ला सावंतवाडी परिसरातल्या बऱ्याच मुली होत्या. त्या

भागातले काही मुलगेही त्यांच्याकडे कसरतपटू म्हणून हरकामे म्हणून असायचे. पुढे आवडाबाईंची सर्कस डबघाईला आल्यावर विश्वनाथ इंडियन बहादुर सर्कस मध्ये आर्टिस्ट म्हणुन काम करित असता पर्शुराम सर्कसमधील सीतारामपंत वालावलकरांशी त्याचा परिचय झाला. १९0६मध्ये विश्वनाथ मादुस्कर आणि सीतारामपंत वालावलकर यानी भागीदारीत "मादुस्कर रॉयल सर्कस" या नावाने नवीन सर्कस उभारून ठाणे येथे शो सुरु केले . मादुस्कर हे सर्कस चे रिंगमास्टर होते. त्यांच्या सर्कशीत एका वाघिणीला बच्चा झाला . मादुस्करानी त्याला अंगा-खांद्यावर खेळवून चांगलेच माणसाळावले होते. त्याच्या गळयात पट्टा नी जाडसर साखळी असायची . मादुस्करांच्या तंबूत वाघाचा इतका मुक्त संचार असायचा की भेटायला येणारे लोक मादुस्करांसोबत कुत्र्या सारखा वावरणारा वाघ पाहून आश्चर्यचकित होत असत.

सीतारामपंत कुडाळ परुळे वेंगुर्ला परिसरातले कित्येक मुलगे सर्कशीत आणुन त्याना ट्रेनिंग देवून कसरतीची , ट्रपीझ ची कामे करवून घ्यायचे. नारायणराव वालावलकरांचे आई

वडील अकाली निवर्तले अन त्यांचा प्रतिपाळ करण्याचा भार त्यांच्या मामांवर पडला. नारायणच्या उपलवटी कारवायानी मामा पुरते जेरीला आले. नारायण शाळा चुकवून लक्ष्मीनारायणाच्या मंदिराच्या आवारात नी गावभर हुंदडत रहायचा. रोज त्याच्या काहिना काही कलागती यायच्या. पोर एवढा निर्ढाव्लेला की मार खाऊनही वठणीवर येईना. उपाशी ठेवला तर ताई भटणी कडे तर कधी रामु आत्त्याकडे जाऊन मागुन खायचा. रात्रीचा बाहेर ठेवला तर मंदिरात नाहीतर कोणाच्याही ओसरीवर जाऊन रात्र काढायचा. मग जनलज्जेपायी मामी त्याला पाठिशी घालायची. त्या दरम्याने सीताराम पंत वालावलला आले नी मामानी नारायणची ब्याद त्यांच्याकडे सुपूर्द केली.

सर्कसच्या जादुनगरीत मात्र नारायण पुरता रमला. त्याचा उपलवटी ढालगज स्वभाव इतका आमुलाग्र बदलला की , सीताराम पंताना सुद्धा आश्चर्य वाटायच. सर्कस मुंबई दौऱ्या वर असताना नातेवाईकांपैकी नारायणाच पूर्व चरित्र्य माहिती असलेला कुणी सोयरा सीतारामपंताना भेटायला आला नी

नारायणाला बघून चकितच झाला. ही आनी बिलामत ख्येका गळयात घितलास? ह्यो म्हंजे जितो समंध .... निस्ती चाळेगत.... कदि खय आग घालित भरावसो नाय.... ह्येका हैसून भायरो करा..... पण पंत हसून म्हणाले , “ह्यो चाळो माका रुजु झालो, ह्येका सर्कशीत आणून पाच वर्सा झाली पन माका म्हनशा तर काडीचो तरास नाय हां दिल्लो ह्येनां...... अमुक कर म्हनान कदी सांगाचा पडत नाय. घोड्याची लीद काड्न्या पासून तो जां जां पडललां काम दिसात तां पोटाळनार ...... माकाव कदि कदि अजाब वाटतां ..... ह्या कायच नाय , कसरती ची कामां पन कदि कशी शिकान घितल्यान तां लक्षुमीनारायणाकच म्हायत, ट्रपीज वरचा ह्येचा कसब बगलास तर तुमकाव अजाब वाटात..... ”

नारायण मादुस्कर सर्कस मध्ये स्टाफ अर्टिस्ट म्हणून रोजच्या शो मध्ये दोन तीन आयटम्समध्ये काम करू लागल्यावर त्याला अल्पस्वल्प मेहनताना मिळायला लागला. अर्थात स्लॅक सीझनच्या वेळी दोन दोन तीन तीन महिने त्याच्या मानधनाची फिकिर ही मालक मंडळीना नसायची. आपल्याला इतर आर्टिस्ट प्रमाणे पेमेंट मिळत नाही हे कळत असूनही नरायणाचा

भिडस्त स्वभाव त्याला गप्प बसायला लावायचा. या मागे आणखीही एक महत्वाची गोष्ट होती ती म्हणजे सर्कशीत नारायणाच्या शब्दाला मालक मंडळी नी मॅनेजर यांच्या शब्दाइतकीच किंमत होती. त्याने केलेल्या प्रत्येक सुचनेची विना विलंब कार्यवाही सन्मानाने केली जायची. स्टाफ आर्टिस्ट सोडाच वेगवेगळ्या ट्रुपचे व्यवस्थापक / मालकही त्याला टरकून असायचे. एखादा नवीन आर्टिस्ट नारायणच्या अनुमती विना सर्कसमध्ये रुजु करून घेतला जात नसे. त्याचा परफॉर्मन्स पाहून तो स्टाफ वर घ्यायचा की नाही हे नारायणच्या सल्ल्याने ठरवले जायचे.



(सर्कस नैरोबी मुक्कामी असतानाचा फोटो)

नारायणाचे लग्न झाल्यावर मात्र त्याला परिस्थितीचे चटके बसू लागले. वाढत्या गरजांपुढे पगार अपुरा पडायला लागल्यावर मात्र त्याची भीड मोडली. त्याने अगोदर सीतारामपंताना आडून आडून आपला पगार वाढवण्याबद्दल सुचवून पाहिले. पंत हासुन टोलवयला लागले. हंयचा मोजतर पुरा होवने ... पुण्यात तम्बू

टाकलंवकी तुका पगार वाढौन देवया. पुण्यातला मुक्काम उठायची वेळ आली तरी पंत काही पगारवाढीचे नाव काढीनात. मग पुढच्या नाशिक दौऱ्याची आखणी करण्यासाठी मादुस्कर , पंत यांच्याबरोबर चर्चा सुरु असता मध्यंतरात नाष्टा आला नी अवांतर गप्पा सुरु होताच नारायणाने पगारवाढीचा विषय काढला नी त्याला अपेक्षित मानधनाचा आकडाही फोडला . त्यावर पुढच्या मुक्कामी कसा काय धंदा होतो ते बघून काय ते ठरवूया असे उत्तर विश्वनाथ मादुस्करानी दिल्यावर संयम संपलेला नारायण म्हणाला की , आत्ता या इथे काय तो सोक्षमोक्ष होवून जाऊदे नाहीतर इथला मुक्काम संपल्यावर माझ्याऐवजी बदली आर्टिस्ट शोधा. त्याच्या कडून अशा काही उत्तराची शक्यतासुद्धा मालक मंडळीनी गृहित धरलेली नव्हती. पंत त्याला समजवण्या साठी काहीतरी बोलण्यापूर्वीच प्रो. मादुस्कर उसळून म्हणाले, “नारायणा.... सीताराम पंताचा माणूस म्हणून आज पर्यंत तुझा तोरा चालवून घेतला , आमच्या बरोबरीने तुझा रुबाब चालवून घेतला पण लक्षात ठेव सर्कसला तुझी गरज नाही ... तुला सर्कसची गरज आहे. इतकीच मस्ती असेल तर हा दौरा संपण्याची तरी वाट कशाला बघायची ? तू

आजच्या आज बाहेर पडू शकतोस. तुझ्या बदली येणाऱ्या आर्टिस्ट ची नवीन मुक्कामी जाण्या आधीच ट्रायल घेता येईल. ”

सगळया धंद्यांमध्ये संधीसाठी टपलेले लोक असतात. नारायणाची पगारवाढी मुळे असलेली नाराजी बरेच आर्टिस्ट ऐकून होते.त्यानी कधीपासून मोर्चे बांधणी केलेलीच होती. मादुस्करानी विषयाचे एक घाव दोन तुकडे केल्याने सीताराम पंताना गुळणी धरणे भागच पडले. अर्थात नारायणसाठी ती इष्टापत्तीच होती कारण पंतांनी काहीतरी वायदा केला असता तर नारायणाला तडकाफ़डकी बाहेर पडणे जमले नसते. त्याने तत्काळ चम्बू गवाळे आवरले नी दुपारी जेवणे उरकल्यावर झाल्या दिवसाचा मिळाला तो हिशोब घेऊन नारायण मुम्बई ला रवाना झाला. त्याने मादुस्कर सर्कस सोडली तेंव्हा सर्कस विश्वात त्याच्या नावाचा चांगलाच दबादबा असल्याने त्या वेळी ठाण्यात खेळ करीत असलेल्या जी. ए. सर्कसमध्ये त्याना भरपूर मानधनसह संधी मिळाली. नाना मादुस्कर सर्कस सोडून बाहेर पडले . जी. ए. सर्कस मध्ये दाखल होताच त्यानी स्वत:चा ट्रुप फॉर्म केला. यात इतर पूर्वीच्या मादुस्कर सर्कसमध्ये असणारे काही मित्र व कुडाळ,वालावल, पाट

परुळे, वेंगुर्ला या कोकण परिसरातले दिगंबर / अनंत वालावलकर वगैरे मंडळी होती ज्यानी अखेरपर्यंत नानाना साथ दिली.

मादुस्कर सर्कसने नानाना काय दिले याचा लेखा जोखा घेताना ग्रेट रॉयल सर्कस मधील मॅनेजर अनंतकाका वालावलकर यानी अत्यंत मार्मिकपणे अधोरेखित काही बाबी मला प्रकर्षाने नमूद कराव्या लागतील. मादुस्कर सर्कसने त्याना आर्थिक मोबदला अत्यल्प दिला किंबहुना उमेदवारीचा पूर्ण काळ निव्वळ पोटावारी अन एखादा ॲक्ट करू लागल्यापासून तो रोजच्या शो मध्ये त्यांचे ॲक्ट हे अविभाज्य बनल्यावरही सर्कसने त्यावेळी असलेल्या प्रचलित दरांच्या तुलनेत अत्यंत अल्प (ते ही अनियमित ) मानधन देऊन त्याना अक्षरश: पिळून घेतले . मात्र मादुस्करमध्ये त्यांच्या व सीताराम पंतांच्या जवळिकीच्या नी अतीव विश्वासाच्या नात्यामुळे नाना मालकाच्या रुबाबात राहिले. सर्कसच्या व्यवस्थापनात सहभागा मुळे सर्कसच्या अर्थकारणाचे मर्म त्याना ज्ञात झाले. मादुस्कर सर्कसमध्ये हरकाम्या म्हणुन वावरताना

a

प्राण्यांची निगा देखभाल, त्यांना ट्रेनिंग देणे या पासून तो अडल्यावेळी हत्ती घोड्यांपासून अगदी वाघ सिंहांपर्यंत कोणत्याही प्राण्याचा ॲक्ट रिंगणात सादर करण्याची दुर्लभ संधी नारायण रावाना सहजावारी मिळत गेली. दौऱ्याची आखणी करणे, नवीन ठिकाणी विविध सरकारी कार्यालयांकडुन परवानग्या मिळविणे , नवीन ठिकाणी तम्बू ची मांडामांड करणे, साहित्य खरेदी , सर्कसच्या रोजच्या शो मधल्या आयटम्स चे प्रोग्रॅमिंग , सर्कसचे नाविन्य टिकवण्या साठी नवनवीन उदयोन्मुख कसरतपटु –ट्रुप मॅनेजर यांच्याशी संधान साधणे व त्याना युक्ती प्रयुक्तीने पटविणे अशा विविध तंत्रां मध्ये प्रत्यक्ष सहभागी होवून ती तंत्रे आत्मसात करण्याची संधी योग्य मार्गदर्शन – सल्ला यासह सीतारामपंतानी त्याना दिली.या सर्कसमधिल त्यांच्या अधिवासात त्यांचा लोकसंग्रहातही प्रचंड भर पडली. अर्थात असे झोकून देऊन काम करण्याचे कोकणी बाळकडू त्याना जन्मसिद्ध हक्कानेच मिळालेले होते आणि वाटेल ते कष्ट घेण्याची हुन्नर हा त्यांचा स्वभावविशेष.त्यामुळे भारतीय सर्कस इतिहासात

नारायणराव वालावलकर हे नाव चतुरस्त्र / अष्टपैलू सर्कस वीर आणि ॲनिमल ट्रेनर म्हणून अजरामर झालेले आहे. त्यांच्या बहुआयामी त्वाचे श्रेय निरपवादपणे त्यांच्या मादुस्कर सर्कसमधिल सीतारामपंतांच्या अनुयायित्वाखाली केलेल्या शागिर्दीलाच द्यावे लागते ही बाब मितभाषी अनंतकाकानी मिरज मुक्कामी त्यांच्या जानपद शैलीत अस्सल मालवणी बोलीत माझ्याकडे उध्रृत केली. त्यांचे शब्द- वर्णन थोडे मालवणी बाजाचे पण आशय निरपवादपणे मी शब्दबद्ध केला तोच होता.

अनंत काका,मामा पेंडुरकर,अर्जुन वालावलकर या त्रयीच्या बरोबरीने सर्कस डोलारा सांभाळणारा चौथा किंगपोल सुरेश म्हापणकर. सर्कसमध्ये सुरेश म्हापणकर दाखल झाला आणि नी नारायणराव बिनघोर झाले. सर्कसचे दौरे आखणं, सरकारी परवानग्या मिळवणं, रोजच्या गल्ल्याची मोजदाद, जाहिरात विभाग सांभाळण आणि अत्यंत महत्वाचा जनसंपर्क तो लीलया सांभाळू लागला आणि सर्कसला भव्य दिव्य रूप द्यायला , नी नारायणरावांना अंगभूत प्रयोगशीलता वास्तवात आणायला फुरसत मिळु लागली. कसरती च्या प्रयोगांमधे

नाविन्य आणि थरार आणण्या साठी नारायणरावांनी कल्पकता पणाला लावली. ट्रपीझ अक्टमध्ये कॅचर नी जंपर दोघांचे झूले अवकाशातल्या ज्या बिंदूवर एकत्र येतात त्याला मीटिंग पॉईंट म्हणतात. इथे दोन्ही झुल्यांमध्ये विशिष्ट अंतर राखावे लागते . नारायणरावांनी हे अंतर वाढवून त्यातला थरार शिगेला नेला. हे त्यांच्या सर्कसमधले विक्रमी वैशिष्ट्य ठरले. सर्कसचा शिकारखाना हे ही सर्कसचे खास आकर्षण असते. अवढव्य किमती मोजुन प्राणी खरेदी करावे लागत. नारायणरावांनी प्राण्यांच्या संगोपनावर लक्ष केंद्रित करून त्यांची पिलावळ पैदा करण्याचे जटिल काम यशस्वि केले. तसेच वाघ सिंहाचा संकर घडवून लायगर ही नवीन पैदास विकसित करून त्यांचे कसरत प्रयोग सादर केले. त्यांच्या या लोकोत्तर कार्याचा गुगलवर संकलित केलेल्या माहितीत उल्लेखसुद्धा केलेला नाही. वाघ,सिंह,चित्ते व चिपांझी यांच्यापासुन असंख्य बछडे जन्माला येऊन त्यांची उत्तम देखभाल व प्रशिक्षण पूर्ण करून त्यांचे कसरतीचे प्रयोग हे नारायणरावांच कार्य सर्कस इतिहासाने खास दखल घ्यावी असेच म्हणायला हवे. सर्कस रत्नागिरी दौऱ्यावर असता सिंहीणीला दोन बछडे झाले व त्याव

मुक्कामी चिपांझीलाही बच्चा झाला. सर्कसच्या मुख्य प्रशासकीय तंबूत सीतारामपंत/ वसंतराव आणि नारायणराव वालावलकर या तिघांचे फोटो कायम लावलेले असायचे.

आप्पा ंकडे कसरतीचे काडीमात्रही कसब नसले तरी उच्च शिक्षणामुळे येणारी नम्रता, परिस्थीती नी प्रशासन हाताळण्याचे कसब त्यांच्याकडे पुरेपूर होते. नानानी बसविलेल्या पठडीला धक्काही न लावता , काका, मामा, सुरेश म्हापणकर या नारायणरावांच्या विश्वासू सहकाऱ्याना पूर्वीप्रमाणे कामाची स्वायत्तता देऊन सर्कसच्या आर्थिक धोरणावर भक्कम नियंत्रण ठेवले. अनावश्यक खर्चाला कात्री लावली. सर्कसचा बाजारहाट खरेदीसाठी जाणा-या लोकांबरोबर स्वत: जायला सुरुवात केली. सर्कसमधून होणारी आर्थिक गळती पूर्ण बंद झाली. नारायणरावांचा खाक्या पेशवाई थाटाचा. माझी सर्कस मोठी आहे. इतर सर्कशींमध्ये जे आयटम्स असतात ते माझ्याकडे असलेच पाहिजेत हा त्यांचा अट्टाहास त्यापायी कितीतरी कलाकाराना नी ट्रुप्सना नारायणरावांनी अक्षरश: पोसले होते. त्या बाबतीत

कोणाचाही सल्ला त्यानी कधीच जुमानला नव्हता. खरं तर या गोष्टी काका, मामा, सुरेश म्हापणकर यानी नारायणरावांच्या निदर्शनाला कधिच आणून दिलेल्या होत्या. पण नारायण रावांनी ते कधिच मनावर घेतले नव्हते. सर्कस कायम कर्जात बुडालेली असायची. स्पॉन्सरकडून चढ्या दराने कर्ज घेतले जाई. आणि रोजच्या उत्पन्नातला बराचसा हिस्सा स्पॉन्सर खावून जाई. अप्पा ंकडे मॅनेजमेंट आली नी केवळ ईर्षे खातर नारायणरावानी पोसलेले महागडे आयटम्स बंद करून त्या ट्रूप्सना नारळ दिले गेले. दर शो मधली कार्यक्रमांची खोगीरभरती कमी करून त्यात नेमकेपणा आणला.

सर्कसचं स्टोअर म्हणजे अजबखानाच होता. जवळ जवळ निम्मे सामान केवळ निरर्थक होते. सर्कसचा मुक्काम हलविताना सहा मोठे कं टेनर भरायचे .हा निरर्थक आर्थिक भुर्दंड गेली कित्येक वर्षे सर्कस सोशित होती. अप्पाने जपानच्या कायझेन तंत्राचा अभ्यास केलेला होता. व्यवसाय उर्जितावस्थेला आणायचा तर प्रथम आपली विद्यमान स्थिती काय आहे? उपलब्ध साहित्य सुविधा आणि सामग्री ची काय अवस्था आहे? इथून सुरुवात करायला

लागते. अनावश्यक खर्च वाचवणं ही भविष्यकालिन कामाईच आहे . या प्रशासन तंत्रांची आणि सिद्धांतांची अंमलबजावणी आप्पा ने सुरु केली. टनावारी भंगार विकून काढले. सर्कसचे किंग पोल असेच खूप उंच होते. खरतर त्यांची निम्मे उंची निरर्थकच होती. इतके उंच किंगपोल उभे करताना, त्यांची वाहतूक करताना ही अडचणी यायच्या. सर्कसचा मुक्काम हलविताना अप्पाने चारही किंग पोल अर्धे कापले.

किंगपोल कापण्याचा अप्पाचा निर्णय काका मामा यानाही तेवढासा मान्य नव्हता. कसं कोण जाणे, अप्पाने सहा लोड लोखंड सामान विकलं, किंगपोल अर्धे कापले ही गोष्ट नारायणरावांच्या कानावर गेली. अप्पाची मुंबईत खेप झाली तेंव्हा नानानी जाब विचारला. भंगार विकल्यामूळे वाचलेल्या वाहतूक खर्चाचे आकडे सांगितल्यावर मात्र त्याना अप्पाचा हिशेबी दृष्टिकोन पटला. किंग पोल कापल्यामुळेही वाहतूक, उभारणी यातला व्याप कसा कमी झाला, तसेच डबल संच झाल्यामुळे एकिकडचा मुक्काम हलविण्या पूर्वी दुसरीकडे तंबू उभारणे कसे शक्य होते, त्यामुळे ट्रॅन्झिट कसा कमी होतो ही बाबसुद्धा

त्याना पटली. महत्वाचे म्हणजे खर्च कमी झाल्यामुळे कर्ज कमी होत जावून व्याजाच्या रक्कमा निम्म्यावर आल्या.“तू शिकलेला आहेस, या गोष्टी मला कधि सुचल्याही नव्हत्या, आमचा पेशवाई कारभार.... खांदेपालट झाली पण सर्कस कर्जातून बाहेर आली . नारायणरावांच्या सर्कसचे उंच पोल लांबूनही दिसतात ..... लोक कौतुक करायचे..... अंगावर मूठभर मांस चढायच. एकिकडचा मुक्काम संपला की तंबू उतरून किंग पोल सुटे करून ते ताबडतोब नवीन मुक्कामावर हालावावे लागत .... कारण ते उभे केल्याशिवाय नवीन ठिकाणी तंबूचं काम सुरुच करता येत नसे. शिवाय अव्वाच्या सव्वा भाडी द्यावी लागत. तू पोलचा डबल संच करून ही कटकट मोठ्या हुषारीने चुटकीसारखी सोडवलीस. आंधळं दळतं नी कुत्रं पीठ खातं, असा आमचा कारभार असं म्हणून नाना हसले . ”

गरजेपेक्षा जादाचा शिकारखानाही अप्पाने असाच मर्यदित केला. नवीन धोरणामुळे सर्कसचा खर्चाचे आकडे एकतृतियांश कमी झाले. प्रॉफिट वाढू लागला. अप्पा सर्कसमध्ये येण्यापूर्वी पाच सहा वर्षापाठी सर्कस जवळ जवळ बंद पडायला

आलेली.त्यावेळी पटेल या गुजराती पार्टीला स्पॉन्सरशीप देऊन गंडांतर टळलं. दहा वर्षाचा करार होता. रोजच्या उत्पन्नातून ठराविक रक्कम त्याना द्यावी लागायची. त्यांचे दोन तीन अकौंटंट सर्कसला पोसावे लागायचे. अप्पाची कारकीर्द सुरु झाली, सर्कस फायद्यात सुरु झाली नी सुरेशशी सल्ला मसलत करून अप्पाने पटेलाना रक्कम देवून स्पॉन्सरशीपचा करार रद्दा केला.या निर्णयालाही सर्कस मधल्या जुन्या जाणत्यांचा विरोध होता. पुन्हा अस्मानी सुलतानी झाली तर नवीन स्पॉन्सर कोण गाठणार? पण अप्पाचा स्वत:च्या निर्णयावर भरवसा होता. सर्कस तोट्यात कधिच नव्हती. मात्र आर्थिक नियंत्रणा अभावी बारा वाटानी खर्च वाढायचा नी फायदा कोणीतरी खावून जायचे.

अंतर्गत कारभारातही अशीच अंदाधुंदी होती.प्रतापरावांची कारकिर्द सुरु झाली नी अनंत काका, मामा पेंडुरकर,अर्जुन मामा व सुरेश म्हपणकर यांची जबाबदारी वाढली. आर्थिक व्यवस्थापन आणि शो चे व्यवस्थापन असे दोन स्वतंत्र विभाग झाले. दोन्ही विभागांची अखत्यारी भिन्न प्राशसकांकडे असली तरी त्यांच्यामध्ये कधीही मतभिन्नता वा दुफळी

झाली नाही . मात्र हे करताना अनंत काका, मामा पेंडूरकर, अर्जुन मामा हे नारायणरावांचे निकटवर्ती सहकारी, त्यांचा सर्कसच्या स्टाफवर वचक असायचा, त्या व्यवस्थेत मात्र यत्किंचितही ढवळाढावळ केली नाही.

प्रतापरावांच्या प्रशासनाच इष्ट फलित लौकरच दिसू लागलं, नारायणरावांच्या कारकिर्दित कायम सर्कसच्या पाचवीला पुजलेली ओढघस्त संपली. पंचवीस वर्षं सतत परदेश दौ-यावर असलेल्या मंडळीना भारतात परत जायची स्वप्नं पडू लागली. मायदेशी शिफ्ट होवून खेळ सुरू करीपर्यंतचा ट्रॅझिट मोठा असतो . त्या काळात प्राणी, स्टाफ यांचा खर्च सुरु ठेवून पल्ला निभावणं हे तसं आव्हानच असतं. पण स्पॉन्सर न गाठता अप्पाने स्वत:च्या हिम्मतीवर ते यशस्विरित्या निभावूनही नेलं. अर्थात नारायणरावांचा लौकिक, तोही फलस्वरूपात कामी आला.एवढ्या लवाजम्याची वाहतूक, शासकिय परवागनग्या कुठेच अडवणूक झाली नाही. उलट अनेक अधिका-यानी सर्कसच्या लौकिका मुळे पूर्ण सहकार्य केलं .

सर्कस ची आर्थिक बाजू सावरली आणि सर्वांना भारतात यायचे वेध लागले. एडन,सोमालिया, इजिप्त, सुदान, ईराण, इराक, कैरो, युनायब रिप्ब्लिक, केनया,युगांडा, टांझानिया, मॉरिशस, सिंगापूर, मलेशिया, इंडोनेशिया, आणि फिलिपाईन्स या देशांचा २१ वर्षांचा यशस्वि दौरा करून १९९३ मध्ये सर्कस भारतात परतली. मायदेशी येवून सर्कस दिमाखात खेळ करू लागली. अर्थात हे कौतुक नारायणराव पाहू शकले नाहीत.. सर्कस भारतात आल्यावर सुरेश म्हापणकर सर्कस मधून बाहेर पडले. मात्र अनंत काका, मामा पेंडुरकर, अर्जुनमामा उमेद असे पर्यंत सर्कस मध्ये राहिले. यांच्या जोडीला अकौंट सांभाळायला आप्पा निरवडेकर (यांचं नाव स्मरत नाही) असायचे. सर्कसच्या भारतातील दौ-यात सर्कस संदर्भात प्रसिद्ध झालेले लेख, बातम्या, सर्कसला भेट देणा-या सिने कलाकार, नेते व अन्य महनीय व्यक्तिंच्या भेटीचे फोटो निरवडेकरानी तारीखवार संग्रहित केलले होते. तसेच सर्कसच्या संदर्भात सांख्यिकीय माहिती ते पटकन द्यायचे. अनंत काका रोजच्या शो चे व्यवास्थपन पहायचे. मामा पेंडुरकर मृत्युगोलात मोटर सायकल चालवायचे.

(त्याच मामांचा मालवण मध्ये मोटर सायकल चालविताना ॲक्सिडेंट झाला नी त्याना 2/3 महिने बेडरेस्ट घ्यावी लागली) . अर्जुनमामा चिपांझी ची कामे सादर करीत. आज घडीला मामा पेंडूरकर आणि अर्जुनमामा वालावलकर हयात नाहीत.




( नैरोबी केनिया मुक्कामी असतानाचा रॉयल सर्कसचा फोटो 1966 )

नारायणरावांची दोन स्वप्न होती, आपल्या जन्मभूमीत कुडाळला एकदा तरी सर्कसचा बारदाना न्यायचा नी खेळ करायचे. दुसरं स्वप्न म्हणजे दामू धोत्र्यां प्रमाणे आपल्या सर्कस ची कारकीर्द वाङमय रूपाने सामान्यांपर्यंत पोचावी. नानानी त्यांच्या हयातीत दोन वेळा नामवंत लेखकांशी संपर्क साधून पुस्तक लेखनाच कार्य सुरू केलं पण ते आकारालाही येवू शकलं नाही. एक ईच्छा रत्नागिरी सिंधुदुर्ग दौरा करून अप्पानी पूर्ण केली. पण सर्कसच्या कारकिर्दीवर आधारित पुस्तक मात्र प्रकाशित होऊ शकलं नाही. मध्यंतरी सर्कसमध्ये प्राण्यां ची कामं सादर करण्यावर बंदी आली. त्या दरम्याने काही काळ आर्थिकदृष्ट्या परखड गेला. काही प्राणी सिंधुदुर्गात निरवड्याला अप्पांच्या फार्म वर ठेवली होती. त्याच दरम्याने अप्पांचा मृत्यू झाला. उपाशी पोटी पिंज-यात डांबलेल्या प्राण्यांचे फोटो नी वृत्तंही पेपरात आली होती. बदलत्या काळानुसार मनोरंजनाची माध्यमं बदलली नी सर्कस कडे प्रेक्षकांचा ओढा कमी झाला. २२/१२/२००२ मध्ये प्रतापराव वालावलकरांचा आकस्मिक

मृत्यू झाला नी सर्कस विश्वातून वालावलकर पर्व संपुष्टात आलं.१५/0४/२00४ रोजी नारायणरावांच्या पत्नी स्नेहलता वालावलकर यांच्या मृत्यूमुळे सर्कसच्या कागदोपत्रीही नारायणरावांची निशाणी अस्तंगत झाली. मात्र अजूनही नारायणरावांची सर्कस अस्तित्व राखून आह

✱✱✱✱✱✱✱✱✱

## ५. भुलाये न बने .......

१९७0/८0 च्या दशक म्हणजे ऑर्केस्ट्रांची चलती असलेला काळ! बाबला , महेश कुमार, प्रमिला दातार यांचे ऑर्केस्ट्रा कायम हाऊसफुल्ल व्हायचे. या शिवाय शंकर जयकिशन कल और राहुलदेव आज, ओपी नैय्यर मुझिकल नाईट असे अनेक ऑर्केस्ट्रा धुमाकूळ घालित होते. महेश कुमार लताच्या आवाजात ‘ऐ मेरे वतनके लोगो’ सादर करी तेंव्हा अक्षरश: टाळयांचा कडकडाट होत

असे. या सगळ्या गदारोळात तुफानी गर्दी खेचणारा ऑर्केस्ट्रा होता सी. रामचंद्रांचा “ भुलाये न बने”! रत्नागिरीला या ऑर्केस्ट्राचा शो जाहीर झाला. नेमके वर्ष आठवत नाही, पण ही साधारणपणे १९७३ - ७४ मधली घटना असावी.

तेंव्हा पेंटर सोहोनींच्या गाडी तळावरच्या (आताचा सावरकर चौक) गणपतीच्या शाळेत तिकिट विक्री व्हायची. ‘भुलाये न बने’ ची तिकिट विक्री सुरू व्हायची होती त्या दिवशी सकाळी सात वाजल्यापासून अशी काय गर्दी उसळली की पेंटर सोहोनींच्या दुकाना पुढे सुरू झालेली रांग आगाशे कन्याशाळे लगतच्या तांबट आळीकडे जाणाऱ्या बोळापर्यंत लांबली. आठ वाजता दुकान उघडलं . पेंटर सोहोनींच्या परिचयातल्या काही बुजुर्ग मंडळीनी कुटूंब कबिल्यासाठी ५/६ तिकिटं राखून ठेवायला सांगितलेली. एरव्ही स्वत: सोडाच मुलानाही सिनेमा बघू न देणाऱ्या वडिलधाऱ्या मंडळीनी सी. रामचंद्राचा ऑर्केस्ट्रा येणार हे कळल्यानंतर सहकुटूंब जायचा बेत योजलेला. त्यानी रांगेत राहून तिकिटं मिळणार नाहीत हे ओळखून पेंटर सोहोनींनाच आगावू भेटून तिकिटांसाठी वर्णी लावून ठेवलेली. पाटणकर नावाचे कोणीतरी गृहस्थ तिकिटं विकायला बसायचे.त्यानी सगळं तोस्तान

उघडल्यावर स्वत: पेंटर सोहोनी त्यांच्या समोर यादी घेवून बसले. त्यांच्या यादीप्रमाणे स्पेशल क्लास मधली तिकिटं फाडून देवून बुकींग चार्ट मध्ये त्या त्या नंबरांवर फुल्या मारून झाल्या. मग पेंटरांच्या परिचयाची काही मंडळी दुकानात आलेली होती त्यांची वर्णी लागली. बघता बघता स्पेशल क्लासमधल्या पुढच्या दहाबारा रांगा फुल झाल्या.

परिचयातली आणखी काही मंडळी मागून पुढून तिकिटे मागतील हे लक्षात घेवून स्पेशल क्लास आणि फर्स्ट क्लास मधली मोक्याच्या रांगांमधली काही तिकीटेही अशीच मागे राखून ठेवल्यावर नंतर रांगेत थांबलेल्यांसाठी तिकीटांची विक्री करायची असा बेत होता. कारण दस्तुरखुद्द सी. रामचंद्र गाणी म्हणणार होते. जुन्या जमान्यातले त्यांचे चाहते प्रचण्ड गर्दी करणार आणि बघता बघता हातोहात चार्ट फुल्ल होणार हा पक्का अंदाज होता. रांगेत ताटकळत उभ्या असलेल्या काही लोकानी हा प्रकार पाहिल्यावर बोंबाबोंब सुरू केली. गदारोळ फारच वाढल्यावर पेंटर सोहोनीनी रागाने दुकानाच्या दारात उभे राहून दम भरला. “तुमचा आरडा ओरडा बंद होई

पर्यंत तिकीट विक्री सुरू होणार नाही .” रांगेतल्या लोकानी मग राजरोसपणे अधिकच कालवा सुरू केला . तारतम्य ओळखून पेंटर सोहोनी दुकानाचे दार बंद करून दुकानाबाहेर पडले. ते त्याच पावली तांबट आळीतल्या पोलिस स्टेशनमध्ये गेले. चौकीतल्या फौजदारानी त्यांची जातीनिशी वास्तपुस्त करून दोन पोलिस त्यांच्या सोबत पाठवून दिले. पोलिस आल्यावर गडबड बंद झाली नी तिकिट विक्री सूरू झाली. साधारण अकरा वाजता बुकिंग फुल्ल झालं नी तिकीट विक्री बंद झाली. रांगेतली लोकं नाराज होवून माघारी फिरली.

मला हा ऑर्केस्ट्रा बघायचा होता. संध्याकाळी आम्ही चार पाच मित्र तिकिटं काढायला गेलो तेंव्हा अकरा वाजताच बुकिंग फुल्ल झाल्याचं कळलं. आम्ही नाराज झालो . पण माझं दैव बलवत्तर होतं. आमच्या आगाशे वाड्यात त्यावेळी किल्लेकर यांचे रेडिओ दुरुस्तीचे दुकान होते. किल्लेकर हे बॉर्न टेक्निशियन होते. त्यावेळी रत्नागिरीत लता आणि राधाकृष्ण ही दोन सिनेमा थिएटर होती. श्रीराम नाट्यगृह आणि पुरुषोत्तम ओपन एअर नाट्यगृह होते. सिनेमा थिएटर मध्ये किंवा नाट्यगृहामध्ये ऐन वेळी काही तांत्रिक बिघाड झाला तर

तिथले मॅनेजर भगवान किल्लेकरांकडे यायचे. किल्लेकर हातातलं काम टाकून त्यांच्या सोबत जायचे आणि तांत्रिक बिघाड चुटकीसरशी दूर करून द्यायचे. त्यामुळे या चारही ठिकाणी किल्लेकर कधिही गेले तरी त्याना रिझर्व कोट्यातल्या अगदी पुढच्या रांगेतल्या सीट मिळत.

किल्लेकर स्वत: ऑर्गन आणि व्हायोलिन वाजवीत. मी अधून मधून त्यांच्याकडे गाणी ऐकायला बसत असे. ते आणि भाऊसाहेब गोवेकर, भाई हेळेकर, विजय पटवर्धन, सांगली रेडिओ स्टार एम्. जी. पटवर्धन, काका मलुष्टे, तोडणकर अशा काही मंडळीनी संगीत मंडळ स्थापन केलेलं होतं. त्या संगित मंडळाचे गाण्याचे कार्यक्रम व्हायचे. त्यानी राज्यस्तरीय नाट्य स्पर्धेत भाग घेवून प्रथम क्रमांक मिळवलेला होता. दर ररिवारी भाऊसाहेब गोवेकरांच्या घरी त्या मंडळींचा सराव व्हायचा. किल्लेकरांशी मैत्री झाल्यावर मी रविवारी श्रोता म्हणून जात असे. भाऊ साहेब ऑर्गन , भाई हेळेकर तबला नी किल्लेकर व्हायोलिन साथ करीत. विजय, एम्. जी. हे गायन करीत.



किल्लेकरानी आपल्या मित्रवर्गासाठी सीट ठेवायला सांगितले होते. त्या मंडळींबरोबर माझीही वर्णी लागली. मला एक पै ही खर्च न करता पुढच्या रांगेत बसून ऑर्केस्ट्रा

पहायला मिळाला. फाटक हायस्कूलच्या पुरुषोत्तम स्मृती खुल्या थिएटर मध्ये ऑर्केस्ट्रा व्हायचा होता. शो च्या वेळी दहा बारा पोलिस बंदोबस्ता साठी आलेले होते. थिएटरच्या भिंतीं पलिकडे अभ्यंकरांच्या डेअरीच्या आवारात घुसून गवताच्या गंजीवर, चिरेबंदी तटालगतच्या झाडांवर चढून शेकड्याच्या संख्येने माणसं बसलेली होती. ऑर्केस्ट्रा सुरू झाला. भोली सुरत नी गोरे गोरे ओ बांके छोरे ही दोन गाणी झाल्यावर निवेदकाने अकल्पित पणे घोषित केले की, “लोकाग्रहास्तव उद्या रात्री याच वेळेला याच रंगमंचावर भुलाये न बने चा शो सादर केला जाईल. याची तिकिट विक्री उद्या श्रीराम नाट्यमंदिर जवळ करण्यात येईल.” घोषणा ऐकल्यावर टाळया नी शिट्ट्या मारून प्रेक्षकानी थिएटर डोक्यावर घेतले.

खुल्या थिएटरमध्ये एरवीच्या वेळी नाटकं वगैरे होत तेंव्हा एक अंक झाल्यावर, आणि काही वेळा बुकिंग फुल्ल झालेलं असेल तर नाटक सुरू झाल्यावर अर्ध्या तासात थिएटरची प्रवेशद्वारं उघडून पब्लिकला मुक्त प्रवेश दिला जाई. ' भुलाये न बने' च्या शो च्या वेळी मात्र पिटातही तुफानी गर्दी असल्यामुळे इंटर्वलला व्हॉलिंटिअर्स नी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवून तिकिटं चेक करूनच प्रवेश

दिल्यामुळे इंटर्व्हलला आत घुसायला थांबलेल्यांचा चांगलाच विरस झाला. दरम्याने दुसऱ्या दिवशी हाच शो होणार असल्याची बातमीही फुटली आणि तसा बोर्ड ही झळकला.

त्याचं असं झालं की ऑर्केस्ट्राचा शो होता त्यारात्री आयत्यावेळी तिकिट काढून जायचा बेत करून आलेल्यांचा चांगलाच पचका झाला. कारण बुकिंग झालं त्याच वेळी पिटातली तिकिट विक्रीही नेहमीपेक्षा दीड पट जादा झालेली होती. कहर म्हणजे ब्लॅकने तिकिट विकणारांची तिकिटंही हातोहात खपली. आयत्यावेळी तिकिट काढायला आलेल्यांपैकी कुणातरी धनिक मारवाडी पुत्राच्या ही गोष्ट जिव्हारी लागली. तो जिद्दीलाच पेटला. तो लगेच घरी जावून कॅश घेवून आला नी त्याने शो सुरू होण्यापूर्वी आत जावून ऑर्केस्ट्रा प्रोग्रॅम अरेंजरची भेट घेतली. “उद्या याच ठिकाणी हाच शो ठेवा, तुम्हाला या क्षणी बिदागीची पूर्ण रक्कम मी रोख देतो.” अशी गळ घातली.

रसिक श्रोत्याची ही विनंती ऐकल्यावर सी. रामचंद्र थक्क झाले. कर्मधर्म संयोगाने पुढचे दोन दिवस मोकळेच होते. म्हणून मारवाडी पुत्राची ऑफर सी. रामचंद्र यानी स्विकारली. त्या लक्ष्मी पुत्राने

ने शोची पूर्ण रक्कम रुपये १२,००० तत्काळ जमा केली. त्यावेळी ही रक्कम फार मोठी, अगदी सधन - पैसेवाल्याच्याही आवाक्याबाहेरची होती. दुसरे दिवशी श्रीराम नाट्यमंदीर मध्ये तिकिट विक्री झाली. कसलीही जाहिरातबाजी न करता अडीच तीन तासात शो फुल्ल झाला. जिद्दीला पेटून मोठी रक्कम मोजणाऱ्या मारवाडी पुत्राची रक्कम एका दिवसात सव्याज वसूल झाली. रात्री तिकीट बुकिंग केलेला नियोजीत श्रोतृवंद आसनस्थ झाल्यावर त्या दिलदार मारवाडी पुत्राने शोच्या आरंभीच प्रवेश द्वारे उघडून बाहेर जमलेल्या घुसपासाना मुक्त प्रवेश दिला. मुंगीलाही शिरायला वाव मिळणार नाही एवढ्या भाऊतोबा गर्दीत 'भुलाये न बने' चा लोकाग्रहास्तव सादर केलेला खास शो संपन्न झाला. हा खास शो सुद्धा किल्लेकरांमुळे मला पुन्हा पाहता आला.

त्या नंतर काही दिवसानी प्रमिला दातारांचा 'सुनहरी यादे' हा ऑर्केस्ट्रा आला. त्यावेळीही अशीच राडीराड गर्दी लोटली. त्यावेळी शो आणणाऱ्या कंत्राटदाराने दुसऱ्या दिवशी पुन्हा 'सुनहरी यादे' चा शो ठेवला. तो शो ही दुसऱ्या दिवशी असाच हाऊसफुल्ल झाला होता. आज या घटना जुन्या जाणत्या रत्नागिरीकरांच्या स्मरणात

कदाचित असतील-नसतील. कारण गुगलवरही भुलाये न बने, शंकर जयकिशन कल और राहुलदेव आज, महेश कुमार अॅण्ड पार्टी, झंकार या ऑर्केस्ट्रांबद्दल काहीही माहिती मिळत नाही. एकेकाळी रसिकांची गर्दी खेचणारे हे ऑर्केस्ट्रा काळाच्या उदरात लुप्त झाले आहेत. सी . रामचंद्र यांचा ऑर्केस्ट्रा होता नी तो तुफान लोकप्रिय ही झाला होता ही गोष्ट त्यावेळी मोबाईल , यु ट्युब सारखी प्रचार प्रसार माध्यमे नसल्याने समाजातील विशिष्ट वर्गापलिकडे फारशी कुणाला ज्ञात नाही.

# ६. बियाण्याचा कोंबडा

तीन कच्चीबच्ची पोरं काशीच्या गळयात टाकून लखू धनावडा मेला. दोन कलमं आणि जेमतेम पाच मण भात नी दीड दोन मण नाचणे पिकतील एवढी तुटपुंजी जमीन....... पण काशी डगमगली नाही. जोताचे दोन बैल, दुभती गाय नी तिची दोन वासरं असा गुरांचा बारदाना ती निगुतीने सांभाळायची. त्यांच्या जोडीला सदू भटाकडून दोन रेड्या पोसणीला आणल्या.तिला ढोरा वासरांची मुळात चांगली हदन. तिची गाय लिंबासारखी टुकटुकीत असायची. उन्हाळी सड्याशिवराला जावून ती आईन, धामण, हसाणी, बिवळा, पिंपळ असा झाडांचा वेंगाटभर पाला आणी. लांब लचक आवती काठीच्या टोकाला चारीची लखललखीत कोयती बांधून उंचावरच्या पाल्याचे टाळे कापी. पावसाळी भटांची आगरं साफ़ करून देण्याच्या बोलीवर चार कापून आणी. गिमभर दुपारच्या विरडीला सड्यावर जावून करड गवताच्या

वरंडी आणून बेगमी करी. गायीच्या दुधाचा दुवक्त रतीब घाली. तिच्याकडे कायम दहाबारा कोंबडी असत. नवरा मेल्यावर तिने कोंबड्यांची संख्या वाढवली.

काशीचं घर वाडीत एका बाजूला आडवणाच्या धारेबरोबर. दिवसा-ढवळया कोल्हे बाऊल येवून कोंबडी मारीत.तिने तोरणीची, करंदीच्या काटेरी शिरड्याचे भारे आणले. शिव्या भोवतळयाला कामाला बोलावून चिव्याची शिरड आणि काटेरी शिरडी वापरून गच्च तटकी बांधून घेतली. दोन दिवसात सग़ळया आगराला तटक्यांची बंदस्ती झाली. आता कोल्ह्या-बावलांना आगरात शिरायचा मार्ग बंद झाला. गावात दिन्या गावकराकडे मोठ्या कोंबड्याची जात होती. गावठी कोंबड्याच्या दीडपट मोठा पक्षी, आरू चार आंगळं लांब रुंद, तंगड्या बापया माणसाच्या पायाच्या आंगठ्या एवढ्या भरदम. पाखरू वजनाला जास्त भरे. लोक झटून हे इंग्लीश कोंबडे चढ्या भावाने घेत. गावठी अंडी दोन पैशाला तीन असा दर होता. पण इंग्लीश कोंबडीची अंडी गावठी पेक्षा मोठी नी रंग लालसर दिसे. ती पैशाला एक अशा दराने खपत. खुप लोक या कोंबड्यांची निपज करण्यासाठी पिली मागत. पण दिन्याची बाईल मागणाराना धुडबुडाऊन

लावायची. “इले मोटे पिली मागनारे.....मी माज्या म्हायारसून मुद्दम ह्या बियाणा हानला तां काय चोरापोराक वाटूसाटना नाय! माज्या बापाशीन माका सांगलेला हा..... येळेक पागून हाडलेल्या माशातले चार माशे शेजारी पाजारी दिवचे पन खैच्या कोंडीवर पाग टाकलो तेचो ठिकानो सांगायचो नाय.” गावडीण एवढी सावध की ती मटणासाठी कोंबडं मागायला आलेल्या गिऱ्हायकाला फक्त नर कोंबडे नी रोवणीवर बसायच्या बंद झालेल्या निबर कोंबड्या तेवढ्याच विकी. तलंग कधी चुकूनही विकीत नसे, न जाणो कोणी तरी ती बाळगील नी इंग्लीस कोंबड्याची निपज होईल. आपल्याला दुसरा प्रतिस्पर्धी होवी नये या साठी तिचा हा आटापिटा चाललेला असायचा. काशीने कोण कोण मध्यस्ती घालून पिली मिळवायची जबर खटपट केली, अगदी चढा दर देण्याचे आमिष सुद्धा दाखवले पण गावडीण बधली नाही.

काशी कोयत्या पाजळायला परशा सुताराच्या शाळेत गेली होती. आंघोळीच्या न्हाणीत किंवा चुलीत विस्तव पेटत असताना ती कायम मोठे मोठे निखारे विझवून कोळसे साठवून ठेवी. ती कधीही सुतार शाळेत आयदण- हत्यार घेवून जाताना टोपुलभर कोळसे न्हेत असे.

म्हणून गेली की परशा आधी तिचं काम हातात घेई. परशा कोयत्या तापवीत असताना 'क्लक् क्लक्' करीत कोंबड्या अंगणात आल्या. त्यांच्या जथ्यात तीन मोराची पिल्लं होती. काशी आश्चर्याने म्हणाली, "भावजीनू, हे मोर कशे काय मिळाले?" त्यावर परशा म्हणाला, " दीड म्हैन्या पूर्वी मी शिकारीक गेललय..... थय झाळीत लांडोर दिसली म्हनू बार टाकलो. लंडोरा थंयच पडला. तेका उकलूक गेलंय तवा झाळीच्या मुंदात तीन कवटां उमागली. तवां मी उमाजलय्..... रोवणीर बसलेली लांडोर आपून मारली. मी तीनव कवटां उकलून हानली नी कोंबडीच्या रोवणीत थेवली..... नी हे तीनव मोर जलामले."

"ह्या तुमी भलताच डोक्या चलवलास....... दुसरो तिसरो कोन आस्तो तर लांडोरी वांगडान तेची कवटा दुकू खावन् मोकळो झालो आस्तो." दीर्घ सुस्कारा टाकीत परशा म्हणाला,"विठ्ठला देवीच्यान सांगतय काशीबाय, बार लागोन पडलेला लांडोरा उकलताना तेची कवटां दिसली ना... तवा, माज्या काळजाक् चरको बसलो. ह्यां पाप झाला आपल्या हातसून. म्हनून देवाचा नाव घेवन माफी मागली. नी ते येळेक ही कवटां कोंबडीच्या रोवणीत ठेवचा सुचला माका. लांडोर मी थयच भिक्या मोंड्याक देवन टाकली. नी पुन्ना मितीक लांडोरीवर

बार टाकायचो नाय नी लांडोरीचा मटान पन खावचा नाय, अशी आण घितली. देवाच्या दयेन ही दोन मोराची पिला निपाजली, नी माजा पाप फिटला. मी ती बाळगनार!" हात जोडीत काशी म्हणाली "तुमी भावजीनू भलतेच भावरती आसास....." कोयत्या घेवून घरी जाताना अकल्पितपणे तिला नामी युक्ती सुचली. आपणही गावडीणीकडून इंग्लिश कोंबडीची अंडी आणून ती रोवणीत ठेवून पिली मिळवायची! वाडीतल्या पोराला सांगून तिने अंडी विकत आणली.

पोराला बजावलेलं होतं, अगदी सकाळीच भिणभिणताना जायचं नी लालसर रंगाची अंडीच उचलायची. त्या प्रमाणे उजाडल्या बरोबर काशीने त्याला हाक मारली. पोरगा लगेच एक आणाघेवून गावकरवाडीत गेला.त्या वेळी गावडीण उठायचीच होती. सकाळीच अंड्याचं गिऱ्हाईक आलं म्हणताना दिन्या गावडा सुद्धा चकित झाला. मशेरीचा खकाळा थुंकून त्याने विचारलं, "इतक्या बेगून कसो काय इलंस? " पोर हुषार होता त्याने लगेच उत्तर दिले. "आज आटच्या गाडयेन बाबा डबो घेवन जावचो हा.....तेका अंड्याची पोळी देवची हा." सोप्यालगतच्या पडवीत कोंबड्यांची डालगी होती. दिन्या

गावड्याने तिथे पोराला नेवून त्यालाच अंडी उचलायला सांगितली. त्याने सहा अंडी उचलली नी सहा पैसे देवून तो निघाला.

पोराने अंडी आणल्यावर काशीने त्याच्या हातावर चार बटण बिस्कुटे टेकवली. रोवणीवर बसलेल्या कोंबडीची अंडी उचलून तिने गावड्याकडून आणलेली अंडी रोवणीत ठेवली. एकवीस दिवसानी सहाही अंड्यातून सहा पिली बाहेर पडली. काशी त्या पिलांची डोळ्यात तेल घालून निगुती राखी. त्यांच्यासाठी चण्याच्या डाळीचा भरडा काढून तो तांदुळाच्या कण्यांत मिसळून त्यात अधून मधून हळद, मिरी पावडर, गूळ, अल्याचा चोथा मिसळून खाऊ घाली. दर पंधरवड्याने कोंबड्यांच्या खाण्यात समुद्रफेणीचा चुरा मिसळून घाली. पिली महिनाभराची होईतो ती बाहेर फिरत असताना एका चेडवाला त्यांच्यावर राखणीला ठेवून वेळेवारी त्याना डालग्याखाली झाकून ठेवी.

दोन अडीच महिने मागे पडले नी गावड्याकडच्या पिलांचा वाण नजरेत भरण्या इतपत दिसायला लागला. त्यात दोन कोंबडे नी सहा तलंगी निपजल्या. देवाच्या दयेने चांगला वाण मिळाला म्हणून दोन कोंबड्यातला एक तिने देवाला सोडला. देवाला सोडलेल्या कोंबड्याला डालग्यात झाकीत नाहीत, नी तो विकायचाही नसतो. तो

आपल्या मनाने जिथे जाईल तिथे जाऊ द्यायचा. पण काशीने देवाला सोडलेला कोंबडा ठिकाणाबाहेर जाईना. संध्याकाळी बाकीच्या कोंबड्याना झाकल्यावर देवाचा कोंबडा पडवीच्या माळ्यावर रात्रभर बसून राही.



पाच महिन्याच्या भरीला नर चांगले वाढून दमदार बांग द्यायला लागल्यावर काशीने गावठी कोंबडे विकून टाकले. नवीन जातीच्या तलंगी आता रोवणीवर बसायला लागल्या. काशी त्याना इंग्लीश कोंबे म्हणे. आठ महिन्याच्या भरीला इंग्लीश कोंबडे ढोपरभर उंच वाढले. काशीच्या निगुतीत कोंबडे असे माजले की, ‘एक्या कोंब्याचा मटान धा मानसांच्या कुटूंबाक पुरात’ असं लोक कौतुकाने म्हणत. काशीने कोल्ह्या- बावलांचा आरेख केलेला असला तरी कावळे -घारी अधून मधून पिली पळवायला येत. पण इंग्लीश कोंबडे मोठे वाढल्यावर कावळ्याना तर ते कळपा जवळ फिरकूही देत नसत.

एक दोनदा घार आल्यावर दोन्ही बकासूर घारीवर असे तुटून पडले की कोंबड्यांचा कलकलाट नी घारीची किचाळी आयकून काशी चुलीवरची भाकरी तशीच टाकून काठी घेवून अंग़णात आली. तेंव्हा घार जमिनीवर उताणी पडून पंख फडाफडावीत आळपत होती नी दोन्ही कोंबडे दोन बाजूने तिला बोचीत होते. काशीला बघून कोंबडे बाजुला झाले नी तरमळत बाजुला सरकून घार उडाली. दोन्ही कोंबडे तिच्या मागून झेपावले नी घार ऊंच गेल्यावर खाली उतरले .

a

वर्षभरात इंग्लीश कोंबडीची पैदास चांगलीच वाढली. सहा नर कोंबडे नी पंधरा वीस कोंबड्या इतके नग झाले. ही जात गावठी पेक्षा दुपटीने जादा अंडी देणारी नी वाढही झटपट होणारी. अंड्यापासून पिलगी निपजू नयेत म्हणून काशी सकाळीच विक्रीची अंडी डालग्यातून उचलून बाजूला करून ती पाण्यात ठेवून दोन- तीन दिवसानंतर विकी.काशीचा इतका चांगला जम बसला रोज पंचवीस तीस अंड्याची विक्री व्हायला लागली. आता कोंबड्याना पहिली जागा पुरेना म्हणून गोठ्याला दुसरी पडवी काढावी लागली. काशीने ही जात कूठून कशी पैदा केली याचे लोकाना भलतेच कुतूहल! पण काशीने केलेली हिकमत ही कोणालाच उलगडणारी नव्हती. त्यानी चौकशी केल्यावर ही पिलग़ी फोंड्याच्या बाजारातून भावाने आणून दिली म्हणून ती सांगे.

# ७. दोस्ती चिपांझीशी

(दि ग्रेट रॉयल सर्कस मधिल दिवंगत ॲनिमल ट्रेनर आणि रिंगमास्टर, कुडाळ - वालावलचे प्रोफेसर अर्जुनमामा वालावलकर यांच्याशी ०९/०९/१९९२ रोजी सांगली मुक्कामी झालेल्या गप्पांवर आधारित )



सर्कसवर पुस्तक लेखनाचा माझा बेत ठरल्यावर वेळ मिळेल तेंव्हा सर्कस मुक्कामी असेल तिथे मी जात असे. माझी राहण्याची सोय तंबू नजिकच्या एखाद्या उत्तम हॉटेल मध्ये करण्यात येई. चहा, नाष्टा, नी दुवक्त भोजन मात्र मी सर्कसतंबूतच घेणे पसंत करी. सर्कसमधल्या कलाकारांपासून तो नोकर कामगारांपर्यंत सर्वांचे चहा, नाष्टा नी शाकाहारी/ नॉनव्हेज दोन्ही प्रकारचे दर्जेदार जेवण सर्कसच्या रसोईतच बनवले जाई. तीन चार प्रकाराच्या भाज्या, कोशिंबीरी, चटण्या, लोणचे, भात, पुलाव, पुरी किंवा रोटी, नान नी दुवक्त स्वीट डिश असा भरगच्च मेन्यू शाकाहारींसाठी असायचा. माझी तर लेखक म्हणून खास बडदास्त कूक मंडळी जातीनिशी राखित. सर्व्ह करणारे तर नको नको म्हटले तरी थाळी भरून आणित नी आग्राहाने वाढीत. अन्न वाया घालवणे मला बिलकूल आवडत नाही पण सर्कसमध्ये जेवताना दरवेळी पानात काहीना काही जिन्नस टाकावा लागे. सर्कसवाल्यांचे त्यावर स्पष्टिकरण असे असायचे कि, तुम्ही थाळीत जिन्नस टाकलेत की तुमचे भरपेट जेवण झाले असं आम्ही मानतो. सर्कस मालक प्रताप तर दहा प्रकार मागवून दोन चमचे मारून आख्खी डिश वाया घालवीत असे. अर्थात

सर्कसचा शिकारखाना एवढा मोठा होता की टाकलेले अन्न कितीही असो, ते कारणी लागत असे.

या खेपेला अगदी प्रथमच अर्जुनमामा अनुभव कथन करणार असे पेंडुरकर बोलले. यापूर्वी झालेल्या दोन तीन खेपांमध्ये अर्जुन मामा जेवढ्यास तेवढे बोलणारे मितभाषी असे मी समजत होतो. पण मागच्या खेपेला प्रोफेसर मामा पेंडुरकरांवर लिहिलेला लेख अर्जुनमामानी दोन तीन वेळा वाचून काढला नी माझ्या लेखन कसबावर ते भलतेच लट्टू झाले. असं सर्कस शो अॅरेंजर प्रोफेसर अनंतकाका मला बोलले. आपले अनुभव, कार्य पुस्तक रुपाने शाश्वत रहाणार याचं त्याना भारी अप्रूप वाटलं. “ मामांची गोष्ट वाचताना ते अगदी प्रत्यक्ष बोलतं हत आसा वाटतां” अशी मनमोकळी प्रतिक्रिया त्यानी दिली. त्यामुळे आमच्या दरम्यानचं अंतर कमी झालं आणि एक शब्दही हातचा राखून न ठेवता त्यानी अत्यंत निर्मळ हेतूने नी मोकळ्या मनाने माझ्याशी प्रांजलपणे संवाद साधला. त्या नंतरही माझ्या ज्या ज्या वेळी खेपा झाल्या त्या त्या वेळी अर्जुनराव भरभरून बोलायचे.

१९४७ या वर्षाला माझ्या आयुष्यात अत्यंत महत्वाचे स्थान आहे.१५ऑगस्ट ला भारत स्वतंत्र झाला आणि दीड महिन्याने म्हणजे

ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात मी " दि ग्रेट रॉयल सर्कस " मध्ये कसरत शिकण्यासाठी शिकावू उमेदवार म्हणून दाखल झालो. माझे वडिल बंधू दिगंबर वालावलकर हे प्रोफेसर नारायणराव यांच्या ट्रॅपीझ च्या ट्रूप मध्ये पर्शुराम लायन सर्कस, जी. ए. सर्कस मध्ये काम करायचे. त्यावेळी मादुस्कर सर्कस (१९२० ते१९४६) ही प्रो. विश्वनाथ मादुस्कर आणि प्रो. सीतारामपंत वालावलकर यांच्या संयुक्त मालकीची होती. पुढे १९४६ मध्ये प्रो. मादुस्कर वारल्यानंतर सीताराम पंतानी नारायणरावाना मादुस्करांची भागिदारी घेण्याची गळ घातली आणि त्या दोघांच्या संयुक्त मालकी खाली मादुस्कर रॉयल सर्कसचे नामांतर " दि ग्रेट रॉयल सर्कस" असे करण्यात आले. नारायणराव स्वत: नियमितपणे ॲक्ट्मध्ये सहभागी असायचे पण आता वाढत्या जबाबदारीमुळे त्यानी ट्रॅपीझ ट्रूप दिगंबरकडे सोपवला.त्याच दरम्याने सर्कस कलकत्ता मुक्कामी असताना त्यानी सर्कसच्या मालकीचा मृत्यूगोल तयार करून घेतला. ट्रॅपीझ ट्रूप मधले अनंतकाका बाहेर पडले नी मृत्यूगोलात रायडिंग करू लागले.

अनंत काका आणि दिगंबर यानी कुडाळ वेंगुर्ला भागातून नाते संबंधातली,ओळखीची होतकरू मुले कसरतीची कामे

शिकण्यासाठी भरती करून घेतली. वर्षभरात सायक्लिंग़, ट्रपीझ आणि केज बॉईज अशा ब-याचश्या विभागात कोकणातून खूप मुलं दाखल करून घेण्यात आली.अशाच एका खेपेला दिगंबरने मलाही सर्कसमध्ये रुजु करून घेतले. माझे वय त्यावेळी जेमेतेम ११ आणि शिक्षण चौथी यत्ता. त्यावेळी सर्कसचा मुक्काम मुंबईला होता. वालावल सारख्या आडखेड्यातून आलेल्या माझ्यासारख्या बाळबोध गावंढळ मुलाला हे विश्वच नवलाईचे वाटले. हत्ती, घोडे, वाघ- सिंह यांच्या अद्भुत नगरीत मी पुरता चक्रावून गेलो. आम्ही सर्कस तंबूत गेलो त्याच दिवशी दिगुदादाने सहाच्या शोला मला प्रेक्षकांच्या गॅलरीत नेवून बसविले. “ हय चिप बसान -हव. त्ये वर छताक बांदलले दोरयांचे झोपाळे आसत ना तेच्यार माझा काम आसा. मी वाघळासारखो उलटो लटकान झोके घेतलय... तु भिया नुको माका काय्येक व्हतला नाय.खेळ संपलो काय मी तुका आत घेवन जायन तंवसर हयसून खय बाजूक जायाचा नाय... कळला?” दिगु दादा निघून गेला.

मी चितागती होवून चौफेर दिसणारा पहात राहिलो. प्रेक्षकानी गच्च भरलेला तो तंबू बघून मला धडकीच भरली. थोड्याच वेळात सर्कस बॅण्डवर मंजूळ संगीत वाजू लागले. मी लक्ष्मी नारायणाच्या

देवळात दशावतारी धयकाला पाहिलेला होता. तसे पार्टी गणपती, देवीचे मुखवटे लावून येतिल नी गाणी म्हणत नाचकाम सुरु करतील असा आपला माझा अंदाज.... पण समोर जे दिसलं ते बघून मला अजाप वाटलं.... हातात झेंडे घेवून स्त्री पार्टी आले पण त्यानी काश्ट्याच्या साड्यांऐवजी तुमानी नी झंपर घातलेले.... असलं नेसण घालून आलेले ते स्त्री पार्टी बघून माका जाम हसो इलेलो. वाघ,सिंह, हत्ती, घोडे यांची कामे नी विदूषक मला भारीच आवडले. मग बायामाणसे सायकली फिरवून गेली. आता हळू हळू माझ्या लक्षात येवू लागले की ते पुरुष पार्टी नसून खरी बायल माणसेच होती ती. शेवटी गंजीफ्रॉकाच्या कापडासारखे घट्ट कपडे घातलेले नी कमरेला लंगोटा घातलेले बापये नी बायल माणसे यांचे दोरीच्या झुल्यावरचे खेळ सुरु झाले. त्यातले नारायणराव मी आदी वळकूकच नाय.

७/८ बापये, ४/५ बाईल माणसे नी दोन विदुषक दोरीच्या शिड्यांवरून झर झर चढून वर गेले. त्या घोळक्यात मला दिगंबर दिसेचना. झोके वरखाली हालायला लागले. लांब दोरीच्या झोक्यावरून आलेले मध्येच हात सोडून उलटे लटकणा-या माणसाचे हात पकडून एक झोका घेत नी पुन्हा हात सोडून लांब दोरीचा झोका

पकडून माघारी जात. मग एक विदुषक आला. मी ओळखले, तो दिगूदादा होता.त्याने झोक्याचे हात हात न सोडता पाय पुढे केले. त्याचा लेंगा सुटून नारायणरावांच्या हातात आला. त्याने उडी मारलीच नाही. लोक हसले नी त्याची फजीती झालेली बघून मी खजील झालो.दुस-या खेपेला तर भलतीच गडबड झाली नी आमचा दिगंबर सरळ खाली जाळ्यात पडला. लोकानी टाळ्या वाजवून त्याची टर उडवली नी मला पण जाम कोप आला. खेळ संपल्यावर मी म्हटले, “ तुका झोपाळ्यावयला काम येयना नाय तर वगीच कशाक गेल्लस ?” त्यावर तो बोल्लो काय “लोकांक हसव साटी मुद्दान तसां करतंव आमी..... लोकांक हसवनां ह्यांच तर विदुषकाचा काम.”

लौकरच माझे ट्रेनिंग सुरु झाले. सकाळी अडीच तीन तास भरपूर व्यायाम, दोन वेळा चविष्ट जेवण नी दिवसभर पडेल ते काम करायचे हे सर्कसचे जीवन माझ्या आंगवळणी पडले, तीन चार महिन्यानी आमच्याच भागातला पेंडुरातला मनोहर पेंडूरकर सर्कशीत आला. त्याची माझी चांगलीच गट्टी जमली. आम्ही जोडीने रहायला लागलो. सुरुवातीला जिम्नस्टिक फ्लोअर एक्झरसाईजचा सराव झाल्यावर आम्ही ट्रपीझवर समरसॉल्ट, फिरवेट जंपिंग शिकलो.

या बरोबरच रोप बॅलन्सिंग, हॉरीझोण्टल बार एक्झरसाईझ सुरु होत्या. आम्ही दोघेही अदलून बदलून आयटम्स करायला लागलो. काही वेळा तोंडाला रंग फासून नी ढगळ कपडे घालून मी विदूषक होई. विदुषकाचे काम करताना मी केलेल्या वांदर चेष्टाना पब्लिक हटकून टाळ्या वाजवी. बघता बघता ५/६ वर्षे कधी संपली कळलेच नाही. नारायणराव, सीतारामपंत आमची इतक्या प्रेमाने विचारपूस करीत की आम्ही मायेची माणसे सोडून इकडे दूर असूनही घरच्या आठवणीने कधी बेचैनी आली नाही. दिगंबर नी अनंत हे आम्हाला कितीतरी सिनियर..... दोघेही सर्कसचे मोठे आर्टिस्ट पण ते दोघेही कधी तशा तोयात वागत नसत. आम्ही सगळे कोकण्ये एका कुटूंबासारखे राहू नी संवाद कायम मालवणीतून करीत असू.

खेळीमेळीचे वातारण असल्यामुळे ही सर्कस आमची आहे अशा ममत्वाने आम्ही अंग मोडून काम करू आणि दिसेल त्या कामाला डोई देत असू. सर्कस मोठी करण्यासाठी आम्ही झपाट्ल्यासारखे कामात झोकून देत असू. तंबूच्या कनाती थांगडणे, प्राण्यांचे खाणे पाणी यावर बारकाईने नजर ठेवणे या कामात आला दिवस कधी मावळला ते कळत नसे. मला जात्या गुराढोरांची आवड,

मी हत्ती, उंट, घोडे, कुत्रे आणि वाघ – सिंह यांच्याशी कायम सलगी ठेवून असे म्हणून गरलेला प्राण्यांचे आयटम्स सादर करताना मी रिंग मास्टर गजानन शेलार यांच्या बरोबर एरिनात उतरत असे. सुप्रसिद्ध शेलार्स सर्कस मधले हे रिंग मास्तर आमच्याकडे हत्ती घोडे यांना यांचे आयटम्स सादर करीत आणि त्याना ट्रेनिंगही देत. ट्रेनिंग देताना त्या प्राण्यांशी माझी ओळख असल्यामुळे त्यांचा मदतनीस म्हणून मला अनायासे संधी मिळे. त्यामुळे प्राण्याना ट्रेनिंग देण्यातल्या खुब्या मला नकळतपणे अवगत झाल्या. तसेच त्यांच्या अनुपस्थितीत मी रिंगमास्टर म्हणूनही काम करी. गजानन रावांच्या हाताखाली गिरवलेल्या या बाराखडीने भविष्यात माझे आयुष्य उजळून टाकले.

आमची ‘ दि ग्रेट रॉयल सर्कस’ दिवसे दिवस मोठी होत गेली आणि नशिब अजमावण्यासाठी १९६२ सर्कस परदेश दौ-यावर रवाना झाली. आता मी शिकारखाना सांभाळी आणि हत्ती, घोडे यांचे आयटम्स कंडक्ट करी.१९६३मध्ये सर्कस सुदान येथे खेळ करीत असताना तिथले प्रेसिडेंट शो पहायला आले. सर्कस बघून ते एवढे खूष झाले की, त्यानी एक चिपांझी सर्कसला भेट म्हणून दिला. त्याची देखभाल अर्थातच मी हौसेने गळ्यात घेतली. मी त्याचे नाव ठेवले

राजा. प्राण्याची मर्जी संपादन करायची , जिव्हाळा निर्माण करायचा तर तुम्ही आरंभ काळी त्याच्या सतत नजरेसमोर राहिले पाहिजे. त्याच्या सवयी, लकबी, आवडी निवडी यांचे बारकाईने निरिक्षण केले पाहिजे हा गजाननरावांनी दिलेला धडा मी हृदयावर कोरूनच ठेवलेला....मी माझे बस्तान राजाच्या पिंज-या समोरच हालवले. तीन चार दिवसातच त्याची माझी गट्टी जमली. मी पिंज-यात हात घालून त्याला थोपटणे कुरवाळणे इथपर्यंत पल्ला गाठला. माकड हा माणसाचा पुर्वज मानतात. तो माणसा इतकाच हुषार आणि अनुकरणाने शिकणारा आहे. रामायणातल्या वाली, सुग्रीव, नळ, नीळ जांबुवंत यांच्या कथा आठवून मला एक विचार सुचला. मी त्याला वेडीवाकडी तोंडे नी हावभाव करून दाखवू लागलो. तसे तोही माझे अनुकरण करू लागला. येता जाता माझे लक्ष वेधून घेण्यासाठी तो मला अशा काही वाकुल्या दाखवायचा की ते पाहून बघणाराची हसून हसून मुरकुंडी वळायची.

याला रिंगणात उतरला तर प्रेक्षक याला डोक्यावर घेतील नी हा आमच्या सर्कसमधला एक आयट्म ठरेल हे ओळखून मी नारायणरावाना बोलावून त्याच्या करामती दाखवल्या नी याचा एखादा आयटम शो च्या वेळी सादर करायची परवानगी मागितली. नारायणराव

गुणग्राहक होते आणि उपजत पशूशिक्षकही होते. राजा प्रौढ आहे, त्याची मजल मर्कट चेष्टांच्या पलिकडे फारशी जाणार नाही.“कसरत शिकवायची तर चिपांझीचे बच्चे पैदा करुया, माजो पल्लो लय मोटा आसा.... तुका जां सुचला तेच्यात तुजा सपान माका दिसता हा... तुजी जिद हा ना? मी पुरी करतय ” नारायणराव नुसते बोलुन स्वस्थ बसले नाहीत. सुदानला चिपांझीचे बच्चे विकत मिळायचे.आठवडा भरात सर्कससाठी पाच बच्चे खरेदी करून झाले. त्याना माझ्या हवाली करून ते बोलले, “ आता तुझा काम सुरू... तुका बाकीच्या कामात्सून सुटी.... ह्येंका शिकौन ह्येंचो कायतरी आयटम बसौन घी...”



दुसऱ्याच दिवशी मी सर्कस मॅनेजरला सोबत घेवून ज्या झू मधून हे बच्चे आणले होते तिथे जो व्यवस्थापक होता त्याची भेट घेतली. चिपांझीची देखभाल, त्याच खाणं पिणं, त्यांच्या सवयी, त्यांचे आजार आणि उपचार या संदर्भात दीड दोन तास सविस्तर चर्चा केली. चर्चा सुरू असताना सोबतच्या डायरीत महत्वाच्या नोंदी, प्रामुख्याने आजार नी औषधे यांची माहिती टिपून ठेवली. चर्चेतून काही महत्वाच्या गोष्टी मला उमगल्या. चिपांझी म्हणजे न बोलणारा माणूसच.... त्याची रहन सहन माणसासारखीच असते. मादीला स्त्रियांप्रमाणे मासिकधर्महीे येतो. ही प्रजाती थोडिशी विक्षिप्तही असते आणि प्रसंगी माणसांवर जीवघेणा हल्ला करू शकते. त्यांच्या ओरडण्यावरून भय, राग-चीड या लहरी सरावाने ओळखता

येतात. त्याना त्रास दिला, शिक्षा केली तर चिपांझी माणसाप्रमाणे डूख धरून राहातात नी प्रसंगी सूड उगवायलाही कमी करीत नाही. नर चिपांझी वयात येतात त्या काळात महिला दिसल्यावरही ते बिथरतात. त्यांची लहर सांभाळूनच त्यांचे खेळ सादर करायला लागतात.

नव्याने आलेल्या बच्चांमध्ये एक नर आणि चार माद्या होत्या. त्यांची नावे मी रामा, राणी, शांतु, गंगा आणि मीरा अशी ठेवली. त्याना स्वतःच्या नावाची ओळख पटावी म्हणून हातात चॉकोलेट धरून एकेकाचे नाव उच्चारून त्याना जवळ बोलावायचे आणि चॉकोलेट द्यायचे. त्याना कुरवाळताना त्यांच्या नावाचा उच्चार करीत रहायचा. माझी युक्ति फळाला आली आणि ८/१० दिवसात पाचही चिपांझीना आपापल्या नावाचा परिचय झाला. नाव घेवून टिचकी वाजवली की तो तो बच्चा जवळ येईच पण बाकीचे सवंगडीही ज्याचे नाव उच्चारले त्याच्याकडे पहात. माझा त्यांच्याशी होणारा संवाद कायम मालवणीतून व्हायचा. खेरिज ट्रेनिंग देताना सोईचे व्हावे म्हणून कम हिअर, सिट डावून, शेक हॅण्ड अशा ऑर्डर्सचा सराव मी त्याना योजनापूर्वक द्यायचो.



दहा पंधरा दिवस त्यांच्याशी पिंजऱ्याबाहेरून सलगी करून चांगली घनिष्ट सवगव झाल्यावर मी हळूच पिंजऱ्यात शिरलो. मी आत शिरलेला पहाताच राणी धावतच माझ्या जवळ आली आणि टुण्णकन उडी मारून माझ्या खांद्यावर चढून बसली. रामा शांतू गंगा आणि मीरा बुजून पिंजऱ्याच्या कडेला अंग चोरुन राहिली होती. त्यांच्याकडे मुद्दाम दुर्लक्ष करून मी राणीशी दंगा मस्ती चालविली. तिचे हात धरून खांद्यावर उभी केली. अंतराळी झुलवीत कडेवर घेतले. चेहेरा गोंजारून

लहान मुलाचे घेतात तसे मुके घेतले. तीही माज्या कृतींप्रमाणे प्रतिसाद देवू लागली. अशी दंगामस्ती सुरु असता धीर चेपून रामाही जवळ आला. त्याची अलाबला घेत मी त्याला उचलून खांद्यावर घेतले. त्याने प्रेमभराने माझ्या डोक्यावर थोपटीत माझ्या मानेवर तोंड घुसळले. तेवढ्यात अकस्मात माझा हात झिंजाडून रामा दूर झाला, राणी सुद्धा बाजुला पळाली. मी चमकून ईकडे तिकडे बघितले तर कामगार फळांची करंडी घेवून येताना दिसला. मी हळूच पिंजऱ्याबाहेर येत दार लावून घेतले.

कामगार जवळ आल्यावर त्याला पाहून बच्चे कसे बिथरले हे सांगून बच्चांकडे लक्ष न देता आम्ही दोन तीन मिनिटे बोलण्याचे नाटक करीत राहिलो. आता सारे काही आलबेल झाले. कामगाराने आणलेल्या करंडीचे झाकण बाजुला झाल्यावर आतला पिवळाजर्द केळयाचा फणा बघून रामा आणि मीरा ख्यॅक्क ख्यॅक्क असे आनंदाचे चित्कार करू लागली. आता राणी शांतू गंगा यांच्याही नजरेला केळी पडताच चौघानी एकच गिल्ला सुरु केला. मी कामग़ाराला चार केळी तोडून पिंज-याच्या गजातून आत सरकवून उभे रहायला सांगितले. पण साताठ मिनिटं गेली तरी चौघांपैकी एकही

बच्चा पुढे आला नाही. उलट त्यानी रागाने गुरगुरायला सुरुवात केली. मग मी त्याला केळी आता टाकून बाजुला जावून बसायला सांगितले.त्या दिवशी संध्याकाळ पासून त्याना खाणं देताना मी दोन्ही केजबॉयना बोलावून घेवून खाण्याच्या थाळया त्यांच्याकरवी देण्यास सुरुवात केली. आठवडाभरातच चिपांझींच्या बच्च्यांची केज बॉईजशी सवगव वाढली आणि ते त्यांच्याकडूनही कुरवाळून घेवू लागले.

नारायणराव हाडाचे पशू शिक्षक, ते कोटाचे खिसे भरभरून चॉकोलेट्स आणित अन रामा, शांतू, मीरा, राणी, गंगा याना हाकारित मुठी भरभरून त्यांच्या दिशेने फेकित अन नंतर त्यांच्याकडे पाठ वळवून माझ्याशी आठ दहा मिनिटे टाईमपास करत. मग पुन्हा मुठी भरभरून चॉकोलेट्स उधळून निघून जात. असे चार पाच वेळा झाले. मात्र नारायणरावानी एकदाही त्यांच्याशी सलगी साधायचा प्रयत्न मुद्दामच केला नाही. नंतरच्या खेपेला मात्र नारायणराव येताना दिसल्यावर पाचही बच्चे धावत गजांच्या कडेपर्यंत येवून आनंदाचे चित्कार टाकू लागले. त्यानी मुठी गजातून आत सरकवताच सगळयानीही मुठी उघडून चॉकोलेट्स हिसकावून घेतली. ते पिंज-याच्या गजाना खेटून रहिलेले.

शांतू पुढे आली आणि गजाबाहेर हात घालून त्यांच्या कोटाच्या खिशातून चॉकोलेट्स खेचून घेतली. आता सगळी बच्चे कंपनीच गजाकडेला येत त्यांच्या खिशाशी झोंबू लागली. चॉकोलेट्स खाता खाता गजावर चढून त्यांचा चेहेरा कुरवाळू लागली. नंतर जवळसार कुठे नारायणरावांचा आवाज ऐकला तरी बच्चे नुसता उच्छाद करीत.

आता त्याना पिंज-याबाहेर काढून ट्रेनिंग द्यायची पूर्व तयारी मी सुरु केली. शो सादर करताना त्याना चड्डी,लंगोटा, सदरा घालून सजवायचा बेत मी योजला. कपड्याची सवय व्हावी म्हणून तीन चार चड्ड्या घेवून मी पिंजयात गेलो. मी चड्डी घालायची अॅक्शन केल्यावर शांतु पुढे आला नी एक चड्डी उचलून घालायचा प्रयत्न करू लागला. मी पुढे होवून त्याला चड्डी नेसवली. दोन तीन दिवस हा खेळ खेळल्यावर चारही बच्चे कपडे घालून घेवू लागले. आता सकाळी सर्कस वीरांचा सराव सुरु असताना चिपांझीचा पिंजरा मी तिथे नेवून ठेवी. तसेच त्यांचा सराव होताना बॅण्डवाल्याना धून वाजवायला सांगत असे आणि लाईट्चे झोतही टाकीत असू. हेतू हा होता की या सा-या गोष्टी चिपांझींच्या अंगवळणी पडाव्यात. माझा हेतू सफल झाला. कसरतपटू सराव करताना पाहून मध्येच लहर लागली की बच्चे त्यांचे

अनुकरण करीत.मग मी सॅल्युट मारी, वेडे वाकडे अंगविक्षेप करी, ते बघून बच्चे माझे अनुकरण करीत.



मग एक दिवशी रामाला कपडे चढवून,त्याला आवरण्यासाठी गळपट्ट्याला दोरी बांधून मी त्याला पिंज-याबाहेर काढला. मंद स्वरात ‘मेरा जूता है जपानी’ ची धून वाजत होती आणि दोन बाजूनी प्रकाश झोत टाकले होते.आम्ही रिंगणात गेल्यावर मी सर्कसच्या शिरस्त्या प्रमाणे कमरेत झुकून सलाम केला. माझे बघून रामानेही सलाम केला. बघ्यानी टाळयांचा कडकडाट केला पण रामा मुळीच बिचकला नाही. उलट बघ्यांचे अनुकरण करीत त्यानेही टाळया वाजवल्या. मी कोलांटी

उडी मारली तशी रामानेही मारली.  मी दारुड्यासारखा तलमत तलमत रिंगणात फिरू लागताच रामाही माझ्यामागोमाग फिरू लागला. पुन्हा बघ्यानी टाळयांचा कडकडाट केला , तशी रामानेही टाळ्या वाजवल्या. माझा प्रयोग यशस्वी झाला होता. शो मध्ये एवढा आयटम सादर झाला तरी प्रेक्षक तंबू डोक्यावर घेतील असे अनंतकाका, दिगंबर यांचे मत पडले. कारण त्यावेळी कोणत्याही सर्कशीत चिपांझीचे काम ठेवल्याचे ऐकिवातही नव्हते.

कपडे घातलेले चिपांझीचे ध्यान रिंगणात नुसती चक्कर घालून गेले तरी बच्चे कंपनी खेळाना गर्दी करील असे सगळयांचे म्हणणे होते. सुदानमधला मुक्काम संपत आला होता नी पुढचा कॅम्प नैरोबीला ठरला होता. तिथे शो सुरु केल्यावर चिपांझींचा आयटम ठेवूया असे नारायणराव म्हणाले.  त्यानंतर दोन दिवसानी सकाळी दहा वाजता अवचितपणे  नारायणरावानी मला मॅनेजरच्या तंबूत बोलावले. मी तिथे जाऊन पोचल्यावर35 mm. स्क्रीनवर चिपांझींच्या कामावर अमेरिकन सर्कसने बनवलेली फिल्म सुरु झाली. सुरुवातीची टायटल्स संपल्यावर चिपांझींची कामं सुरु झाली. हॉर्स रायडिंग, बॅलन्सिंग, सिंगल बार, डबल बार वरच्या कसरती, वेग वेगळया स्टाईलचे फ्लोअर जंपिंग

असा अर्ध्या तासाचा शो पाहून आम्ही मंत्रमुग्ध झालो. दुसऱ्या रिळ मध्येही स्विंगींग, रोलिंग ड्रम, फनी आयटम्स. अग्निचक्रातून उडी, वाघ सिंहा सोबतचे खेळ, टेबल स्केटिंग तर   थक्क करून सोडणारे होते. ह्युमन आर्टिस्ट जे करू शकतात ते सर्व अॅक्ट चिपांझी करू शकतील ही खूण गाठ मी मनाशी बांधली आणि   दुसऱ्या दिवसा पासून सराव करण्याचा कार्यक्रम मनात जुळवायला लागलो.

भारतात होणारे रामजी भागाबाईचे खेळ, रामायणाल्या वानर वीरांच्या वेशभूषा आठवून धोतर, सदरा, मुंडे, बाराबंदी कोल्हापुरी पटका, पगड्या, स्त्रीवेशासाठी नऊवारी   साडी, ख़णाची चोळी, घागरा,चुडिदार, सलवार कुडता, खणाचा परकर नी चोळी अशा वेगवेगळया पेहेरावांसाठी कापड खरेदी करून चिपांझींसाठी टेलरकडून कपड्यांचे सेट शिवून घेतले.शो सादर करताना अवघडायला होवू नये म्हणून कपडे घालूनच मी त्याना सराव देत असे. पंधरा दिवसांच्या ट्रेनिंग नंतर चारही बच्चे लीलया सायक्लिंग करू लागले. त्यांचा सराव पाहिल्यावर राजा प्रौढ असूनही बिन तक्रार काम शिकला.त्यांचे सराव सुरु असताना जाहिरातीसाठी खास फोटो सेशन अॅरेंज करून सुदानच्या प्रेसिडेंट साहेबानी सर्कसला भेट दिलेल्या चिपांझीचे आकर्षक खेळ,

चिपांझींचे खेळ सादर करणारी आशियातली एकमेव सर्कस अशी तुफान जाहिरातबाजी सर्कसने केली. धोतर,बाराबंदी,, पगडी घातलेला रामा नी इरकली लुगडे नेसलेली राणी याना सर्कसच्या बैल गाडीत बसवून शहरात राऊंड ही मारला.

प्रत्यक्ष खेळाच्या वेळी तंबू प्रेक्षकानी खच्चून भरला. प्रथम गवळयाच्या वेषात राजा सायकलला दुधाच्या किटल्या रिंगणात अवतीर्ण होताच प्रेक्षकानी हशा टाळयानी तंबू अक्षरश: दणाणून सोडला. सायकल हातात धरून चालवीत तीन राउण्ड मारून तो माघारी आल्यावरही टाळया थांबल्या नव्हत्या. दीड तासानंतर रामा राणी बैलगाडीत बसून रिंगणात जाताच पुन:श्च शिट्ट्या टाळयानी तंबू दणाणून गेला. शो पूर्वी तिकिट विक्री सुरु झाल्यावरही मी अधून मधून सजवलेल्या चिपांझीला घेवून प्रवेश द्वारासमोरून चक्कर मारून येत असे. हळू हळू रोप बॅलन्सिंग, सिंगल बार वरच्या कसरती असे चिपांझींचे आयटम्स आकाराला येवू लागले. चिपांझींच्या शोमुळे सर्कस गर्दी खेचू लागली. प्रत्येक शो मध्ये चिपांझींचे दोन आयटम्स तरी सादर केले जात.

आता मी त्याना सायक्लिंग चा सराव द्यायला सुरुवात केली. एकजण चिपांझीच्या गळयातली दोरी पकदून रिंगच्या मध्याभागी उभा राही. एक सायक्लिस्ट हळू हळू पॅडल मारीत निघाला की त्याच्या मागोमाग चिपांझीची सायकल पकडून त्याचे पाय पॅडलवर सेट करीत मी स्वत: असे. दोन तीन दिवसांच्या सरावानंतर चारही बच्चे नी प्रौढ राजा चिपांझीही लिलया सायकल चालवू लागले. मग त्यांच्या सायकलला दुधाच्या किटल्या लटकावून दुधवाल्या गवळयाचा फनी आयट्म, उलट दिशेने सायकल चालवणे, डबल सीट असे प्रकार वाढत चालले. मग सिंगल बार दबल बार या वरच्या वेगवेगळया उड्या नी रोप वॉकिंग नी कसरती सुरु झाल्या. सायक्लिंग मध्ये बॅलन्सिंग चा झालेला सराव नवीन कसरती शिकताना उपयोगी पडला. डेमोन्सट्रेटर दाखवील त्याचे हुबेहुब नी बिनचूक अनुकरण करून माझे बच्चे सगळयाना थक्क करून सोडित. नंतर आठ बाय आठ च्या गोल टेबलवर स्केटिंगचा थरारक सेट झाला. आता सलग दीड दोन तास चालतील एवढे प्रकार बसलेले होते.

चिपांझींचे आयटम्स सुरु झाले नी माझा कसरतींचा सराव कमी होत होत हळू हळू बंदच पडत चालला.मी पूर्ण वेळ चिपांझींसाठी वाहून

घेतले. माझे आई, वडिल, बहिण, भाऊ, मुले असे एकूण भावविश्वच चिपांझीमय झाले. तुमका     कदाचित खोटा वाटात पण माज्या आज पावतच्या पंचवीस वर्साच्या कारगतीत कमीच तरी १७ चिपांझीचे बच्चे ह्या ह्या तंबूत जलामले नी कसरती शिकान तयार झाल्ले. पण आयच्यान एकाव बच्चूक मी कदी सादो    फटको पन मारलेलो नाय. रिंगणात कारेक्रम देकवताना फकस धाक दाकवसाटी येताची छडी आसता माज्या हातीत. पन कदी चुकॉन सुदा आपुन तेचो फटको मारललो नाय. मी तेंका चोंबाळून,चुचकारून काम करून घेतय. चिपांझी म्हणजे माणसाचंच दुसर रूप.त्यांचे देहधर्मही तुमच्या आमच्या सारखेच. ठराविक सीझनमध्ये मादी हिटवर येते. अशा वेळी रक्तस्त्राव सुरु होतो नी एक विचित्र परमळ येवू लागतो.

मादीच्या ऋतूचा परमळ आला की नराला वरचेवर इराकतीची (लघवीची) भावना होते. अशावेळी मादी बेताल झालेली असते नी नर सुद्धा चळलेले असतात. तेंव्हा त्याना रिंग मध्ये ख़ेळवणे धोक्याचे असते. अशावेळी मादी दुसऱ्या पिंजऱ्यात असेल तर नर आपले मूत्र कुळच्यात घेवून ते मादीच्या दिशेने किंवा समोर कोण माणूस असेल तर त्याच्याही अंगावर उडवतो. मादी नी नर दोघेही स्युडो माऊंटिंग करतात.

वेड्यावाकड्या उड्या मारतात. खाणं न खाता ते नुस्त चाबलून टाकतात. त्यांच्या भावना शमे पर्यंत संपर्कात कोण येईल त्याच्यावर ते हल्ला करतात.बच्चे सर्कसमध्ये आले तेंव्हाच त्यांचा वेलविस्तार वाढेल अशी त्यांची निगुती मी ठेवलेली.जाणकारांशी चर्चा करून ते तीन साडेतीन वर्षाचे झाल्यावर पहिला इश्श्यु घ्यायचा असा माझा बेत म्हणून त्यापूर्वी दोन तीन पावट् मीरा नी राणी हिटवर येण्याचा सिझन आला की मी त्यांचा ऋतूकाळ पुरा होईस्तोवर त्याना वेग़ळ्या पिंज-यात ठेवून नरांपासून दूर अंतरावर ठेवीत असे. नी त्या दरम्याने त्यांची कामेही थांबवीत असे.

या वेळी इश्श्यू  घ्यायचा असल्यामुळे राणीचा ऋतूकाळ येण्याच्या सम्याला मी तिला नी राजाला एका पिंजऱ्यात ठेवून शांतू नी मीराच्या संपर्कापासून दूर हालवले. माझा अंदाज बरोबर ठरला नी ही कार्यवाही केल्यावर चारच दिवसात राणी हिटवर आली. निसर्गाने आपले काम चोख बजवले नी राणी पोटुशी राहिली. पुढच्या पाच महिन्यात मी तिची जातीनिशी देखभाल केली. पण दुर्दैव आड आले. अर्जुनमामाना कढ अनावर झाला. दु:खावेग ओसरल्यावर ते बोलू लागले. सर्कस पिनॅगच्या  दौ-यावर असताना पाचवा महिना संपता

संपता राणीचे अॅबॉर्शन झाले. मी माझ्या या या हाताने सगळी उस्तवारी केली. मृतावस्थेत जन्मलेले अपत्य नर जातीचे होते. मला अतिशय दु:ख झाले. गोष्ट माझ्या इतकी जिव्हारी लागली. कधी नव्हे ते त्या दिवशीचे खेळ कंडक्ट करायची जबाबदारी मी मनोहर पेंडुरकरावर सोपवली. नारायणराव समक्ष माझे सांत्वन करायला आले. ते बोलले “तू जीवाक् लावन् घेव् नुको. आपुन वायटात् चांगला सोदायचा....बच्चू गमावलो पन आपल्या सर्कशीतही पैदास व्हव शकता ह्या सिद्द झाला. आज दैव फिरला पन दुसरी मादी पोटुशी व्हयत् नी आमका बच्चू मिळात...तू बगीत -हव... माजी बत्तीशी खाली जानार नाय.... ”

तीन चार महिन्या नंतर सर्कस बाली बेटावर असताना गंगा हीट वर आली.या खेपी मात्र मी तिचा नी रामाचा जोडा जुळवला. सर्कस बाली बेटावरच्या दौऱ्यातच असतानाच गंगा सुखरूप प्रसुत झाली. सुदृढ पुत्ररत्न झाले. बाली बेटावर जलमलेला म्हणून त्याचे नाव मी ठेवले बळी. मी अर्जुन मामाची मुलाखत घेत असताना बळी सर्कसमध्ये काम करत होता. गंगाला पुढे आठ अपत्ये झाली नी सगळी सर्कसमध्ये काम करत होती. गंगा नी शांतु पासुन मीना, लक्ष्मी,

शिवा, सुग्रीव, जांबुवंत, समीर, राजा नं.२ आणि रामा नं.२ अशी पैदास मिळाली. आमच्या सर्कशीत एकूण ३ राजा झाले. सुदृढ चिपांझी अर्भकाचे वजन दीड ते दोन किलो भरते. सहा महिन्यात बच्चा स्वयंपूर्ण होतो नी दीड ते दोन वर्ष वयाला कसरतीची कामे करू लागतो.

चिपांझी मूलत: फलाहारी आहे. पण सर्व शाकाहारी जिन्नस तो आवडीने खातो. चहा, कॉफी शीत पेये ते आवडीने सेवन करतात. काही चिपांझी तर विडी, सिग्रेट, चिरूट ओढतात आणि मद्यपानही करतात. कडाक्याचे थंडी पडते तेंव्हा आम्हीही त्याना ब्रॅण्डी किंवा रम पाजतो. सुदानमध्ये आम्हाला भेट मिळालेला जॉर्ज उर्फ राजा पट्टीचा सिगारेट शौकीन होता. त्याला स्मोकिंग ची तल्लफ आली की तो आक्रस्ताळेपणा करायला लागे. तो जात्या तापट आणि आक्रमक होता. शिकार्खाना पहायला येणाऱ्या व्हिजीटर्सना आम्ही त्याच्या पिंजऱ्या जवळ जावू देत नसू. पण काही लोक आगावूपणे जायचे नी त्याच्या खोड्या काढायचे. मग तो चिडून त्याना प्रसाद द्यायचा. एकदा असेच एक गृह्स्थ आलेले. शिकारखाना पहाता पहाता त्याने सिग्रेट बाहेर काढली.

ते गृहस्थ सिगरेट ओढायला लागल्यावर केज बॉय ने त्याना वॉर्निंग दिली की, या चिपांझीला सिगारेट आवडते. तेव्हा तुम्ही पिंजऱ्या पासून जरा दूर रहा. हे ऐकल्यावर त्या गृहस्थाना जॉर्जची खोडी काढायची लहर आली. ते सिगारेट शिलगावीत मुद्दाम जवळ गेले. तशी जॉर्ज गजांकडेला आला आणि सिगारेट मागण्यासाठी हात पुढे केला. त्या गृहस्थानी सिगारेट द्यायला हात पुढे केला नी जॉर्जने हात पुढे केल्यावर आपला हात मागे घेतला. दोन तीन वेळा फसवल्यावर जॉर्ज चिडला नी गज पकडून त्याने फ्लोअरवर दणादणा

पाय आदळले. तो रागाने बेभान होवून किच्च किच्च आवाज काढू लागला.

a



[illegible]

('दि ग्रेट रॉयल सर्कस' [illegible])

पत्ता -

[illegible]

१९४७ या वर्षाला माझ्या आयुष्यात महत्त्वाचे स्थान आहे. [illegible] 'दि ग्रेट रॉयल सर्कस' मध्ये प्रवेश केला. [illegible]

(अर्जुन मामांच्या संग्रही असलेला माझा लेख )

जॉर्जचा थयथयाट बघितल्यावर तर त्या गृहस्थाना भारीच चेव आला नी ते पुन्हा पुन्हा सिगारेट पुढे करून जॉर्जला हुलकावण्या देवू लागले. एका बेसावध क्षणी त्यांचा हात टप्प्यात आल्यावर जॉर्जने त्यांचा हात पकडून त्याना गजांकडे खेचले. सिगारेट काढून घेतली आणि त्यांचा पंजा गजांच्या आत खेचून त्यांच्या करंगळीचा

खाट्कन तुकडा पाडला. त्या गृहस्थानी जोराने किंकाळी फोडली. केजबॉय पिंजऱ्याकडे धावले. जॉर्ज महाशय मात्र आपण त्या गावचेच नाही अशा आविर्भावात शांतपणे धूर सोडताना दिसले. येणाऱ्या विजिटर्सना शिकारखाना पहात असताना कोणत्याही प्राण्याला काहीही पदार्थ, फळ देवू नका, त्यांची खोडी काढू नका तसेच पिंज-या पासून सहाफूट अंतराच्या बाहेर रहा अशा सक्त सूचना कर्मचारी देत असत पण लोक आमची नजर चुकवून काही तरी आगावू पणा करीतच. जॉर्जची कळ काढणाऱ्या चार-पाच जणांच्या बोटांचे त्याने तुकडे पाडले. इराणच्या दौऱ्यावर असताना असेच काहीतरी बिनसले अन् मला कल्पनाही नव्ह्ती तो त्याने माझ्या हाताचा घेतला.जखम एवढी मोठी की सहा टाके पडले. मात्र अन्य कोणत्याही चिपांझीने माझ्यावर कधिही हल्ला केलेला नाही.

सर्दी-पडसे, खोकला, ताप, न्युमोनिया, डिसेंट्री, बध्दकोष्टता असे माणसाना होणारे आजार चिपांझीनाही होतात. अती उष्णता, उकाडा, थंडी, वारा यांचा त्रासही त्याना होतो. म्हणून थंडीत आम्ही त्याना ब्लॅकेट्स पांघरायला देतो. उन्हाळयात पिंज-यात फ़ॅन, कूलर लावतो. कोठा साफ़ होण्यासाठी आठवड्यातून दोन तीन वेळा सकाळी

अनश्या पोटी कोरी कॉफी त्यात अर्धा कप लिंबू रस मिसळून पाजतो. आजाफ्री पडल्यावर चिपांझी मलूल आणि चिडचिडा होतो. अशावेळी अपरिचिताला आणि व्हेटर्नरी डॉक्टरलाही तो जवळ जावू देत नाही. मला बऱ्याचशा आजारांवरची औषधे माहिती आहेत. इंजेक्शन देणे, सलाईन लावणे तसेच अगदी डिलिव्हरी कंडक्ट करीपर्यंत वैद्यकीय सेवा मी त्याना पुरवतो. गेल्या २५/३० वर्षात न्युमोनिया, डांग्या खोकला, हार्टफेल आणि डिसेण्ट्री यामुळे आमचे चार पाच चिपांझी दगावलेले आहेत.

ज्या ज्या वेळी माझी सर्कसवारी व्हायची त्या पूर्वी मी आगावू कळवून ठेवीत असे. मग या खेपेला लेखकाना कोणत्या गोष्टी सांगायच्या त्याची टिप्पणी अर्जुन मामा, अनंत काका नी मनोहर पेंडुरकर करून ठेवीत नी गप्पा मारताना त्या अनुषंगाने चर्चा रंगत असे. अर्जुन मामांचा स्वतंत्र तंबू असला तरी चिपांझींच्या पिंजऱ्याजवळ कॉट टाकून अर्जुन मामा कायम तिथेच असतात. मी सांगली मुक्कामी असताना आठ दहा दिवसापूर्वीचा किस्सा अनंत काकानी सांगितला. पुणा दौरा उरकून सर्कस सांगलीला हलवली त्या ट्रॅझिट्मध्ये मामा रजा घेवून मुंबईला घरी गेले. तेंव्हा मीना नावाची चिपांझी मादी

प्रेग्नंट होती. तिला डोहाळे लागलेले होते नी ती काही खाईनाशी झाली. द्याल ते फळ, खाणेवस्तू उलटीसुलटी करून निरखल्यावर किच् SSS किच् आवाज करून मीना ती वस्तू सरळ फेकून द्यायची. तिला अर्जुनमामाची आठवण येत असावी नी त्यांचा हायरा घेवून तिने खाणेपिणे बंद केलेले असावे. दोन दिवस गेले की ती आपसूक खायला लागेल असे सगळ्याना वाटले. पण आठवडाभर उलटला तरी ती काही खाईना म्हटल्यावर अनंतकाका , मामा पेंडुरकर घाबरले नी त्यानी सरळ अर्जुन मामाला फोन करून ही गोष्ट त्यांच्या कानी घातली.

मीना खातपित नाही म्हटल्यावर अर्जुनमामा टाकोटाक सांगलीला आले. ते आली नी तसेच मीनाच्या पिंजऱ्यात शिरले. ‘‘ बाय..... काय होता तुका? माजी याद इली?’’ असे म्हणत त्यानी मीनाला जवळ घेवून थोपटले. केज बॉजने दिलेले सफरचंद त्यानी पुढे केले ते उलटसुलट करून निरखल्यावर किच् SSS किच् आवाज करून मीना ने ते सरळ फेकून दिले. अनंतकाका म्हणाले , ‘‘ह्यां बगलस ना ? कायव दिला तरी असांच करता. ’’ मग अर्जुनमामानी मीराची आवडती कॅडबरी आणायला सांगितली. पण

पुन्हा कॅडबरी उलटसुलट करून निरखल्यावर किच् SSS किच् आवाज करून मीराने ती सरळ फेकून दिली. आता अर्जुनमामानी ओळखले, “अग्ये बाय माझ्ये..... ह्येका डाळिंब व्हायाया झाला.... तां डाळिंब मागताहा...” ताबडतोब सर्कसची गाडी घेवून मामा पेंडुरकर जातीनिशी रवाना झाले. तो डळिंबाचा सिझन नव्हता तरी मिरजेपर्यंत धुंडाळल्यावर डाळिंबं मिळाली. डाळिंब मिळताच मीराने ख्यॅक ख्यॅक असे आनंदाचे चित्कार काढीत दहा बारा डाळिंबांचा फन्ना उडवला. त्यानंतर ती नीट खावूपिऊ लागली. पुढे तीला पुत्र रत्न झाले . त्याचे नाव गुरु. तीन-चार वर्षानी सर्कस रत्नगिरी दौरा करून नारायण रावांची ईच्छा पुरी करायला सर्कस कुडाळला आली. (रत्नागिरी मुक्कामी सर्कसमधील सिंहीणीला दोन बच्चे झाले.) त्यावेळी गुरु चिपांझी कसरतीची कामे करू लागला होता. या गुरुचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा रंग भुरकट पांढुरका होता. अशा रंगाचा चिपांझी फार रेअर असतो. बोलता हातातल्या टिपणावर नजर टाकताच अर्जुनमामांचा कंठ दाटून आला. घसा खाकरून डोळयांच्या

a



कडा टिपून अर्जुनमामा पुढे सांगू लागले. त्यावेळी रात्री ९ ते १२ चा शो सुरु होता. साधारण १० वाजता ट्रुप मधला राजा क्रमांक 3 रिव्हॉल्विंग बारवर कसरती करीत होता. तो प्रयोग झाला नी राजा बारवरून खाली उतरताना त्याच्या गळपट्ट्यात अडकवलेल्या दोरीचा हूक सुटला. मोकळा झालेला राजा छलांग मारून रिंगणा बाहेर पडला आणि गॅलरीजवळची कनात वर करून अंधारात गुल झाला. शो सादर करतो तंबूबाहेर ओपन पॅसेज पत्रे लावून बंद केलेला असतो त्यामुळे राजा सर्कस तंबूतच कुठेतरी दडी मारून लपला असेल असा आमचा अंदाज होता. आम्ही सर्च लाईट घेवून सगळा तंबू फिरून सांदी कोपरे पिंजून काढले पण राजा दिसला नाही. दरम्याने शो सुटला. मग तंबू बाहेरच्या एरियात शोध घेतला.साधारण अर्ध्यातासाने कुणीतरी सांगत आला की तुमचा चिपांझी अमुक ठिकाणी

आहे. आम्ही चार पाच लोक  खबऱ्यासोबत निघालो. सुमारे 35 मिनीटा नंतर आम्ही ठिकाण गाठले. मृतावस्थेत पडलेला राजा सापडला. मग काही माणसे सांगू लागली. वीस पंचवीस टोळ भैरवानी दगड धोंडे मारीत त्याचा ताणपट्टा काढला. घाबरलेला राजा मग रस्त्या कडेच्या एलेक्ट्रिक पोलवर चढला. पोलच्या शेंड्यावर गेल्यानंतर त्याने सर्विस केबल पकडली आणि शॉक लागून तो खाली कोसळला.त्याच्या अंगभर दगड धोंड्यांच्या जखमा झालेल्या होत्या.

१९६५ मध्ये सर्कस इजिप्तच्या  दौऱ्यावर होती. कैरोला कँप असताना कैरोचे प्रेसिडेंट नास्सेर यांनी त्यांच्या मुलाच्या वाढदिवसा निमित्त समुद्रकिनारी लहान मुलांसाठी एंटरटेनमेंट शो अँरेंज केला होता. मी आमच्या चिंपांझी ट्रूपचा सुमारे ४० मिनिटांचा कार्यक्रम सादर केला. मुलाना कार्यक्रम खूपच आवडले. नास्सेर यांच्या मुलाने दोन आयटम्स पुन्हा करायला लावले.नास्सेर यानी खुश होवून सर्व ट्रूप सह माझा खास सत्कार केला. असे कितीतरी सन्मान आणि ट्रॉफीज माझ्या ट्रूपला मिळाल्या. चिपांझीचं टेबल स्केटिंग तर सर्कसचे खास वैशिष्ट्य मानले जाते. चिपांझीच्या या गोतावळ्यात मी एवढा एकरूप झालेलो आहे की, महिनाभर सुट्टी घेवून घरी गेल्यावर आठवडाभरातच  मला

चिपांझींच्या आठवणीनी बेचैन वाटू लागते आणि सुट्टी संपण्याआधीच माझे पाय सर्कसकडे वळतात. माझा मुलगा तर म्हणतो की, मी आणि चिपांझीचा बच्चा यातून एकाची निवड करायची असेल तर पप्पा नक्की चिपांझीचा बच्चा निवडतील !

# ०८. नाणारचा टॉवर



१९६० ते ७० च्या दशकात संदेश वहनाची माध्यमं बिनतारी तारायंत्र, टेलिफोन, रेडिओ एवढीच उपलब्ध होती. टेलिफोन आणि तारायंत्र फक्त सब पोस्ट ऑफिस मध्येच उपलब्ध होती. असंख्य

खेडेगावांमध्ये या सुविधा उपलब्ध नव्हत्या. मात्र सरकारने प्रत्येक ग्राम पंचायतीला रेडिओ संच दिलेले होते. पंयायत कार्यालयाजवळ राहणारी पांढरपेशी मंडळी सराळ सायंकाळच्षा बातम्या, कामगार सभा हे रेडीओवरून प्रसारित होणारे कार्यक्रम ऐकत असत.     या दशकात केंद्र सरकारने सरकारी आणि लष्करी गुप्त संदेश वहना साठी देशातील महत्वाच्या भागांमध्ये सूक्ष्म तरंग केंद्रे निर्माण करण्याचा देशव्यापी कार्यक्रम राबविला. त्यावेळी प्रगत तंत्रज्ञान नव्हते. संदेश प्रक्षेपणात अंतर ही मोठी समस्या होती. म्हणून विशिष्ठ अंतरावर टॉवर उभारून रिले सेंटर्सचे नेटवर्क उभारण्यात आले.

विशिष्ठ रेखावृत्तीय स्थानावर, विशिष्ठ अंतरावर आणि समुद्र सपाटीपासून विशिष्ठ उंचीवरची ठिकाणे निर्धारित करून त्या ठिकाणी रिले टॉवर उभारण्यात आले. या सर्वेमध्ये नाणार कुंभवडे हद्दीवर भिंताड     वाडीतला टेंब निवडण्यात आला. हा टेंब नाणार गावच्या महसूली क्षेत्रात येत असल्याने या स्पॉट जवळ डोंगरतिठा ते कुंभवडे रस्यावर “नानर सूक्ष्म तरंग केंद्र” अशी पाटी लावण्यात आली. या     स्पॉट पासून कुंभवडे धुमाळवाडी अर्धा तास चालीच्या अंतरावर. नाणारमधली घनगरवाडी पाऊण तास चालिच्या अंतरावर होती. तिथून

दहा मिनीटाच्या चालीवर " जितवणी" बारमाही पाण्याचे ठिव होते. नाणार आणि कुंभवडे हे दोन्ही गाव टेंबापासून तास -दीड तास चालीवर इतके लांब. शासकिय संदेश वहनासाठी ही यंत्रणा उभरलेली असल्यामुळे या सूक्ष्म तरंग केंद्रांची माहिती टॉप कॉन्फिडेंशियल सदरा खाली गुप्त ठेवण्यात आलेली असून आजही गुगलवर यासंदर्भात कोणताही तपशिल उपलब्ध होणार नाही. संपूर्ण किनारपट्टीवर असे असंख्य टॉवर कार्यरत असून ते पोस्टल टेली कम्युनिकेशनला जोडलेले आहेत. या टॉवर वरून कुठेही विना विलंब फोन लावता येतो.

केंद्र सरकारची टीम सर्वे करून नाणार टेंबाचा स्पॉट निश्चित करून गेल्यावर पाच सहामहिन्यानी ऑक्टोबर १९७२ च्या दरम्याने प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. एका दिवशी सर्वे प्रमाणे टेंबाबर निर्धारित जाग्यावर टॉवर आणि कार्यालय, स्ट्रॉंग रूम, स्टोअर रूम यांचा एरिया निश्चित करण्यासाठी त्या विभागाचा कोणी उच्चपदस्त इंजिनिअर शेट्टी साहेब जीप घेवून आला. त्याच्या सोबत सामानाचे दोन ट्रक आणि वीसेक बेलदार लेबरही आले. कुंभवडे तिठ्याच्या जवळ सर्वे टीमने लावलेल्या 'नानर सूक्ष्म तरंग केंद्र' पाटीजवळ जथा थांबला.

टेंबाच्या माथ्यापर्यंत जाण्यासाठी गच्च वाढलेल्या झाळी – झाडकळ छाटून काढायला हवी होती. माथ्यावरचा टॉवर उभारायचा स्पॉट पायथ्यापासून सुमारे पन्नास – साठ फूट उंचीवर असून तीव्र चढाव असल्यामुळे पायथ्यापासून ते माथ्यापर्यंतचा सगळा भाग बेणून कामचलावू रस्ता बनावला हवा होता. तसेच जवळपास कुठे पाण्याची उपलब्धी पहायला हवी होती. यासाठी काही स्थानिक कामगारांची मदत पाहिजे होती. इथून कुंभवडे धुमाळ वाडीतली घरे दिसत होती. शेट्टी साहेबाचा ड्रायव्हर मिशाळ बेलदारांचा मुकादम यल्लाप्पा ह्याला सोबत घेवून निघाला. जथ्यातले लेबर तात्पुरत्या निवासासाठी टेण्ट उभारायच्या कामाला लागले.

मुख्य रस्त्यापासून धुमाळ वाडीकडे जाणारा पक्का रस्ता नसला तरी सगळा कातळी भाग असल्यामुळे ट्रक, टेम्पो जाऊन जाऊन चाकोरी पडलेली होती. जीप धुमाळ वाडीकडे वळलेली दिसल्यावर वाडीतली पोरे -टोरे वाडीच्या तोंडाशी धकटुच्या घरासमोर जमा झाली. जीप थांबवून मिशाळ ड्रायव्हर खाली उतरला. जाणत्या मंडळीना रामराम करून तो म्हणाला, “ थितं तिकटी पाशी बोरड लावल्याला हाय न्हवं, ततं टावर बांदायच काम कराया

गोव्यास्न मोटं सायब आल्यात.”  मागे सर्व्हे झाल्यावर तिथे  पाटी ठोकल्यावर गावात चर्चा झाली होती.गव्हर्मेंट  कसलासा टावर बांधणार आहे ही कुंभवडे, नाणार, तारळ, सागवे, गोठिवरे  गावानी गोष्ट कर्णोपकर्णी प्रसृत झालेली होती. अशिक्षित गावंढ्या जनतेला टॉवर म्हणजे काय याची माहिती नव्हती. मुंबईला गिरण्यांच्या उंच चिमण्या असतात तसलं कायतरी होणार आहे नी तिथून मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापुर या शहरांमध्ये फोन करायची सोय होणार आहे इतपत महिती लोकाना होती. “असा व्हय..... चला धकटुच्या लोट्यावर बसॉया..... पानी-बीनी  खावा...... ” मिशाळ नी यल्लाप्पा धकटुच्या लोट्यावर जावून टेकले.  पाणी प्याल्यावर मिशाळ म्हणाला, “तितं  लय गचवन हाय त्ये साफ कराया होवं.... टावराच  काम याय तथं मात्याव जाईस्तोवर रस्ता बांदायचा हाय. तुमच्या वस्तीवरल  म्हाईतगार कामदार असत्याल धा पाच तर इचराय आल्तो.... ”

आडगावचे धुमाळवाडकरी मोठे धोरणी होते. त्यानी मुद्द्याची गोष्ट विचारली.“तशे मिळती म्हना... पन रोज काय भेटात..... ?” बेलदार अडचून रोज घेतात हे सर्वश्रुत असल्यामुळे  बेरकी पांडु

धुमाळ यल्लापाला म्हणाला, “ तुमी किती रोज घेतास?” त्यावर यल्लाप्पा म्हणाला, “ आता आमी नव्वद -शंभर पावत घेतु की . पर आमचं काम बी तसंच आस्तया.....” मान डोलावीत बेरकी हसत पांडु म्हणाला, “ तुमी म्हंस्तास ता बरोबर.... पन तुमी दोन हातानीच काम करतास न? आमी बी तसाच करताव ..... आता येकाद्रो जास्त कमी करीत तां येगळां. आता हाताची पाचव बोटा काय सारकी नाय. आमकाव नव्वद रुपाये रोज भेटात तर येव आमी....!” त्यावेळी त्या आडवळणी गावानी कुठेच साठ ते सत्तर रुपयाच्या वर मजुरी मिळत नसे. आंबा सिझन मध्ये कोणी कोणी अडल्यावेळी दहा रुपये जादा रोज देई. मिशाळाने नव्वद रुपये रोज द्यायचे कबूल करून लगेच साताठ लोकाना जीप मध्ये घालून सोबत नेले. सायबा साठी अंडी आणि एक कोंबडा घेतला.

धुमाळ वाडीतले कामगार टेंबा जवळ पोचले तेंव्हा शेट्टी सायबाचा टेण्ट उभा झालेला होता. बेलदारानी त्यांच्या जथ्यासाठी मांडव घालायचे माम सुरु केले होते. जीप मधून उतरल्या उतरल्या धुमाळ वाडकरी गडी कामाला लागले. दोघानी कुंबयाचे बंद काढायला घेतले. बाबु नी सख्या धुमाळ जितवण्यावरून पाणी

आणायला निघाले. त्यांच्या सोबत दोन दोन कळशांच्या कावडी घेवून दहाबारा बेलदारही निघाले. जितवण्यावर दोन तीन ठिकाणी चिव्याची बेटे होती. सख्याने दहाबारा काठ्या तोडून घेतल्या. धुमाळ वाडकराना मांडवाच्या कामाची हदन होती. चार जणानी संध्याकाळ पर्यंत लांब रुंद मांडव पुरा केला. कामगारानी तीन धोंड्यांच्या चुली मांडल्या. मिशाळाने किराणा दुकानाची चौकशी केली. जवळ म्हनजे कुंभवड्यात मांडाजवळ सदानंद भाऊ देसायांचे एकमेव दुकान . बाबु धुमाळाला सोबत घेवून मिशाळ आणि कल्लाप्पा कुंभवड्यात गेले. बेलदाराने मोठी खरेदी केली म्हणताना सदानंद भाऊनी त्याना रेशनवरच्या स्वस्त दराने गहू , तांदूळ , जोंधळे दिले. साखरही रेशनच्या दरापेक्षा दीड रुपया चढ घेवून दिली. भाऊ मिशाळाला म्हणाले, “मी इथला सरपंच आहे. तुज्या सायबाला भेटायला घेवून ये. तुम्हाला काय लागेल ती मदत देवू.”

सामानातून दोन ऍसिडच्या हेवी कपॅसिटीच्या बॅटऱ्या आणलेल्या होत्या. त्याना जोडून जोडून चार बल्ब लावून लख्ख उजेडाची सोय केली होती. संध्याकाळी कामगाराना

सोडायला जावून मिशाळाने सायबाला चहासाठी दूध घेतले नी कामगाराना दुसरे दिवशी येताना आणखी चार गडी व पाच सहा बायल् माणसे आणायची वर्दी देवून मिशाळ गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी वेळेवारी कामगार टेंबाकडे रवाना झाले. ते पोचल्यावर चहा करून झाल्यावर मिशाळाने शेट्टी साहेबाला उठवले. सायबासाठी पडदे लावून बाथरूम संडासची सोय केलेली होती. सायबाचा तंबू हे धुमाळवाडीकर कामगारांसाठी अप्रूप होते. आंघोळ उरकून साहेब राजापुरला रवाना झाला. कामगारानी टेंबाच्या पायथ्या पासून माथावळी पर्यंत जायची वाट बेणायला सुरवात केली.

साहेबाने राजापूरला तहसिलदार, एलेक्ट्रीसिटी बोर्ड याना वर्दी दिली. केंद्र शासनाचा महनीय प्रकल्प असल्यामुळे सब स्टेशन पासून नियोजीत टॉवर पर्यंत अतिउच्च दाबाच्या विद्युत् वाहिन्या टाकायच्या होत्या. शेट्टी साहेबाने वर्दी दिल्यावर युद्ध पातळीवर अंमलबजावणी सुरू झाली. पुढच्या तीन दिवसात टेंबाच्या माथ्यावर नियोजीत रिले सेंटर पर्यंत पोल टाकून लाईन ओढूनही झाल्या. अर्थात अगोदर टेंबाजवळून लाईन गेलेल्या

होत्याच. टेंबासमोरच्या पोलवरून माथ्यापर्यंत दहा-बारा पोल टाकून केबल ओढाव्या लागल्या. या ठिकाणी कायम उच्च दाबाने वीज पुरवठा व्हायला हवा या साठी काही केबल जोडण्या फिरवण्याचे काम करावे लागले. पुढे नाणार कुंभवडे गावातल्या लोकांसाठी कमी व्होल्टेज, वीज पुरवठा खंडित होणे या अडचणींचे कायमस्वरूपी निराकरण या निमित्ताने झाले.

शेट्टी साहेब आणि त्याच्यासोबत आलेले टेक्निशियन्स यानी सर्व्हे मध्ये निश्चित केल्या जागी टॉवर चा स्पॉट फिक्स केला. त्या पासून शंभर दीडशे फुटावर रिले सेंटर, स्ट्रॉंग रूम, स्टोअर रूम वगैरे इमारतींचे एरिया ठरवून दिले. शेट्टी सायबाला रोज कोंबडा लागे.मिशाळ रोज गावात जावून चढ्यादराने अंडी कोंबडे विकत घेई. बेलदार हप्त्यात बुधवार रविवारी नाणार तिठ्यावरच्या धनगर वाडीतून बकरा आणीत. जवळ जवळ पंधरा दिवसानी प्रारंभिक कामे पुरी झाली नी रस्त्याचे कामही पुरे झाले नी शेट्टी साहेब निघून गेला. टॉवरचे फौंडेशन आणि इमारतीचे काम स्थानिक कंत्राटदाराला दिलेले होते. शेट्टी साहेबाने दाखवलेल्या मार्किंग वर बांधकाम सुरू झाले. अधून मधून शेट्टी साहेब

विजिट करून कंत्राटदार नीट काम करतो आहे की नाही याची पहाणी करून जाई. दरम्यानच्या काळात सिमेंट व अन्य सामान ठेवायची शेड बांधून झाल्यावर सायबाने धुमाळ वाडीतला बाजी , गणू आणि सोन्या या तिघाना दररोज आठ तासाच्या शिफ्ट बेसवर वॉचमन म्हणून टेंपररी नेमून घेतले. त्यावेळी ८९ रुपये डेली वेजीस तत्वावर रोज मिळे. काम म्हणजे फक्त बसून लक्ष ठेवणे एवढेच. हा भाग निर्मनुष्य एकवशी असल्याने रात्री एकट्याने राहण्याचा प्रश्न होता. त्यावर त्या तिघानी तोडगा काढला. उजाडल्या पासून संध्याकाळपर्यंत एकाने थांबायचे आणि रात्री दोघानी जोडीने थांबायचे. दर पंधरा दिवसानी पाळी नी जोडी बदलायची असा पायंडा पडला. आजही तीन वॉचमन नियमित वेतनावर सेवेत आहेत. ते सुद्धा दिवसा एकजण आणि रात्री जोडी ने थांबायचे याच पद्धतीने ड्यूटी करतात.

रस्त्याचे काम पूर्ण झाल्यावर टॉवरचे फाउंडेशन आणि इमारतीचे काम सुरू झाले. त्यावेळी सिमेंट ओपन मार्केटला मिळत नसे. त्या कालखंडात महाराष्ट्रभर

सिमेंटचे दुर्भिक्ष्य होते. बरीच बांधकामे सिमेंट अभावी रखडलेली होती. पण हे शासनाचे काम असल्यामुळे सरकारी कोट्यातून मुबलक सिमेंट मिळायचे. कंत्राटदार मिळालेल्या स्टॉक मधली पोती जादा पैसे घेवून गरजूना विकीत असे. त्या दीड दोन वर्षाच्या काळात नाणार कुंभवडे पंच क्रोशीत झालेली बांधकामे टॉवरच्या कॉन्ट्रॅक्टर कडून काळया बाजाराने सिमेंट नेवून केलेली आहेत. पाऊस काळापर्यंत टॉवरचे फौंडेशन आणि ऑफिसच्या इमारतीचे निम्मे बांधकाम पुरे होत आले. टेंबावर कायम जोराचा वारा असतो. पावसात चार महिने हा स्पॉट उंचावर असल्यामुळे वाऱ्याचा जोरही भलताच असायचा. म्हणून पाऊसकाळात काम बंद ठेवावे लागले. मात्र चोवीस तास कायम वॉचमन असायचा.

धुमाळ वाडीत गंगाराम धुमाळ बर्कनदार होता. त्याची ठासणीची बंदूक होती. टॉवरच काम सुरू होवून हाय टेन्शन केबल टाकून लाईट सुरू झाला. शेट्टी साहेबाने मोठा सर्च लाईट आणलेला होता. रात्री त्याचा फोकस टाकला की ससे, डुकर, भेकरी यांची हुकुमी शिकार मिळायची. जवळ असलेल्या जितवण्यावर

रात्री पाणी प्यायला आलेली जनावरे टॉवरकडून फोकस टाकला की स्पष्ट दिसत. गंगाराम धुमाळ, नाणार मोंडेवाडीतला आत्म्या दुसनकर तसेच आजुबाजुच्या काही गावातले बर्कनदार कुणी ना कुणी दर चार दोन दिवसानी रात्रीचे टॉवरजवळ शिकारीला जायचे. पुढे पुढे राजापुर, रत्नागिरी हून काही सरकारी अधिकारीसुद्धा स्पेशल जीप काढून खास शिकारीसाठी नाणार टॉवरकडे येत. अगदी आजही महिन्यातून चार पाच वेळा कुणी ना कुणी शिकारीसाठी हटकून टॉवरकडे खेप करण्याचा प्रघात आहे. एकतर नाणारात देवानेच पारध करायला बंदी घातलेली आहे. त्यामुळे स्थानिक लोक शिकार करीत नाहीत. दुसरे म्हणजे टॉवर जवळून हातिवले जैतापूर पर्यंतचा परिसर दिसतो. त्यामुळे रात्री कस्टम किंवा पोलिस यांची टीम जीप घेवून गस्त घालायला आलीच तरी भीती बाळगण्याची गरज नव्हती. कारण लांबून हेडलाईटचे फोकस दिसतात. त्यामुळे बेसावधपणी रेड मध्ये सापडायची भीती नाही. तिथे घातलेली खेप सहसा वाया जात नाही . काही ना काही शिकार नक्की मिळते. मुंबईतले शिवसेनेचे एक कार्पोरेटर त्या

दशकात मित्रमंडळ घेवून वर्षातून दोन तीन वेळेला शिकारीसाठी नाणार टॉवरकडे यायचे.

पावसाळा संपला नी दसऱ्यानंतर धूमधडाक्याने कामाला सुरुवात झाली. रिले सेंटरच्या मुख्य कक्षाला स्लॅब घातलेला आहे. त्याकाळी नाणार पंचक्रोशीतल्या खेडे गावानी ते मोठे अप्रूप होते. गावातली हौशी मंडळी मुद्दाम बघायला येत असत. टॉवर उभारण्या साठी मटेरियल येवून पडल्यावर शेट्टी साहेब टेक्निशियन्स ची वेगळी टीम घेवून आला. दिसामाशी काम उठायला लागले तेंव्हा तर स्थानिक माणसे आश्चर्य चकित झाली. लांबून पहाणारे म्हणत “ह्यां म्हंजे चा चार शिडयो बांधलानी हत....... टेंबार वारो म्हणशा तर काय.... एक कावटी इली आस्ली तर मानुस दुकू उडॉन जायत........ ह्याकाय टिकताना क्टिन हा......” मात्र त्याची मजबूती नी भव्यता त्या स्पॉटवर जावून बघितलं तरच येईल . टॉवरचं काम सुरू झालं नी पुन्हा कोंबड्यांचा रतीब सुरू झाला. कुंभवड्यात कोंबडी मिळेनाशी झाल्यावर नाणार,हरचली,तारळ , गोठिवरे , सागवे ते पार जुवाठी माडबन पर्यंत जीप दामटून मिशाळ कोंबडी

पैदा करी. लोक अजूनही टॉवरचा विषय निघाला की हटकून सांगतात. “त्ये टायमाक टॉवर बांदनारो सायब् इलो व्हतो ना , तेना नानार कुंबवड्या सकट धा गावात औषदाक म्हनशा तर कोंबडा शिल्लक ठ्येवलान् नाय.........”

टॉवरचं काम पुरं झालं. शेवटच्या टप्प्यात तीन फुटी हेवी ड्युटी असिडच्या पन्नास साठ बॅटऱ्या आल्या. एकेक बॅटरी एवढी जडशीळ की केबलचे लवंग़ण करून त्यात चिव्याचे मजबूत दांडे घालून चार खांदकरी ती वाहून नेत. स्ट्रॉंग रुम मध्ये एमर्जन्सी साठी बॅटरी सप्लाय कायम जय्यत ठेवलेला असतो. आरंभी नेमलेले वॉचमन नियमित वेतनावर सेवेत रुजू झाले. त्याना दैनंदिन काम म्हणजे सकाळ संध्याकाळ बॅटऱ्या आणि अन्य मशिनरीची रिडिंग घेवून ती रजिस्टरला नोंद करणे. रोज एकदा पणजीला रिपोर्ट करणे. काही तांत्रिक अडचण असेल तर पणजीमधिल ऑपरेटर सुचना देईल त्याप्रमाणे किरकोळ सेटिंग्ज करणे एवढेच काम असते. महिन्यातून एकदा पणजीवरून कोणीतरी टेक्निशियन येवून सगळी यंत्रणा तपासून जातो. असा मनुष्य येण्यापूर्वी

पणजीहून सुचना येते आणि कोडवर्ड दिला जातो. दरमहा पाच तारखे पूर्वी या कर्मचाऱ्यांचे वेतन दिले जाते.

टॉवर जोडून झाल्यावर सड्यावर गवत कापायला, कवळ तोडायला गेलेल्या लोकांच्या चांगलाच नजरेत भरायला लागला. लोकं कुतुहलाने टेंबाकडे मुद्दाम खेप करायला लागली. टॉवरच्या पायथ्याशी गेल्यावर त्याची भव्यता बघून लोक चक्रावून जात. गावदरीत खाडीच्या कडेला आकाशवेरी उंच गेलेले जुनाट माड लोकानी बघितलेले. टॉवरची उंची वर्णन करताना “दोन तीन माडांइतको उच हा .... इतके उच जावन् कसो काय बांदलानी कोन जाना” पुढे स्थानिक लोकाना अगदी अल्प फी मध्ये टॉवरकडे जावून फोन करण्याची मुभा आहे हे कळल्यावर काही जण तिथे जावून मुंबईत्ल्या चाकरमान्याला फोन लावीत. तुम्ही नंबर दिलात की तिथला वॉचमन तत्काळ तुम्हाला संबंधित नंबर जोडून देतो. अक्षरश: मिनिटभरात कॉल लागतो.वॉचमन रजिस्टरला कॉल नोंदून त्याची अल्प फी जमाकरून सही घेतो. त्यावेळी तार करायला राजापुर गाठावे लागे. टॉवर झाला नी तो फेरसा कमी झाला. बायो गुरवीणीचा झिल मुंबईला सिंडिकेट बॅंकेत नोकरीला होता. बायो महिनाभरातून एकदा

त्याला फोन करी. “बाय माज्ये लय अजाब वाटता माका......आता हुंबय खय नी कुंबावडा खय..... बाबु अगदी सामनी बसॉन बोलताहा असा वाटता .......”

हायस्कूलच्या कामासंदर्भात मी चार- पाच वेळेला टॉवरवरून फोन केलेले आहेत. तुम्हाला रिसिव्हर वरून बोलता येते किंवा पॅनेल समोर उभे राहून स्पीकरद्वारा संभाषण करता येते. येथे हॉट लाईन असल्यामुळे विना त्रास विनाव्यत्यय फोन करता येतो. अलिकडे मोबाईल सुरु झाल्यानंतर नाणार टॉवरची बी. एस्. एन्. एल्. जे फुल्ल रेंज पंधरावीस कि.मी. च्या एरियात मिळू लागली. खाडी पलिकडे फणसगाव ते विजयदुर्ग यापट्ट्यातल्या सगळ्या गावांमध्ये नाणार टॉवरची पावरफुल रेंज मिळते. आरंभ काळी सेवेत असलेल्यांपैकी बाजी धुमाळ आजही हयात आहे. टॉवरच्या बांधकामाच्या वेळी घडलेल्या आणि नंतरच्या काळातल्या शिकारीच्या गंमती तो मोठ्या हौशीने सांगतो.

◘ ◘ ◘ ◘ ◘ ◘ ◘

# ०९. लाल छत्री चहा

कळत्या वयातला म्हणजे १९६५ च्या दरम्यानचा काळ हा मध्यम वर्गियांसाठी दुर्भिक्ष्य आणि कमतरतेचा, कदन्न, ओढघस्तीचा काळ. त्या काळी चहा ही आम्हा पोरांसाठीच नव्हे तर गरीब, हातावर पोट असणाऱ्या कामगार वर्गासाठीही चैनीची वस्तू होती. आम्हा मध्यमवर्गिय ब्राह्मणांच्या घरी दिवसातून ४-५वेळा चहा केला जात असे . पण कामगार वर्गियांच्या घरी असं नव्हतं. म्हणून सकाळी दारात आलेला गडी चहाच्या घोटासाठी रहाटगाडग्यावर अगदी खुशीने पाणी लाटून देत असे, भाजीचा फणस फोडून देणं, खळ्याला चोप देणं किंवा बेगमीसाठी डाळलेल्या गंजीतलं गवत ओढून देणं ही कामं कपभरून मिळणाऱ्या चहाच्या आशेने करीत असे . पोरासोराना सकाळी अनशापोटी कडू कुडेपाक दिला जाई . त्यानंतर आंघोळी वगैरे झाल्यावर एकदा आणि संध्याकाळी शाळेतून आल्यावर एकदा असा दिवसातून फक्त दोनदाच चहा मिळे. मोठी माणसं मात्र सकाळी तीन वेळा नी दुपारी अडीच वाजता झोपून उठल्यावर, चार वाजता आणि संध्याकाळी असा दिवसाकाठी साताठ वेळा चहा घटाळायची.

गोर गरीबाच्या - कामगारांच्या घरी कधितरी सटी सहामाशी उपासाच्य दिवशी चहा केला जायचा. पाटणकर. दिगंबर काळे, मसुरकर यांच्या किराणा मालाच्या दुकानात त्या वेळी दामोदर शिवराम कंपनीचा लाल छत्री छाप भुकटीच्या रुपातली चहा पावडर मिळायची. तो जाहिरातींचा वगैरे काळ नव्हता. पण किराणा दुकानांमध्ये अंदाजे एक बाय दीड फूट मापाच्या पत्र्याचा बोर्ड हमखास असायचा. त्यावर राम शामचा लाल छत्री चहा आणि दामोदर शिवराम आणि कंपनी असा मजकूर असे. त्यामुळे चहा पावडर म्हणजे लाल छत्री किंवा दामोदर शिवराम हे अगदी माझ्या डोक्यात फिट्ट बसलं. असा एक बोर्ड आम्ही माल घ्यायचो त्या दुकानाच्या दर्शनी दरवाजावर उन्ह पाऊस खावूनही पंचवीस वर्षं तरी शाबूत स्थितीत असल्याचं माझ्या पक्कं स्मरणात आहे. क्वचित कधितरी सुमारे दीड बाय दोन फूट मापाच्या गुळगुळीत कागदा वर देवाचं वगैरे चित्र छापलेलं नी तळी सहा इंच रुंदीची एका पानावर तीन महिन्याच्या तारखा छपलेली चार पानं पिनेने मारलेलं कॅलेंडरं पाहिल्याचंही स्मरतं. त्या कॅलेंडरवरही महिन्यांच्या लंगोटीच्या वरच्या बाजूला मोठ्या टाईपमध्ये दर्जेदार चहाचे विक्रेते दामोदर शिवराम आणि कंपनी ही अक्षरं नी कोल्हापूर मधला पत्ता छापलेला असायचा. त्यामुळे हे चहा पावडरचे वितरक कोल्हापूर मधले आहेत एवढी माझ्या ज्ञानात भर पडली.

त्याकाळी चोखंदळ मुंबईकर दर्जेदार माल फक्त मुंबईतच मिळतो असा अहंकाराचा भाव जोपासून असायची. आमच्याकडे आल्यावर झोपाळ्यावर बसून आमच्या दादांशी गप्पा मारताना चहा विचारल्यावर नको नको म्हणायची. पण आईने स्वयंपाक घरात चुलीवर चहाचं आधण ठेवून उकळी आल्यावर त्यात लाल छत्री चहा बुकी टाकल्यावर थोड्याच वेळात चहाचा मोहक दरवळ सुटल्यावर , “अरे माईनी चहा ठेवलाच वाटतं ” असे उत्स्फूर्त उद्गार पाहुण्या मुंब ईकराच्या तोंडून अनाहूतपणे यायचे. खरी गम्मत तर त्यापुढेच असे. ॲल्युमिनीयमच्या झाकणीतून (त्यावेळी ट्रे नसायचे) चहाच्या कपबशा नेवून दिल्यावर कपातला चहा ओतून बशी तोंडाला लावली रे लावली की मुंब ईकराचा अहंकार पार गळून पडायचा. तो झक् मारीत विचारी “ तुम्ही चहा पावडर कुठची वापरता? ” दादा निर्विकारपणे सांगायचे , “लाल छत्री छाप चहा. दुसऱ्या कुठच्याही पावडरचा चहा आमच्या घाशा खाली उतरणार नाही. ” पाहुणा मग दराची चौकशी करी. तो आकडा मात्र आता माझ्या लक्षात नाही . पण दादानी दर सांगितल्यावर “इतकी चांगकी चहा पावडर नी इतकी स्वस्त मिळते ही? ” ही चोखंदळ मुंबईकराची प्रतिक्रिया मात्र मला लखलखित आठवते.

त्याकाळी तीन फुटी औरस चौरस देवदारी ( तेंव्हा प्लायवूड हा शब्द आम्ही ऐकलेलाही नव्हता ) खोक्यातून चहापत्ती यायची. त्या

खोक्यावरही तुटक तुटक छापात लाल रंगात छत्रीचं चित्र आणि दामोदर शिवराम आणि कंपनी व तिचा पत्ता छापलेला असे. दुकानदार खोक्याला वरच्या बाजूने हात जाईल इतपत छिद्र पाडून दोन तीन महिने पावडर विकायचा. रोजच्या विक्रीच्या गोड्या तेलाचा डबा अर्धा कापून काठ वळवून त्यात चहा पावडर ठेवलेली असे. संपेल तशी खोक्यातून स्टीलच्या ग्लासाने पावडर विक्रीच्या डब्यात उसपली जाई. ती उसपतानाही दुकानभर चहा पावडरचा मंद वास पसरायचा नी चहा प्यायची हुक्की यायची. देवदारी खोके रिकामे झाल्यावर गावातले कोणी कोणी सुतार ते अल्प स्वल्पात विकत घेत. फोटो फ्रेम बनविणारे फ्रेमची मागील बाजू झाकायला ते वापरीत. एक दुकानदार सुतार बसवून ते शिस्तीत खोलून घेई नी पडवीतल्या पार्टिशनसाठी , नाहीतर ‘कूड’ म्हणून आडवस करायला वापरी . खोक्याना चारही बाजूनी दोन इंची पत्र्याची पट्टी मध्ये दुमडून काठळी मारलेली असे.

सुतार अंबर पक्कड वापरून एकाबाजूने पत्र्याची काठळी उचकटून काढीत . सव्वाइंची तार चुका साठवून त्या सरळ करून पुन्हा वापरल्या जात. खोक्या ची सहा तकटं सुटी केल्यावर त्याना आतल्या बाजूने बेगड लावलेली असे. नी चांभारी टेकस मारून फिट केलेली एक बाय एक इंची लाकडी पट्टीची फ्रेम अच्चळ सोडवून काढावी लागे. ह्या लाकडी पट्ट्या मात्र अगदी पुरचूक असत . देवदारू

तकटाना लावलेल्या बेगडीवर आम्ही पोरं तुटून पडत असू. पाच सहा खोक्यांची बेगड चुरगळून एकावर एक थर गुंडाळून त्याचा चेंडू करून आम्ही आबाधुबी किंवा लगोरी खेळत असू, एरवी आम्ही चिंध्यांचे चेंडू बनवू ते एकसारखे सुटत रहात . पण हे बेगडी चेंडू वापरायला मस्त नी दीर्घ मुदत टिकायचे ही. आबाधुबीत चेंडूने रिंगणातल्या भिडूला टिपल्यावर 'दामोदर शिवराम आऊट' किंवा 'लाल छत्री चहा औट' अशी आरोळी पोरं मारीत. बेगडीची आणखी एक गम्मत होई. दोनेक आंगळ बेगडीच्या तुकड्यात काड्यापेटीतल्या दोन -चार काड्यांचा गुल मोडून घेऊन त्याची घट्ट गोळी पोरं बनवीत . छप्परी नळ्या च्या पैशा एवढ्या खपरीच्या दोन तुकड्यांमध्ये आगकाडीच्या गुलाची बेगडीत गुंडाळलेली गोळी ठेवून चांगला वजनदार दगड चारेक फुट उंचीवरून टाकला की लवंगी फटाकडी एवढा फट्ट आवाज होत असे. त्याला आम्ही बेगडी बॉम्ब म्हणू.

देवदारू खोक्यांची तकटं रिफांवर ठोकून सुकवणं वाळवणं घालायला दोन तीन सीझन ते तट्टे वापरता येत. असे तीन - चार फुटी सुबक तट्टे पार्टीशन सारखेही वापरता येत, नी ते दीर्घकाळ टिकतही. माझ्या मित्राकडे त्या चार भावंडांच्या अभ्यासाची वह्या पुस्तकं ठेवायचं झडप बंद चार खणी कपाट बनवून घेतलेलं होतं. त्याच्यावरचे गोलाकार दामोदर शिवराम आणि कंपनी व मध्यभागी

लाल छत्रीचं चित्र असलेले शिक्के अजूनही अंत:चक्षूं समोर तरळून जातात . चहा करताना कपाला अर्धी चिमूट चहाबुकी हे ठरलेलं परिमाण असे. त्यातही एकावेळी आठ-दहा कप चहा केल्यावर फडक्यातला चहाबुकीचा गोळा लगेच टाकून न देता दुसऱ्यावेळी त्यात दोन कपाचा चहा सहज व्हायचा. गडी पैऱ्यांच्या नशिबी तर कायम उकळलेल्या पुडीचाच चहा असे.

मध्यंतरीच्या काळात अदमासे 2. 5× 5इंच , 4 ×7 इंच, 5× 10 इंच आकाराच्या खाकी कागदी पिशव्यांमधून चहा पावडर दिली जावू लागली. अगदी पॉलिथीन पिशव्यांचा वापर सुरु होईतो ही प्रथा दुकानदारानी पाळली . बहुशा अशा चहा पावडरचे उत्पादकच त्या पिशव्या पुरवीत असावेत. दामोदर शिवरामचे जाडी पत्ती नी बारीक पूड असे फ़ॅमिली मिश्रण दरम्यानच्या काळात मिळू लागल्यावर आम्ही ते ही वापरीत असू. त्यांचे समकालीन मुडीस, लिप्टन, ब्रुकबॉण्ड असे काही चहाचे ब्रॅण्ड ही बाजारात असले तरी त्यांच्या प्रती किलो किमती जादा असल्याने बहुजन समाज नी प्रामुख्याने आमच्या भागातले हॉटेलवाले तरी दामोदर शिवरामची चहापत्तीच वापरीत१९७५ते ८६ अखेर नोकरी निमित्त माझे वास्तव्य राजापुर तालुक्यात कुंभवडे नाणार गावांमध्ये होते. तिथे एखाद दुसरं किराणा दुकान असायचं , नी दामोदर शिवराम ऐवजी फुटकळ कंपन्यांची चहा पत्ती स्वस्त घेवून ती चढ्या दराने विकीत. त्या

पावडरीचा चहा काळा नी बेचव , स्वाद तर बिलकूल नसे. म्हणून राजापूर खारेपाटण ला खेप झाली तर तिकडून दामोदर शिवरामचीच चहापत्ती आहे याची खातरजमा करून मी खरेदी करीत असे . कधी घरी पडेलला खेप झाली तर आमच्या कायमच्या दुकानातून लाल छत्री किंवा फ़ॅमिली मिक्श्चर खरेदी करीत असे.

ज्या चार शाळांमध्ये सेवा केली तिथेही स्टाफच्या ती क्लबमध्ये दामोदर शिवराम चहा पत्ती लोकांच्या पसंतीला उतरली. वर्षभरापूर्वी जुन्या शाळेतले सहकारी भेटले. गप्पांमध्ये ते सहज बोलून गेले की, काळेसर तुम्ही आमच्याकडून गेल्यावर टी क्लबच्या चहाची क्वलिटी घसरली. मी विनम्रतेने म्हणालो, ‘ घाटगे सर, मी कोल्हापूरच्या दामोदर शिवरामची पत्ती आणून देत असे तेंव्हा.’ मी हयातभर तीन वस्तू एकाच ब्रॅण्ड च्या वापरल्या. पार्ले किंवा साठेची बिस्किटं, टाटाचा रेड रॅपरचा सिंथॉल आणि दामोदर शिवरामचा चहा. साठे बिस्किट कंपनी खूप वर्षामागे बंद झाली. पार्ले कंपनी बहुराष्ट्रीय कंपनीच्या कब्जात गेली नी पहिला दर्जा घसरला. चव स्वाद साधारण टिकलेली असली तरी आताची बिस्किटं पट्कन मोडतात. चहात बुडवली तर कधि विरघळली पत्ताही लागत नाही. २०२० मध्ये मुलगा एम्. डी. झाला नी त्याने पुण्यात दवाखाना थाटला. मी सेवा निवृत्त झालो होतो. मग आम्ही उभयता आमचं पडेलचं घर बंद करून पुण्याला वारजे येथे स्थायिक झालो.

पूर्वी मी सकाळी तीन ते चार वेळा आणि संध्याकाळी ते रात्री झोपेपर्यंत किमान तीनवेळा अर्धा-अर्धा कप चहा घेत असे. पुण्याला आलो नी मनाजोगा चहा मिळेनासा झाला. इकडे दामोदर शिवरामचं नावही किराणा दुकानदाराना माहिती नाही, ते नसो बापडं. पण माझा चहा फक्त दोन वेळांवर आला. किंबहूना नाईलाय म्हणून चहा घ्यायचा. सूनबाईने कितीतरी ब्रॅण्ड बदलून बदलून वेगवेगळ्या चहा पत्त्या आणून शिकस्त केली. पण मी आणि सौ. सुगंधा कोणाच्याही पसंतीला उतरणारी चहापत्ती नाही मिळाली. ह्या चार वर्षांच्या काळात दामोदर शिवराम.... राम शामचा लाल छत्री चहा ही नावं अंतर्मनात प्रकर्षाने रुंजी घालीत राहिली. गावी तर वर्षभरातही खेप होत नाही. १४ फेब्रुवारी २०२४ ला अकल्पितपणे नृसिंह वाडीतून अंबाबाईला जाताना शाहूपुरीत एच पी चा बोर्ड दिसला नी दामोदर शिवरामची पेढीही दिसली.

आम्ही दोघं आणि उपळ्यातल्या चुलत भावाची बायको तीही लाल छत्री – दामोदर शिवराम ची फॅन. पुण्याला परत जाताना अगदी योजून शाहूपुरीत कार थांबवून दामोदर शिवराम मध्ये गेलो. अहो आश्चर्यम्.... आमचा लाल छत्री ब्रॅण्ड शाबूत असलेला बघून सगळे सुखवलो. लालछत्री सोबत मिक्श्चर ऑर्डर केली. आतल्या बाजूला नोकराने पत्ती मापायला सुरवात केली नी तो परिचित गंध दरवळला. त्याच वेळी दर फलक पाहिल्यावर तर मी उडालोच.... लाल छत्री 300

रुपये नी मिक्श्चर ४00 रुपये किलो.... पुण्यात होलसेल मध्येही हे दर ऐकायला मिळायचे नाहीत. मी मुक्त कंठाने प्रशंसोद्गार काढले, ' मी गेली चार वर्षं वगळता पन्नासहून अधिक वर्षं तुमचा चहा पितोय.' पण काउंटरकरच्या माणसाने काही प्रतिसाद देणं राहो, नजर वर उचलून बघितलंही नाही. एकतर त्यांच्या लेखी तीन चार किलो चहा पत्ती घेणारी आम्ही फुटकळ गिऱ्हाईकं असणार किंवा संकोची, विनम्र स्वभावा मुळेही आपली स्तुती ऐकून प्रतिसाद देणं त्याना सुचलं नसेल कदाचित.....! आमच्या मागे उभी असलेली वहिनीही दामोदर शिवरामच्या चहाची तारीफ करू लागलेली. ते ऐकल्यावर नोकरवर्ग मात्र कुतुहलाने पुढे सरसावले नी हसऱ्या चेहेऱ्याने आम्ही कोण कुठले .... विचारपूस सुरु केली.

पेढी वरचे अन्य चारपाच नोकर ही पुढे आले नी आतल्या केबिनमध्ये बसलेले प्रौढ गृहस्थही बाहेर आले. ते सुबोधजी गद्रे , दामोदर शिवराम कंपनी च्या मालकवर्गा पैकीच निघाले. आता मलाही हुरुप आली नी 'राम शाम चा लाल छत्री चहाचा संदर्भ मी दिला. चहापत्ती मापायला सुरवात केल्यावर इकडे बाहेर पर्यंत गंध दरवळत आला, आजही दामोदर शिवराम ची गुणवत्ता टिकून आहे याची खात्री पटली' अशी मनमोकळी प्रतिक्रिया दिली. एच. पी. हे त्यांचच प्रॉडक्ट आहे नी पुण्याला रविवार पेठेत त्यांचे सगळे ब्रॅण्ड मिळतात हे त्यानी अभिमानाने सांगितलं. मला तर अत्यानंद झालेला.

धंद्यामध्ये वस्तूचा उत्तम दर्जा नी वाजवी किंमत ही गुणवत्तेची परिमाणं निरिच्छतेने आणि साक्षेपाने जोपासणं हे दुर्मिळ! अमेरिकन ट्रेड पॉलिसीने ग्रासलेल्या आजच्या व्यवसाय नीतीच्या युगात पैशाचा अति हव्यास न बाळगता व्यवसाय निष्ठा 'व्रताचरण' म्हणून जोपासणं लोप पावलेलं आहे. म्हणूनच अत्यंत प्रांजळ भावाने मी त्यांचा आदर करतो. एखादी वस्तू महाग किंवा निकृष्ठ मिळाली तर आपण त्या व्यावसायिकाला शिव्यांची लाखोली वाहतो नी ते योग्यही आहे. पण त्याच बरोबर सकोटीने प्रामाणिक व्यवसाय करणाराची मुक्तकंठाने स्तुती करणं हे ही सात्विक ग्राहक म्हणून आपलं कर्तव्य ठरतं.

# ई साहित्य प्रतिष्ठान चे हे सतरावे वर्ष

## प्रा. श्रीराम काळे यांचे हे ई साहित्यवरील पाचवे पुस्तक.

प्रा. श्रीराम काळे हे एक सिद्धहस्त प्रतिभाशाली लेखक आहेत. देवगड येथील बीएड विद्यालयात त्यांनी नवीन पिढ्यांना घडवणाऱ्या शिक्षकांच्या पिढ्या घडवल्या. गेली चाळीसेक वर्षे ते लेखन करत आहेत व अनेक नामवंत नियतकालिकांतून त्यांच्या कथांना प्रसिद्धी लाभली आहे. त्यांच्या पुस्तकांना प्रकाशक मिळणे कठीण नाही. पण त्यांनी आर्थिक फ़ायदा मिळवण्याऐवजी आपले पुस्तक ई साहित्य तर्फ़े वाचकांना विनामूल्य देणे पसंत केले. ते मानतात की ई पुस्तके हे दिवसेंदिवस वाढत जाणारे भविष्यकाळाचे माध्यम आहे व ते मराठीतही वाढायला हवे.

प्रा. श्रीराम काळे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (१०), डॉ. नितीन मोरे (५२ पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस

आल्मेडा (२), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (१२), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (८), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी (५२), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४२), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (२), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२३), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (१०), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (५), श्रीरंग कौलगी (४), यशवंत कदम (७), पांडुरंग सूर्यवंशी (३), सुधीर कारखानीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (५), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय

टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(३)    असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ‘इ’यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।